किंमत १ रुपया

Reg. No. B. 5134 Licence No. 53
Licenced to post without prepayment

दिवाळी अंक

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ३१ आक्टोबर, १९५१ अंक ४३

## मुंबईच्या सरदारगृहाची सेवा

लो. टिळकांच्या वेळेपासून आजमितीपर्यंत सुमारें ५० वर्षें सरदारगृह ही संस्था विविध क्षेत्रांतल्या पुष्कळ लहान-थोर व्यक्तींची सेवा आपुलकीनें करीत आहे. चालू परिस्थितीस अनुसरून सरदारगृहानें आपल्या सेवेचें कार्यक्षेत्र वाढविलें आहे. सरदारगृह आपल्या आश्रयदात्यांकरितां म्हणजे राहण्यास अगर नुसत्या भोजनास येणाऱ्यांकरितां हल्लीं करीत असलेल्या सेवेचा कांहीं तपशील खालीलप्रमाणें आहे:—

१ सरदारगृहांत प्रत्येक खोलींतून स्वतंत्र बालकनी व बाथरूम असल्यामुळें तेथें राहणाऱ्या लोकांची होत असलेली खास सोय.

२ हल्लींचें वाढलेलें महागाईचें प्रमाण व युद्धपूर्वकाळीं आकारीत असलेल्या दराचे मानानें सरकारनियंत्रित हल्लीचे दर यांचा मेळ बसवून जेवणाचा व राहण्याचा दर्जा उच्च व समाधानकारक ठेवण्याचा सरदारगृहाचा सतत प्रयत्न.

३ सरदारगृहांत न राहातां नुसत्या भोजनास येणाऱ्या लोकांकरितां 'फक्त भोजनाची' खास सोय.

४ नेहमींच्या भोजनाची व्यवस्था कायम ठेवून उच्च दर्जाच्या "स्पेशल भोजनाची" आधुनिक पद्धतीवर नवी व्यवस्था नुकतीच सुरू....

५ सरदारगृहांत लग्नमुंजी वगैरे कार्यांची मनपसंत व्यवस्था.

६ भोजनाची पार्टी हें सरदारगृहाचें वैशिष्ट्य.

७ बोरीबंदरवर (मुंबई) उतरणाऱ्या प्रवाशांचें सामान स्टेशनवरून सकाळीं १० ते १२ पर्यंत सरदारगृहांत नेऊन सायंकाळीं ४॥ ते ५॥ पर्यंत तें ज्यांचें त्यांस बोरीबंदरवर पोंचवण्याची सरदारगृहाची नवी सोय.

८ व्यापारी लोकांना धंद्याविषयीं विचारविनिमय करण्याकरितां सरदारगृहांत स्वतंत्र जागेची व्यवस्था.

९ पुणें, नगर, कर्नाटक वगैरे भागांतून मुंबईस धंद्यानिमित्त येणाऱ्या मध्यम स्थितींतील लोकांकरितां सरदारगृहांत नुसत्या स्नानाची व भोजनाची व्यवस्था.

१० दुसरीकडे राहण्याची सोय असल्यास सरदारगृहांत नुसतें भोजन घेऊन बरोबर असलेलें सामान सरदारगृहाच्या क्लोक रूममध्यें ठेवण्याची खास सोय.

**सरदारगृह** क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई नं. २. टे. नं. ३१०८४

सरदारगृहांत राहण्याची व नुसत्या भोजनाचीही सोय आहे.

नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक म्हणजेच

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना सन १९१० : हेड ऑफिसः–अहमदनगर शहर

शाखाः–१ संगमनेर (जि. नगर) २ बेलापूर रोड-श्रीरामपूर (जि. नगर) ३ कोपरगांव (जि. नगर) ४ भिंगार (ता. नगर)

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) भरलेलें भांडवल | रु. | ३,६५,५८० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | १,८६,७१८ |
| (४) इतर फंड | रु. | ३,१४,६९१ |
| (५) चालू ठेवी | रु. | ३७,२७,२७४ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु | ८,६०,१५९ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १४,६८,३५६ |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६९,७६,५२८ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्ज दिलीं जातात. तसेंच चेक, हुंडी, सरकारी रोख्यांची खरेदी विक्री, वगैरे सर्व व्यवहार केला जातो.

जिल्ह्यांतील ठोक कापड वांटपाचें काम बँकेकडून केलें जातें.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

तारीख १५ ऑक्टोबर १९५१

मो. कुं. फिरोदिया,
चेअरमन.

## दि सातारा साऊथ डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक, लि., सांगली.

[ स्थापना–१९२७ ]

फोन नं. २० तारेचा पत्ता : "Rayatbank"

मुख्य कचेरी : हायस्कूल रोड, सांगली.

शाखा : १ जत, २ मिरज, ३ तासगांव.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | : रु. | २,१०,५१० |
| खेळतें भांडवल | : रु. | २२,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स् | : रु. | १,४५,००० |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एस. पी. सुर्वे, बी. ए.,
मॅनेजर.

आर. बी. आरवाडे,
बी. ए., एलएल. बी.,
चेअरमन.

## दि भारत इंडस्ट्रियल बँक लिमिटेड

—स्थापना १९३८—

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | .... | रु. १५,४३,८१० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | .... | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | .... | रु. ३,९९,७७५ |
| एकूण खेळतें भांडवल | .... | रु. ६०,००,००० चे वर |

: संचालक मंडळ :

१. श्री. वी. बी. वाळवेकर, अध्यक्ष
२. श्री. के. पी. जोशी (वकील) उपाध्यक्ष
३. सौ. इंदुमतीबाई फडके, B. A. (Hons.) B. T.
४. श्री. बी. पी. केळकर
५. श्री. आर. बी. गिरमे, M. L. A.
६. श्री. के. एम. महाजन (वकील)
७. श्री. पी. आर. दामोदरे
८ श्री. एच. बी. गिरमे, मॅ. डायरेक्टर, सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

शाखा : १. पुणें लष्कर २. बारामती ३. ओझर (तांबट) (जि. नाशिक) ४. श्रीरामपूर ५. लोणावळा ६. खोपोली (जि. कुलाबा)

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नि. ना. क्षीरसागर,
मॅनेजिंग डायरक्टर्स

★ आमचे भागीदार, खातेदार व हितचिंतक यांना ही दिवाळी आनंदाची जावो. ★

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड.

जिल्हा–उत्तर सातारा

[ फोन नंबर ४३ ]

सुमारें १५ वर्षें सतत "अ" वर्गांत असलेली शहरांतील जुनी बँक

( स्थापना–दिनांक २४–१–१९१७ )

चेअरमनः–आमदार पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले, B. A., M. L. A.

| | |
|---|---|
| (१) खेळतें भांडवल | ३०,००,००० रु. |
| (२) गंगाजळी | ९३,००० रु. |
| (३) ठेवी | २४,८३,००० रु. |
| (४) इन्व्हेस्टमेंटस ( विन्यास ) सरकारी रोख्यांत | १३,००,००० रु. |
| (५) इतर निधी | १,५५,००० रु. |

(अ) चालूं, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारल्या जातात. ( व्याजाचे दर ३/४ टक्यापासून ३ टक्यापर्यंत )

(ब) रेल्वे रिसीटस्, हुंडी, चेक, ड्राफ्ट वगैरेंची माफक दरांत वसुली केली जाते.

(क) मुंबई, पुणें, कोल्हापूर, सांगली वगैरे ठिकाणचे चेक्स, हुंड्या माफक कमिशन घेऊन दिले जातात.

कराड, दिनांक १-१०-५१

शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि.

मुख्य कचेरीः १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.

( स्थापना १९३७ )

बँकिचीं वैशिष्ट्यें:–

१ सुरक्षितपणा, सचोटी व सेवा, या त्रयीवर आधिष्ठित असलेली.

२ स्थानिक बँकांमध्यें सर्वांत जास्त रिझर्व्ह फंड असलेली ( स्टॅटयुटरी रिझर्व्ह १,००,००० ) एक लाख, (अनूकॉल्ड रिझर्व्ह ३,५०,०००) साडेतीन लाख, एकूण ४,५०,००० साडेचार लाख.

३ श्रीयुत जी. डी. सराफ व इतर सन्मान्य जबाबदार व्यापाऱ्यांचे नेतृत्वाखालीं चाललेली.

४ चालू खात्यावर १ टका, सेव्हिंग्ज बँकवर २ टक्के व एक वर्षाचे मुदती ठेवीवर ३ टक्के, दोन वर्षाचे मुदती ठेवीवर ३॥ टक्के, व सहामाही सीझनल ठेवींवर २॥ टक्के व्याज देणारी.

५ बँकेनें स्वतःची ३ व ५ वर्षांची अनुक्रमें शेंकडा ४ व ५ व्याज पडणारीं कॅश सर्टिफिकिटें काढलीं असून तीं रु. १०० व रु. १००० या स्वरूपांत मिळतील.

६ शिवाय क्र. क्र. ४ प्रमाणें प्रत्येक वर्षी व्याज देणारीं पांच वर्षांचीं होम सेव्हिंग्ज सर्टीफाकिटें ता. १ आक्टोबर १९५१ पासून काढण्यांत आलीं असून विशेष माहितीसाठीं बँकेच्या मुख्य कचेरींत अगर शाखेंत चौकशी करावी.

६ बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांत प्रमुख शहरीं शाखा असलेली व सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी एकमेव बँक.

व्ही. एम्. पाटकर, जनरल मॅनेजर,

## धी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को. बँक, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

स्थापना १९११ तारेचा पत्ता : फार्मर बँक

टेलिफोन नं. २५४६१ पोस्ट बॉक्स नं. ३७२

चेअरमन : श्री. आर. जी. सरैया, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ४८,६९,७५० |
| गंगाजळी फंड | रु. ३७,१६,२०० |
| ठेवी | रु. ८,०८,९९,७०० |
| खेळतें भांडवल | रु. ११,३०,२६,८०० |

:: १५ जिल्ह्यांमध्यें ६१ शाखा ::

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था आहे.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
शर्तीसाठीं चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## THE SANGLI BANK LTD.

(ESTD. 1916) (SCHEDULED BANK)

(Incorporated under the Patronage of the Govt. of H. H. the Rajasaheb of Sangli in Sangli.)

Head Office : SANGLI

| | |
|---|---|
| Authorised Capital ... | Five Lacs. |
| Subscribed & paid-up | Three Lacs. |
| Reserve Funds ... ... | Three Lacs, Sixty Thousand. |
| Working Capital... ... | One Crore. |

*Every type of Banking Business Transacted.*

- Branches -

BOMBAY. SHAHAPUR. TERDAL.
SHIRHATTI. MANGALWEDHE. KARAD.
RABAKAVI. UGAR. KAVATHE.
WILLINGDON COLLEGE.

**Board of Directors :**

Shri S. E. Sukthankar, D. F. C., I. A. S., Chairman (Collector, Satara South)
Shri R. R. Shah,
Shri D. L. Arawade,
Shri R. B. Arawade, B. A., LL. B.,
Shri Lalchand Nathmal,
Shri M. H. Godbole, B. A., LL. B.,
Shri S. B. Arawade,
Shri M. K. Gupte, M. A., C. A. I. I. B., Manager.

सुंदर बनारसी पातळें

नवीन जरीची लुगडीं व मिलचें कापड

—यांकरितां—

शाहाडे आठवले लि., दादर

टेलिफोन { शाहाडे बिल्डिंग; एन्. सी. केळकर रोड दादर मुंबई २८ { ६०५५४

## सरदारगृह लिमिटेड, मुंबई नं. २


### आधुनिक निवासस्थानांत अग्रगण्य राखण्याचे ध्येयनिष्ठ प्रयत्न

लो. टिळकांचें मुंबईतील वसतिस्थान व अर्थातच तत्कालिन राजकारणाचें एक केंद्र ह्या नात्यानें सरदारगृह अखिल भारतांत महशूर आहे. अद्यापि काँग्रेस व अन्य राजकीय पक्षांचे कित्येक पुढारी मुंबईंत सरदारगृहांतच उतरतात.

#### संस्थापना व वाढ

कै. श्री. विश्वनाथ केशव ऊर्फ तात्यासाहेब साळवेकर ह्यांनीं इसवी सन १९०० च्या सुमारास सरदारगृहाची स्थापना केली. त्यास महाराष्ट्रीय सरदारांचा व राजेरजवाड्यांचा आश्रय मिळून यथार्थतेनें तें सरदारगृह झालें. इ. स. १९२७ नंतर त्यांचे चि. श्री. गजानन विश्वनाथ ऊर्फ बाबूराव साळवेकर, बी. ए., ह्यांनीं सरदारगृहाची कीर्ति अधिकच वाढविली. निरनिराळया सुधारणा करण्यास त्यांना स्नेहभावानें श्री. गणेश परशुराम ऊर्फ बापूसाहेब उपाध्ये ह्यांनीं सहाय्य केलें. त्यांच्याच सहकार्यामुळें इ. स. १९४७ मध्यें सरदारगृहाचें प्रायव्हेट लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें.

श्री. बापूसाहेब उपाध्ये मुंबई विद्यापीठाचे बी. कॉम्. असून ते बेस्ट कंपनींत वीस वर्षे असि. अकौंटंटच्या हुद्यावर होते. लिमिटेड कंपनीचे हे प्रथमपासून मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. श्री. बाबुराव साळवेकरांचें मार्च, १९४८ मध्यें आकस्मिक निधन झाल्यानंतर श्री. उपाध्ये ह्यांचेवरच सरदारगृहाची सर्व जबाबदारी पडली.



श्री. ग. प. उपाध्ये, बी. कॉम्,
मॅनेजिंग डायरेक्टर, सरदारगृह लिमिटेड

#### नव्या सुधारणा व सोई

आपल्या तीन वर्षांच्या कारकीर्दींत श्री. बापूसाहेबांनीं अनेक सुधारणा केल्या आणि रहाण्याच्या हॉटेलांचे दर सरकार-नियंत्रित असूनही जेवणाचा व राहाण्याचा दर्जा उच्च व समाधानकारक ठेवण्याचा सतत प्रयत्न चालविला.

भोजनपार्टीची, लग्न-मुंजीची व खास भोजनाची व्यवस्था सरदारगृहांत केव्हांही होऊं शकते. सरदारगृहांत बाहेरून फक्त भोजनास येणाऱ्या लोकांकरितां स्पेशल भोजनाची नवीन व्यवस्था श्री. उपाध्ये यांनीं नुकतीच सुरू केली आहे. पुण्याहून धंद्यानिमित्त सकाळच्या गाडीनें मुंबईस येऊन संध्याकाळचे गाडीनें परत जाणारीं पुष्कळ माणसें आहेत. त्यांच्याकरितां सरदारगृहानें बोरीबंदर स्टेशनवर एक नवीन सोय केली आहे. त्याचा फायदा धंदेवाल्या लोकांना निःसंशय होतो, यांत शंका नाहीं.

#### श्री. बापूसाहेब उपाध्ये, बी. कॉम्, ह्यांनीं अंगीकारलेलें कार्य

श्री. बापूसाहेब उपाध्ये मनमिळाऊ, धोरणी, व्यवहार-चतुर व कार्यदक्ष आहेत; आणि त्यांच्या विविध सुधारणांमुळें सरदारगृहाला वाढता लोकाश्रय मिळत आहे. त्यांच्या प्रयत्नांवरून सरदारगृह आधुनिक निवासस्थानांत अग्रगण्य राहील ह्याबद्दल शंका वाटत नाहीं. श्री. बापूसाहेबांच्या ह्या कार्यानें महाराष्ट्राचें नांव उजळ होत आहे म्हणून महाराष्ट्रीय जनतेनें सरदारगृह ह्या त्यांच्या संस्थेला आश्रय देणें समुचित ठरेल.

श्री. बापूसाहेब उपाध्ये हे हॉटेल्स आणि रेस्टोरंट असोसिएशन, बॉंबे रिजन या संस्थेचे डायरेक्टर असून बॉम्बे हॉटेल ओनर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष आहेत. मुंबई प्रांतिक हॉटेल फेडरेशनवरही ते निवडून गेले आहेत. त्यांनीं अंगिकारलेल्या सर्व कार्यांत आम्हीं त्यांना सुयश चिंतितों.

## कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें.

( स्थापना : १८ जानेवारी १९०६ )

कामाची वेळ—सकाळीं ९ ते ११॥ सायंकाळीं ५॥ ते ७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,२५,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,११,००० |
| गंगाजळी | रु. ६८,८५५ |

हप्तेबंद ( रिकरिंग ) व कायम ठेवींवरील व्याजाचा दरः— एक वर्ष १॥ टक्का, २ वर्षे २ टक्के व ३ वर्षे २॥ टक्के.

बँक आपल्या समासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी वगैरे तारणांवर कर्ज देतें. सोन्याच्या तारणावर व्याजाचा दर ४॥ टक्के प्रमाणें आहे. तसेंच माफक व्याजाच्या दरानें समासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेंवसुली इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करते. तसेंच समासदांस नियमितपणा, काटकसर व शिल्लक ठेवणेची संवय लागावी या हेतूनें बँकेनें नवीन हप्तेबंद ठेव घेणेस सुरवात केली आहे. बँकेनें सुरक्षिततेसाठीं सेफ कस्टडी खातेंहि नवीनच सुरू केलें आहे. नियमासंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह | चिं. वा. भट, बी. ए., एलएल. बी., कार्याध्यक्ष



आमच्या भागीदारांस, ठेवीदारांस आणि खातेदारांस दिवाळी व नवीन वर्ष भरभराटीचें जावो.

शिड्यूल्ड बँक

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

हेड ऑफिस: प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २. टे. फोन नं. २७६३

मुंबई शाखा: ८२ मेडोज स्ट्रीट, कॉमनवेल्थ बिल्डिंग, मुंबई १. टे. फोन नं. ३०४०८

अध्यक्ष: श्री. ग. रा. साठे | उपाध्यक्ष: श्री. वा. ग. बापट

—भांडवल—

| | |
|---|---|
| आधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें | रु. ७,२१,१३५ |
| खेळतें | रु. ७७,००,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल बी., मॅनेजर | श्री. चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, टे. फोन नं. २६०७



## दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.

कोल्हापूर.

| | |
|---|---|
| शेअर भांडवल उभारलेलें | रु. २,००,००० |
| शेअर भांडवल वसूल | रु. ९४,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७०,००० |
| खेळतें भांडवल | रु. ७,००,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

व्ही. एन. यादव, मॅनेजर | जे. डी. भोसले, ऑ. सेक्रेटरी

भाऊसो सा. पाटील, प्रेसिडेंट



'को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ' पाहिजे ना ? मग सहकारी संस्थांनाच आपला पैसा, उत्साह व सहानुभूति द्या !!

## धी जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

( पूर्वीची धी जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. )

( स्थापना : सन १९४० )

| | रु. |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल : | २,५०,००० |
| खपलेलें भांडवल : | १,९१,९५० |
| वसूल झालेलें भांडवल : | १,५३,१०५ |
| गंगाजळी व इतर निधी : | १,२८,४४६ |
| अकराव्या वर्षाचा नफा : | ३८,५०० |
| डिव्हिडंड : | ६¼% |

ठेवीवर १ ते ४ टके पर्यंत व्याज दिलें जातें.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एस. एम. अथणी, कार्याध्यक्ष | व्ही. एस. फडके, अध्यक्ष

आर. जी. दाते, उपकार्याध्यक्ष | म. द. खाडिलकर, मॅनेजर

रजिस्टर नंबर ७२१८ स्थापना १९३५

## सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

# शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळे होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

हेड ऑफिस कराड. ब्रँच ऑफिस सांगली.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १,००,००० |
| खेळतें भांडवळ | ७.७९,००० |
| खपलेलें भांडवल | ६०,००० |
| वाटलेलें कर्ज | १०,८०,००० |

म. सि. पुटाणी, मॅनेजर

आण्णापा नारायण कल्याणी, चेअरमन



## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

जनतेच्या विश्वासास पूर्णतः पात्र झालेली दाक्षिण महाराष्ट्रांतील पाहिली शेड्यूल्ड बँक.

स्थापना १९३० हेड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

—: एकुण तीन जिल्ह्यांत २३ शाखा :—

३०।९।१९५१ अखेरचे आकडे

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| „ वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| „ रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. १,६१,००० |
| „ ठेवी | रु. ६८,५४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. पाऊण कोटीचे वर

माफक मासिक हप्त्याच्या तीन वर्षांच्या मुदतीच्या क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना.

शिवाय सहा महिन्यापासून ५ वर्षांच्या मुदती ठेवी. होमसेव्हिंग्ज, सेव्हिंग्ज, करंट वगैरे सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

भारतांतील सर्व प्रमुख व्यापारी शहरावरील हुंड्या व इतर बिलें, पेन्शन व्हाउचर्स, वगैरे तत्परतेनें वसूल केलीं जातात.

अ. रा. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर.

गोविंद विठ्ठल सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

ह. सी. कुलकर्णी, बी. ए., जनरल मॅनेजर.



दि

# बँक ऑफ कराड, लि.

## ★ कराड ★

( स्थापना : १२-१-१९४६ )

हेड ऑफिस : कराड. शाखा : भवानी पेठ, सातारा

वसूल भांडवल २,१६,५००. खेळतें भांडवल २० लाख

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. ल. म. देशपांडे, चेअरमन.

श्री. वि. रा. वेलणकर, श्री. शं. प्र. ओगले, श्री. मेजर सरदार बी. एन. पाटणकर, श्री. रा. ता. पवार, श्री. वि. ह. शिराळकर, श्री. रा. अ. अराणके, डॉ. व्ही. जी. देशपांडे, श्री. ना. बा. बुधकर.

**मुदत ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.**

सहा महिने २¾% एक व दोन वर्षे ३¼% तीन वर्षे ३½% चार वर्षे ३¾% पांच वर्षे ४%.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

कराड तारीख १०-१०-५१. } म. वि. खंडकर. मॅनेजर



# सह्याद्रिचे आश्रयदाते

सह्याद्रि विमा कंपनीची प्रगति व भरभराट हजारों विमेदार, भागीदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी व हितचिंतक यांच्यामुळेंच होत असल्यानें त्यांना दिवाळी आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो. या मंगलप्रसंगीं सह्याद्रिची पॉलिसी घेऊन सुखांत भर घाला. तसेंच सह्याद्रिची भरपूर कमिशनवर एजन्सी घेऊन आपलें उत्पन्न वाढवा. अधिक माहितीसाठीं लिहा.

गो. ग. सौंदणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर, नासिक.

# अर्थ

**दिवाळी अंक**

बुधवार, ता. ३१ आक्टोबर, १९५१

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र


**"अर्था" च्या वाचकांस व हितचिंतकांस नवें वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो.**

## आर्थिक उन्नतीचा पाया

"अर्था" च्या वाचकांस १७ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक सादर करण्यास आम्हांस आनंद वाटत आहे.

जानेवारी १९३५ मध्यें "अर्था" ची स्थापना झाली, तेव्हांपासून "अर्थ" नियमितपणें प्रसिद्ध होत आहे. कै. प्रो. वामन गोविंद काळे ह्यांनीं आर्थिक विषयांस वाहिलेलें हें साप्ताहिक स्थापन केलें, त्यावेळीं त्यांनीं ह्या उद्योगास 'साहस' असें म्हटलें होतें. महाराष्ट्राची अर्थविषयक प्रवृत्ति अत्यंत दुर्बळ असल्यानें ह्या संबंधांच्या कल्पनांचा व वाङ्मयाचा महाराष्ट्रांत अभावच होता. ही उणीव भरून काढून आर्थिक लोकजागृति करणें आणि आर्थिक व्यवहारांचें लोकशिक्षण देणें हाच प्रस्तुत 'साहसा' चा मुख्य उद्देश होता. आर्थिक महत्त्वाच्या बाबींची वेळोवेळ माहिती देऊन व त्यांचें वारंवार सुगम्य विवेचन करून आर्थिक उन्नतीचा मजबूत पाया घालण्याचें हें कार्य संस्थापकांच्या निधनानंतरहि आज सहा वर्षें अखंड चालू आहे. भारताच्या विद्यमान अर्थमंत्र्यांनीं ह्या साप्ताहिकाच्या राष्ट्रहिताच्या कार्याबद्दल स्वानुभवावरून व दृढ–विश्वासानें जे उद्गार काढले आहेत, ते वाचून "अर्था" च्या सहाय्यकांना समाधान वाटेल ह्यांत संशय नाहीं. मराठी आर्थिक वाङ्मयांत ह्या साप्ताहिकास अग्रस्थान प्राप्त होण्यास ज्यांची मदत झाली व होत आहे, अशा सर्व तज्ञांचे आणि सहाय्यक व्यक्ती व संस्था ह्यांचे अत्यंत आभारी आहोंत; त्या सर्वांना नवें वर्ष सुखाचें जावो!

प्रस्तुत विशेषांकांत महत्त्वाच्या प्रचलित आर्थिक प्रश्नांची चर्चा कित्येक तज्ञांनीं केलेली असून, चालू परिस्थितीचें प्रतिबिंब त्यांत स्पष्ट दिसून येईल. त्यांतील कांहीं प्रश्नांचा उल्लेख येथें करणें इष्ट आहे. वीज कपातीच्या सरकारी हुकुमानें अनेक महत्त्वाच्या गोष्टींची जाणिव निर्माण व्हावयास पाहिजे. अवर्षणामुळें ही कपात आवश्यक झाली हें तात्कालिक कारण खरें असलें, तरी योग्य वेळीं योग्य त्या गोष्टी न झाल्याकारणानेंच आजची परिस्थिति निर्माण झाली, हें कोणासहि नाकारतां येणार नाहीं. गेलीं कांहीं वर्षें वीजपुरवठ्याची परिस्थिति बिकट होत चालली होती. १९४६ मध्येंच कराराप्रमाणें टाटा कंपन्यांनीं रेल्वेला त्यांची मागणी कमी करण्याची सूचना दिलेली होती. असें असूनहि सरकारी खात्यांनीं दिरंगाई केली आणि बाष्प शक्तीचीं यंत्रें मागविण्याचे कामीं हयगय झाली असें कोणी म्हटलें तर तें खोडून काढणें कठीण जाईल. लहान लहान योजना हातीं घेऊन आणि कोयना योजना मंजूर व सुरू करून सरकारनें आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. संभाव्य संकटांकडे डोळेझांक करण्याऐवजी त्यांस कार्यक्षमतेनें तोंड देण्याचा धडा वीज-कपातीनें शिकविला आहे.

हिंदी लोकशाही यशस्वी होण्यासाठीं द्रुत गतीनें औद्योगीकरण होणें आवश्यक आहे. पावसाच्या लहरीवर अवलंबून असलेल्या शेतीच्या व्यवसायांत गुंतलेले बहुसंख्य शेतकरी दैववादी बनले, तर त्यांत नवल नाहीं. निसर्गाशीं दोन हात करण्याचें सामर्थ्य दुबळ्या शेतकऱ्याजवळ येऊं शकणार नाहीं; त्यासाठी सुसंघटित आणि कार्यक्षम अशी औद्योगिक व शेती सहकारी संघटनाच हवी. सध्या औद्योगीकरणाची झालेली दुर्दशा सत्वर नाहींशी केली पाहिजे, इतकेंच नव्हे तर आगामी लष्करी व इतर संकटांस तोंड देण्याची जय्यत तयारी ठेवली पाहिजे. आपल्या अभ्युदयास परदेश हातभार लावूं शकणार नाहींत; आपण स्वतःच आपली शक्ति एकवटून निश्चयानें कामास लागलें पाहिजे.

आर्थिक उद्धाराच्या योजनांत सहकारी प्रवृत्तीस व संघटनेस महत्त्वाचें स्थान आहे. परंतु दुर्दैवानें त्याबाबत जेवढी जागृति व्हावयास पाहिजे तेवढी झालेली नाहीं, हें मान्य करणें भाग आहे. सामान्य जनतेंत विश्वास निर्माण करतील असे नेते पुढें आल्याविना हें कार्य होणार नाहीं. ज्या गोष्टीचा प्रचार करावयाचा, तिचे विरुद्ध वृत्ति व वर्तन असेल, तर त्या प्रचाराचें तेज कसें पडणार ? मुंबई राज्याचे अर्थमंत्री स्वदेशीचें व सहकाराचें व्रत कसोशीनें पाळतात. त्यांचें अनुकरण मोठ्या प्रमाणावर कां होत नाहीं ? सक्तीच्या सहकाराचा उपाय अंमलांत आणण्यापूर्वी इतर अनेक बाबतींत सक्ति होणें आवश्यक दिसतें.

आपल्या देशाच्या प्रगतीचा प्रश्न सुटण्याचे कामीं लोकांत उत्साह निर्माण व्हावयाचा असेल, तर त्यास अनुकूल असें वातावरण हवें. तें निर्माण झालें, तर निद्रित जनताहि जागी होऊन सहकार्यासाठी पुढें येईल. पण ध्येयसिद्धीसाठी त्याग एकाचा व फळ मात्र दुसऱ्यास, अशी त्याच पिढींत स्थिति उपयोगाची नाहीं. त्यांत अनिष्ट भेदाभेद झाला तर एकजूट निर्माण होणार नाहीं; टिकणार नाहीं. हें साधें सत्य लक्षांत घेऊनच योजना आखल्या पाहिजेत व पार पाडल्या पाहिजेत. जनतेच्या त्यागाचें व परिश्रमाचें भांडवल त्याविना एकत्र येऊं शकणार नाहीं. पंचवार्षिक योजनेचा विकास ह्या दृष्टीनें झाला, तर आर्थिक अभ्युदयाबद्दल कोणींहि शंका बाळगण्याचें कारण नाहीं. आर्थिक प्रगतीचा पाया भक्कम करण्याच्या सर्व प्रयत्नांशीं जाणत्या लोकांनीं हार्दिक सहकार्य करून इतरांस धडा घालून दिला पाहिजे.

### सहकारी कार्यकर्त्यांना

## आशादायक भवितव्याचा संदेश

परिस्थिति कितीहि बिकट असली, तरी दिवाळीच्या शुभप्रसंगीं उल्हास हा आपोआप वाटतो. महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्त्यांना आशादायक भवितव्याचा संदेश देण्याची संधि "अर्था"च्या दिवाळी अंकानें मला मिळत आहे.

गेल्या कांहीं वर्षांत सहकारानें मोठीं पावलें टाकलीं आहेत. विशेषतः महाराष्ट्रांत त्यानें विशेषच प्रगति केली आहे. आपल्या आर्थिक जीवनाच्या बहुतेक बाजू त्याच्या छत्राखाली आल्या आहेत. खेडेगांवीं प्रदेशांत तर विशेषच त्याचा प्रसार झाला आहे. शहरी किंवा खेडेगांवीं कामगारांपैकीं अगदीं दलित मजुरांसाहि सहकाराच्या अमृताचा लाभ होऊं लागला आहे. जंगलांतील कांहीं मजुरांसहि सहकाराच्या हितकारक गोष्टींचा परिचय झाला आहे. आपल्या राष्ट्रीय धोरणाचें सहकार हें एक अखंड अंगच होऊन बसलें आहे.

राष्ट्राच्या नियोजित उद्धारामध्यें सहकारी चळवळीस जिव्हाळ्याचें स्थान असावें, असा हल्लींच्याप्रमाणें पूर्वींच्याहि सहकारी कार्यकर्त्यांचा आग्रह होता. न्याय, समता आणि बंधुभाव ह्यानें प्रेरित असलेली राज्यघटना आतां संमत झाल्यानंतर तर ही संधि त्यांना विशेषत्वानें प्राप्त झाली आहे. परंतु सहकारी चळवळ नवी सामाजिक घडी अस्तित्वांत आणण्यासाठी उद्योगपूर्वक आणि चतुराईनें आपला वाटा उचलील तरच तिला ह्या नव्या घडींत उच्च व मानाचें स्थान मिळणें शक्य होईल. भारतांत सहकारी चळवळीचा पाया निःस्वार्थी सेवावृत्तीमुळेंच आजवर घातला गेला आहे. त्याच वृत्तीनें सहकारी कार्यकर्त्यांनीं ह्या नव्या व कठीण कामास वाहून घ्यावें, असें माझें त्यांना आग्रहाचें सांगणें आहे.

मुंबई वैकुंठ ल. मेहता,
२ ऑक्टोबर, १९५१ अर्थ व सहकार मंत्री

### अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | आर्थिक उन्नतीचा पाया ( संपादकीय ) | ३४७ |
| २ | सहकारी कार्यकर्त्यांना संदेश ( ना. मेहता ) | ३४८ |
| ३ | सहकारी संस्था आणि आर्थिक विकासाच्या योजना ( द. गो. कर्वे ) | ३४८ |
| ४ | "अर्था"ची राष्ट्रहिताची कामगिरी ( चिं. द्वा. देशमुख ) | ३४९ |
| ५ | अमेरिकेचें आर्थिक धोरण ( भा. म. काळे ) | ३५१ |
| ६ | देशाच्या प्रगतीसाठीं इंजिनिअर्सची आवश्यकता ( चिं. गो. काळे ) | ३५३ |
| ७ | भारतांतील वीज-पुरवठ्याची सद्यःस्थिति ( व्ही. के. शहा ) | ३५५ |
| ८ | औद्योगीकरणाची आजची दुर्दशा ( शं. ज. जोशी ) | ३५९ |
| ९ | औद्योगिक कंपन्यांतील ठेवींचा प्रश्न ( प. म. लिमये ) | ३६३ |
| १० | ठेव ठेवतांना कोणती दक्षता घ्यावी ? ( ग. रा. साठे ) | ३६५ |
| ११ | प्रचलित विमा कायदा ( 'निरीक्षक' ) | ३६७ |
| १२ | हिंदी संशोधक नाउमेद व निष्क्रिय कां ? ( श्री. ल. फणसळकर ) | ३७१ |
| १३ | उद्योगधंद्यांस/भांडवलाचा पुरवठा ( चिं. रा. सोनाळकर ) | ३७३ |
| १४ | लोकराज्याच्या यशासाठी औद्योगीकरण ( दि. ब. केळकर ) | ३७५ |
| १५ | आकडे नेहमींच खरा निष्कर्ष काढतील असें नाहीं | ३७८ |
| १६ | कोयना योजना कां बारगळली ( 'नरसिंह' ) | ३७९ |
| १७ | श्री. वा. पुं. वर्दे—परिचय ( सं. म. खंडागळे ) | ३८५ |
| १८ | आतां ह्या संस्था "सहकारी" कां "सरकारी ?" ( द. दि. चितळे ) | ३८७ |
| १९ | मुंबई राज्यांतील लँड मॉर्गेज बँकांची वाढ ( म. सि. पुटाणी ) | ३८९ |


### "अर्था" चा पुढील अंक

दिवाळीनिमित्त "अर्था" चे दोन अंक प्रतिवर्षीप्रमाणें बंद राहून, त्यानंतरचा अंक ११ नोव्हेंबर, १९५१ रोजीं प्रसिद्ध होईल.

## सहकारी संस्था
### आणि
## आर्थिक विकासाच्या योजना

( प्रा. दत्तात्रय गोपाळ कर्वे, एम्. ए. )

कॉंग्रेस पक्षाचें सरकार अधिकारारूढ झाल्यापासून आर्थिक विकासाच्या योजनांकडे आणि सहकारी संस्थांच्या वाढीकडे सरकारचें अधिक लक्ष जाऊं लागलें. विकासाच्या योजना आणि सहकार हीं दोन्हीं जुनींच आहेत, परंतु कॉंग्रेस पक्षाचा सहकारी संघटनेबद्दल विशेष आग्रह असल्यानें त्यांच्या प्रेरणेनें तयार झालेल्या योजनांत सहकारी संघटनेला विशेष प्रामुख्य दिलेलें आढळतें. स्वातंत्र्य प्राप्तीच्या आधीं भांडवलदारांनीं तयार केलेल्या योजना ह्या मुख्यत्वेंकरून सरकारी मदतीनें मोठमोठ्या धंद्यांची वाढ कशी घडवून आणावी ह्याबद्दल होत्या. आर्थिक वाढीचें उपांग म्हणून वाढता रोजगार किंवा वाढतें राहणीचें मान ह्यांचा त्यांमध्यें विचार केलेला होता.

सामान्य माणसाचें राहणीचें मान वाढावें, सर्व धडधाकट नागरिकांस रोजगार मिळावा, रोजगारांचें तंत्र व संघटना अशी असावी कीं त्यांमुळें निर्बल वर्गाची पिळवणूक होऊं नये, आणि सर्व नागरिकांस समान संधि मिळावी अशा समतेच्या आणि न्यायाच्या पायावर विकासाची योजना आधारण्याची आतां कोठें जरूर भासूं लागली आहे. महात्मा गांधींच्या मतप्रणालींत साधी समाजघटना, सामान्य माणसाचे हक्क व सर्वोदय ह्यांस विशेष महत्त्व दिलेलें असे. भारताच्या नव्या राज्यघटनेंत तर समतेचें तत्त्व अग्रभागीं नमूद केलेलें आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनाचा समता हा आतां सनदशीर पाया आहे. सहाजिकपणेंच आतां आर्थिक विकासाच्या ज्या योजना तयार होत आहेत त्यांमध्यें समतेकडे अधिक लक्ष दिलें जातें व सहकारी संघटनेंत समता व स्वातंत्र्य ह्यांस अधिक वाव असल्यानें त्यांचा पाठपुरावा केला जातो.

हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या राष्ट्रीय नियोजन मंडळानें आपल्या शिफारशींचा आराखडा प्रसिद्ध केला आहे. त्यांत सहकारी संघटनेला एक-दोन क्षेत्रांत विशेष महत्त्व दिलें आहे. शेतकी व ग्रामीण व लहान धंदे ह्यांच्या वाढीच्या योजनांत सहकारी तत्त्वाला मंडळानें प्राधान्य दिलें आहे. परंतु एकंदर, सर्वच योजनेच्या बुडाशीं हें अगर इतर कोणतेंही तत्त्व घट्टपणें स्थापित करणें अजून कोणत्याही योजनेच्या कर्त्यांस शक्य झालेलें नाहीं. विकासाच्या योजना व सहकारी संस्थाची प्रगति ह्यांचा तत्त्वनिष्ठ विचार करावयाचा असेल तर कांहीं प्रश्नांस सुरुवातीसच स्पष्ट उत्तरें देऊन त्यांच्या आधारावर पुढील प्रगतीचा आराखडा काढला पाहिजे.

राष्ट्राचें आर्थिक बल वाढावें आणि राहणीची सर्वसामान्य पातळी सुधारावी हीं ध्येयें सर्वच विकासाच्या योजनांत अंतर्भूत असतात. परंतु नियोजित मार्ग वाढत्या समतेकडे, आर्थिक व सामाजिक पिळवणुकीच्या नाशाकडे, आणि सर्व नागरिकांना किफायतशीर रोजगार मिळण्याकडे नेणारा असावा, ह्याबद्दल प्रत्येक योजनेंत काळजी घेतली जातेच असें म्हणतां येणार नाहीं. आपल्या सरकारच्या आर्थिक धोरणांत योजनांना विशेष महत्त्व असल्यानें त्यांचा आणि विशेषतः योजना मंडळानें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आराखड्याचा, विचार करण्यास मदत व्हावी ह्या हेतूनें समता, न्याय आणि धनोत्पादक रोजगार ह्यांच्या वाढीस पोषक होणाऱ्या संघटनेचे कांहीं विशेष नेहमीं मनांत बाळगले पाहिजेत.

# "अर्था"ची राष्ट्रहिताची कामगिरी

कोणत्याही जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडींविषयीं समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यांसंबंधीं सबोध उत्साह हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते.



भारताचे अर्थमंत्री

सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्याच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणें त्याला विशेष कठीण असतें. त्या समजून घेण्यांत त्यांना साहाय्य देणें हें आपल्या "अर्थ" या साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. "अर्थ" ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे असें मी स्वानुभवावरून दृढ विश्वासानें सांगू शकतों. योग्य तें लोक-सहाय्य मिळून "अर्था"ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणानें चालो.

नवी दिल्ली,
४ आक्टोबर, १९५१

चिं. द्वा. देशमुख

लहान प्रमाणावर शेती करणें गैरफायद्याचें आहे; ती मोठ्या प्रमाणावर करावयाची तर सहकारी, सरकारी अगर व्यापारी मंडळ्यांमार्फतच होऊं शकेल; ह्यांपैकीं शेवटले दोन मार्ग समता व स्वातंत्र्य ह्यांस विरोधक असल्यानें सहकारी शेतीचा पुरस्कार करण्यांत येतो. सहकार्यानें कार्य करण्यांत नेहमींच सामाजिक, नैतिक आणि आर्थिक फायदे अनेक असतात. त्या दृष्टीनें ही विचारसरणी योग्यच आहे. परंतु आपली मालकी व स्वातंत्र्य सोडून बारभाईच्या कारभारांत पडण्यास जी धडाडी व उमेद लागते ती समाजांत लवकर बाणेल असें वाटत नाहीं. तसेंच स्वखुषीनें लोक सहकार्य करीत नाहींत तर त्यांवर सक्ती करा असें म्हणण्यानें स्वातंत्र्याच्या आणि समतेच्या ध्येयाचा मुळांत घात होतो जेथें लहान शेतीमुळें कांहीं शेतजमीन बांधानें फुकट जाते. तेथें एकत्र शेती करण्यांत प्रत्यक्ष क्षेत्र वाढल्यानें फायदा होईल.

परंतु शेतांच्या मर्यादा इतर दृष्टीनें योग्य असल्या तर केवळ मालकाची एकंदर शेती कमी आहे हा त्याचा कमीपणा ठरतां कामा नये. किंबहुना मातब्बर शेतकऱ्याला जीं साधनें उपलब्ध असतात तीं लहान शेतकऱ्याला सहकार्यानें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. म्हणजे त्याला आपलेपणाच्या भावनेनें काम करतां येऊन त्याचें स्वातंत्र्य टिकेल, व सर्वांना रोजगार मिळण्याच्या ध्येयापासून उलट दिशेनें आपली गति होणार नाहीं. संख्या व साधनें ह्यांचें परस्पर प्रमाण सुधारून, किंवा शेतकऱ्यांनीं स्वखुषीनें संघटना करून, अगर सार्वजनिक जमीनीवर मोठ्या प्रमाणांत शेती होऊन शेतांचें सरासरी क्षेत्र वाढलें तर तें हवेंच आहे. परंतु केवळ मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक शेतीच्या पैदाशीला भुलून आमच्या मुख्य धंद्याचा "मळा" होऊं नये. मग तो सरकारी, सहकारी अगर व्यापारी, कसाही असो.

कारखान्यांची स्थितीही शेतकीसारखीच आहे. आर्थिक व्यवसायाचा घटक "व्यक्ति" असणें ही योजना कौटुंबिक व्यवसायाहून सरस आहे असें निदान सामाजिक दृष्ट्या तरी म्हणतां येणार नाहीं. धंदेवाईक कुटुंबें मोडावयाचीं, त्यांतील व्यक्तींस पगारदार व ताबेदार मजूर बनवावयाचे, आणि मग सरकारची मक्तेदारीची कारखानदारी सर्वत्र सुरू करावयाची हें धोरण विघातक आणि अदूरदृष्टीचें आहे. कारागिरांच्या कुटुंबास सहकारी आणि सरकारी मदतीनें व्यवसाय करतां येत असेल तर तो त्यांस जरूर करून द्यावा. धंद्याच्या स्वरूपामुळेंच तो कौटुंबिक रहाणें अशक्य अगर गैरफायद्याचें असल्यास तो सहकारी पद्धतीनें चालवावा. कांहीं कारणानें सहकारी पद्धतीनें कारखाना चालणें अशक्य झालें तर तो सरकारनें चालवावा.

सरकारी खात्यांत दिसून येणारी दिरंगाई, गैरहिशेबी पद्धत व कांहीं लांचलुचपत ह्यांचा उल्लेख करून कित्येक लोक कारखाना खाजगी असल्याखेरीज तो चांगला चालणार नाहीं असें सूत्र धरून बसतात. वास्तविक हे दोष मनुष्यस्वभावांतले आहेत; खाजगी धंद्यांतही ते नाहींत असें नाहीं. समाज-घटना समतेच्या, न्यायाच्या व स्वातंत्र्याच्या पायावर करावयाची असेल तर किफायतशीरपणाच्या कल्पना बदलावयाला पाहिजेत. पोटाला मिळण्याकरितां चाकरी करावयासच हवी. ती स्वतःची, अगर सहकारी बांधवांची असल्यास उत्तम; नाहीं तर जनतेची म्हणजे लोकशाही सरकारची बरी. खाजगी भांडवलदाराची

# "अर्था"ची राष्ट्रहिताची कामगिरी

कोणत्याही जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडींविषयीं समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यांसंबंधी सबोध उत्साह. हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते.

सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्याच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणें त्याला विशेष कठीण असतें.



भारताचे अर्थमंत्री

त्या समजून घेण्यांत त्यांना साहाय्य देणें हें आपल्या "अर्थ" या साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. "अर्थ" ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे असें मी स्वानुभवावरून दृढ विश्वासानें सांगूं शकतों. योग्य तें लोक-सहाय्य मिळून "अर्था"ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणानें चालो.

नवी दिल्ली,
४ आक्टोबर, १९५१

चिं. द्वा. देशमुख

लहान प्रमाणावर शेती करणें गैरफायद्याचें आहे; ती मोठ्या प्रमाणावर करावयाची तर सहकारी, सरकारी अगर व्यापारी मंडळ्यांमार्फतच होऊं शकेल; ह्यांपैकीं शेवटले दोन मार्ग समता व स्वातंत्र्य ह्यांस विरोधक असल्यानें सहकारी शेतीचा पुरस्कार करण्यांत येतो. सहकार्यानें कार्य करण्यांत नेहमींच सामाजिक, नैतिक आणि आर्थिक फायदे अनेक असतात. त्या दृष्टीनें ही विचारसरणी योग्यच आहे. परंतु आपली मालकी व स्वातंत्र्य सोडून बारभाईच्या कारभारांत पडण्यास जी घडाडी व उमेद लागते ती समाजांत लवकर बाणेल असें वाटत नाहीं. तसेंच स्वखुषीनें लोक सहकार्य करीत नाहींत तर त्यांवर सक्ती करा असें म्हणण्यानें स्वातंत्र्याच्या आणि समतेच्या ध्येयाचा मुळांत घात होतो जेथें लहान शेतीमुळें कांहीं शेतजमीन बांधानें फुकट जाते. तेथें एकत्र शेती करण्यांत प्रत्यक्ष क्षेत्र वाढल्यानें फायदा होईल.

परंतु शेतांच्या मर्यादा इतर दृष्टीनें योग्य असल्या तर केवळ मालकाची एकंदर शेती कमी आहे हा त्याचा कमीपणा ठरतां कामा नये. किंबहुना मातब्बर शेतकऱ्याला जीं साधनें उपलब्ध असतात तीं लहान शेतकऱ्याला सहकार्यानें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. म्हणजे त्याला आपलेपणाच्या भावनेनें काम करतां येऊन त्याचें स्वातंत्र्य टिकेल, व सर्वांना रोजगार मिळण्याच्या ध्येयापासून उलट दिशेनें आपली गति होणार नाहीं. संख्या व साधनें ह्यांचें परस्पर प्रमाण सुधारून, किंवा शेतकऱ्यांनीं स्वखुषीनें संघटना करून, अगर सार्वजनिक जमीनीवर मोठ्या प्रमाणांत शेती होऊन शेतांचें सरासरी क्षेत्र वाढलें तर तें हवेंच आहे. परंतु केवळ मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक शेतीच्या पैदाशीला भुलून आमच्या मुख्य धंद्याचा "मळा" होऊं नये. मग तो सरकारी, सहकारी अगर व्यापारी, कसाही असो.

कारखान्यांची स्थितीही शेतकीसारखीच आहे. आर्थिक व्यवसायाचा घटक "व्यक्ति" असणें ही योजना कौटुंबिक व्यवसायाहून सरस आहे असें निदान सामाजिक दृष्ट्या तरी म्हणतां येणार नाहीं. धंदेवाईक कुटुंबें मोडावयाचीं, त्यांतील व्यक्तींस पगारदार व ताबेदार मजूर बनवावयाचे, आणि मग सरकारची मक्तेदारीची कारखानदारी सर्वत्र सुरू करावयाची हें धोरण विघातक आणि अदूरदृष्टीचें आहे. कारागिरांच्या कुटुंबास सहकारी आणि सरकारी मदतीनें व्यवसाय करतां येत असेल तर तो त्यांस जरूर करून द्यावा. धंद्याच्या स्वरूपामुळेंच तो कौटुंबिक रहाणें अशक्य अगर गैरफायद्याचें असल्यास तो सहकारी पद्धतीनें चालवावा. कांहीं कारणानें सहकारी पद्धतीनें कारखाना चालणें अशक्य झालें तर तो सरकारनें चालवावा.

सरकारी खात्यांत दिसून येणारी दिरंगाई, गैरहिशेबी पद्धत व कांहीं लांचलुचपत ह्यांचा उल्लेख करून कित्येक लोक कारखाना खाजगी असल्याखेरीज तो चांगला चालणार नाहीं असें सूत्र धरून बसतात. वास्तविक हे दोष मनुष्यस्वभावांतले आहेत; खाजगी धंद्यांतही ते नाहींत असें नाहीं. समाज-घटना समतेच्या, न्यायाच्या व स्वातंत्र्याच्या पायावर करावयाची असेल तर किफायतशीरपणाच्या कल्पना बदलावयाला पाहिजेत. पोटाला मिळण्याकरितां चाकरी करावयासच हवी. ती स्वतःची, अगर सहकारी बांधवांची असल्यास उत्तम; नाहीं तर जनतेची म्हणजे लोकशाही सरकारची बरी. खाजगी भांडवलदाराची

नोकरी निर्भेळ लोकशाहींत मानवणार नाहीं. वहातुक व खरेदी–विक्री, ह्यांच्यांत होणाऱ्या बदलांकडेही अशाच दृष्टीनें बघावयास पाहिजे. व्यक्ति अगर कुटुंब हीं स्वायत्त होऊन त्यांचा समाज बनावा हें उत्तम; परंतु परावलंबनापेक्षां परस्परावलंबन अधिक सन्माननीय होय. जुन्या प्रकारानें व लहान प्रमाणावर होणारी वहातुक व व्यापार ज्यानें त्यानें स्वतःच्या हिंमतीवर करावा नवीन साधनांनीं अगर मोठ्या प्रमाणावर होणारी यातायात किंवा उलाढाल सहकार्यानें व्हावी. हाही प्रकार कमी पडेल, तेथें हे व्यवसाय जनतेनें समाईकपणें म्हणजे सरकारमार्फत चालवावे. समाजाचा घटक ह्या नात्यानें वागणाऱ्या नागरिकांस रानटी माणसाचें स्वातंत्र्य नको असतें परंतु आपखुषीचा सहकार पाहिजे असतो. लोकशाही समाजघटनेंत त्याला हें स्वातंत्र्य पूर्णपणें देऊन आर्थिक घटना ही खऱ्या स्वातंत्र्यास पोषक असेल अशी पूर्ण काळजी घेतली पाहिजे.

आपखुषीच्या सहकाराचा "सहकारी मंडळी" हा एकमेव प्रकार आहे असें नाहीं. व्यवहाराकरितां एकत्र येणाऱ्या मंडळींत पैशाच्या, अधिकाराच्या, वर्णाच्या, जातीच्या अगर दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेच्या मक्तेदारीच्या जोरावर एक दुसऱ्यास नाडत नाहीं अशी खात्री पाहिजे. ती मिळण्यास प्रत्येक व्यवहाराच्या अडचणीस अनुरूप असे उपाय योजावे लागतात. समतोल व्यक्तींत होणारा खाजगी व्यवहार, सहकारी संस्थेचे व्यवहार, लोकशाही सरकारचे व्यवहार, हे सर्व खऱ्या अर्थानें सामाजिक सहकार्यतंत्र मोडतात. त्यांपैकीं प्रत्येक क्षेत्रास अनुरूप असा प्रकार असेल तो उचलून धरण्यांत सहकार्याची किंवा समतेची पायमल्ली होत नाहीं. किंबहुना प्रगति विकासात्मक व चिरस्थायी करावयाची असेल तर असें निवडक, विधायक व संग्राहक धोरणच ठेवावयास हवें.




( स्थापना १९११ )
★ गरगट्टी अँड सन्स ★
शहापूर-बेळगांव
धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार.
—आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो.—

# अमेरिकेचें आर्थिक धोरण जगाला तारणार का ?

## नव्या मनोरचनेच्या गरजा लक्षांत घेण्याची आवश्यकता

( भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी. )

न्यूयॉर्क येथील वेस्टिंग हाऊस इलेक्ट्रिक इंटर नॅशनल कंपनी-तर्फे ता. १४ मार्च, १९५१ रोजीं न्यूयॉर्क येथें हिंद, पाकिस्तान, सीलोन, ब्रर्मा, या देशांच्या आर्थिक परिस्थितीबद्दल एक चर्चा करण्यांत आली. त्या वेळीं एका वक्त्यानें अशा आशयाचें विधान केलें कीं आज जगांत सुमारें ६० कोटी लोक असे आहेत कीं ज्यांना आपण अमेरिकेच्या बाजूचे समजूं, ८० कोटी लोक अमेरिकेच्या विरुद्ध आहेत, व आणखी ७० कोटी लोक धड अमेरिकेच्या बाजूचेहि नाहींत किंवा अमेरिकेच्या विरुद्धहि नाहींत, तर ते दरम्यान कोठें तरी आहेत, व हिंदचा समावेश याच ७० कोटी लोकांत करतां येईल. या विधानांत व्यक्त होणारें मत एका अमेरिकन तज्ज्ञाचें आहे व तें सामान्यतः खरें असून अमेरिकेचें धोरण जगाला तारणार किंवा नाहीं याचें उत्तर शोधून काढण्याच्या दृष्टीनें मार्गदर्शक आहे. अमेरिकेजवळ आज राष्ट्र या नात्यानें इतरांवर दडपण आणणारी एक निश्चित भूमिका आहे व याच भूमिकेच्या जोरावर पहिल्या महायुद्धानंतर व विशेषतः गेल्या नऊ वर्षांत अमेरिकेला कांहीं विशिष्ट महत्त्व प्राप्त झालें आहे.

### अमेरिकेचें अलिकडच्या काळांतील कार्य

दुसरें महायुद्ध लढविणें व त्यांत यश मिळविणें या गोष्टी अमेरिकेनें आपल्या बाजूच्या राष्ट्रांना निरनिराळ्या प्रकारें केलेल्या मदतीमुळें व स्वतःच्या प्रत्यक्ष लष्करी व युद्धतयारी या दृष्टीनें केलेल्या कर्तबगारीमुळें शक्य झाल्या. दुसरें महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटन व पश्चिम युरोप यांना कर्ज व मार्शल योजना या नांवाखालीं दिलेल्या मदतीमुळें पश्चिम युरोपला आपलें औद्योगिक जीवन बरें-चसें सुधारतां आलें. अमेरिकेच्या नेतृत्वामुळेंच अनेक आंतर-राष्ट्रीय संस्था स्थापन झाल्या व त्या कांहीं प्रमाणांत उपयुक्त कार्य करीत आहेत. आशियांतील औद्योगिक दृष्ट्या मागसलेल्या राष्ट्रांबद्दल विशेष तऱ्हेचें अगत्य अमेरिकेनें दाखविलें आहे. त्यामुळें या देशांच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी करण्यांत येऊन त्यावर स्थूलमानानें उपाययोजना सुचविण्यांत आली आहे. नुकतेंच हिंदला २० लक्ष टन गहूं अमेरिकेनें कर्जरूपानें देऊन संकटाच्या काळांत हिंद सरकारची एक महत्त्वाची अडचण थोडीशी दूर केली आहे. कोलंबो योजनेंतहि मदत करावयाचें अमेरिकेनें मान्य केलें आहे. जपानशीं करण्यांत आलेल्या तहामुळेंहि आशिया खंडांतील परिस्थिति सुधारण्यास अमेरिकेनें मदत केली असून जर्मनीच्या बाबतींतहि अमेरिकेचें धोरण सहानुभूतीचें आहे. या सर्व गोष्टी अमेरिकेच्या बाजूनें आर्थिक दृष्ट्या उल्लेखनीय मानावयास हरकत नाहीं; व त्या निःसंशय अमेरिकेच्या सक्रिय सदिच्छेच्या निदर्शक आहेत.

### अमेरिकेनें आपलें अंतस्थ धोरण बदललें आहे का ?

वर उल्लेखिलेल्या गोष्टी प्रशंसनीय असल्या तरी जागतिक आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें अमेरिकेनें आपलें मूलभूत आर्थिक धोरण बदललें आहे किंवा नाहीं याची छाननी करणें जगाच्या आर्थिक इतिहासाच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. विशेषतः पहिल्या महायुद्धाच्या अखेरपर्यंत अमेरिकेचें धोरण आर्थिक व त्यांतल्या त्यांत विशेषतः परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत पूर्णपणें एकलकोंडे-पणाचें होतें, व १९१९ नंतरहि तेंच धोरण बऱ्याच प्रमाणांत चालू होतें. एवढेंच नव्हे तर १९२९ नंतर उद्भवलेल्या जागतिक आर्थिक मंदीचीं बीजें अमेरिकेनें स्वीकारलेल्या व्यापारी धोरणांतच आढळतात. जगाला आपला माल विकावयाचा परंतु उलट जगाकडून आपण माल शक्य तितक्या कमी प्रमाणांत विकत घ्यावयाचा, स्वतःच्या देशाच्या व्यापाराच्या संरक्षणासाठी जकातीच्या तटबंदी उभारावयाच्या व जणूं कांहीं इतर देशांची औद्योगिक प्रगति होऊन त्यामुळें शक्य होणाऱ्या वाढत्या परराष्ट्रीय व्यापाराची कोंडी करावयाची, अशा प्रकारचें धोरण १९१९ नंतरच्याहि काळांत अमेरिकेनें स्वीकारलें व तेंच धोरण दुसरें महायुद्ध संपल्यानंतरच्या काळांत अमेरिकेनें कांहीं प्रमाणांत चालू ठेवलें आहे. जागतिक व्यापार वाढावा या हेतूनें दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेनें आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना निर्माण करून तिच्यामार्फत जगांतील देशांत खुला व्यापार सुरू करावा अशी विचारसरणी पुढें मांडली. अनेक परिषदा होऊन हॅवाना चार्टर तयार करण्यांत आला, परंतु याहि चार्टरला अनेक कारणांमुळें जगांतील राष्ट्रांची संमति न मिळाल्यामुळें आज हा सर्व खटाटोप जवळजवळ व्यर्थ ठरला आहे. असें घडण्याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे जागतिक खुल्या व्यापाराची भाषा बोलतांना अमेरिकेनें आपलें जुनें व्यापारी धोरण तसेंच पुढें चालू ठेवलें व अमेरिकेचा व्यापार जकातीच्या तटबंदीखालीं सुस्थितींत चालत होता. दुसऱ्या महायुद्धानंतर यंत्रसामुग्री व उपभोग्य माल यांची इतर देशांकडून मागणी भरमसाट वाढल्यामुळें व स्वतः अमेरिकेनें कर्ज देऊन आपला माल इतरांनीं विकत घेणें शक्य केल्यामुळें अमेरिकेचा व्यापार वाढतच गेला व व्यापाराच्या या एकतर्फी स्वरूपामुळेंच १९४७पासून डॉलर टंचाई जाणवूं लागली, व तिचे तीव्रतेनं चटके बसूं लागल्यामुळें ब्रिटन, हिंद, इत्यादि स्टर्लिंग गटांतील २४ राष्ट्रांना आपल्या चलनाची किंमत उतरवावी लागली. या विवेचनावरून अमेरिकेचें व्यापारी धोरण जगाला तारणारें नाहीं, हें समजून येईल. जून, १९५० नंतर कोरियन प्रकरणामुळें युद्ध तयारी व साठेबाजी या गोष्टी अमेरिकेनें केल्यामुळें आशियांतील देशांतून मोठी निर्यात अमेरिकेकडे झाली. परंतु अमेरिकेनें केलेली ही खरेदी परिस्थितीच्या दडपणामुळें होती, सामान्य व्यापारी धोरण म्हणून नव्हे, ही गोष्ट अमेरिकेचें व्यापारी धोरण समजून घेतांना लक्षांत ठेवली पाहिजे. व्यापारी देणीं भागविण्यासाठीं १९५०–५१ या वर्षीं अमेरिकेला थोडेसें सोनेंहि इतर देशांकडे पाठवावें लागलें, असा उल्लेख रिझर्व्ह बँकेच्या १९५०–५१ च्या अहवालांत आहे. या व्यापारी धोरणाच्याच दृष्टीनें विचार करण्यासारखी अमेरिकेबद्दलची आणखी एक गोष्ट म्हणजे गेलीं तीन–चार वर्षें हिंदमध्यें भांडवलाची विशेष रीतीनें टंचाई भासत असतांना व भांडवल गुंतवण्याबद्दलच्या अटी व त्याबद्दल वक्तव्यें इ. अनेक वेळां केलीं जात असतांना, हिंदमध्यें केवळ नाममात्र अमेरिकन भांडवल गुंतविलें जाऊं शकलें, ही घटना होय. अमेरिका अल्प व्याजाच्या अटकळीनें औद्योगिक भांडवल केवळ मदत करण्याच्या निर्हेतुक दृष्टीनें इतर मागासलेल्या देशांत गुंतवावयास तयार नाहीं हें दिसतें.

राजकारणांतील एक नाजुक मुद्दा

अमेरिकेचें व्यापारी व आर्थिक धोरण वरील विवेचनावरून स्पष्ट होईल, व हें धोरण मागासलेल्या देशांना औद्योगिक प्रगति करावयास फारसें पोषक होईल असें नाहीं, किंवा अमेरिकेनें इतर देशांपासून शक्य तितकी कमी खरेदी करण्याचें व्यापारी धोरणहि तत्त्वतः बदललें नाहीं. परंतु आज अमेरिकेनें राजकारणाच्या दृष्टीनें एक नवीन भूमिका स्वीकारली आहे व ती म्हणजे कॉम्युनिझमची लाट थोपवून धरणें व कॉम्युनिस्टांच्या प्रसाराला शक्य तितका, कांहींहि झीज सोसून विरोध करणें. कोरियन प्रकरणावरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट झाली आहे. चीनच्या बाबतींतलें पूर्वीचें अमेरिकेचें धोरण प्रसिद्ध आहेच. हिंदनें आपलें परराष्ट्रीय धोरण अमेरिकेसारखेंच ठेवलें असतें तर कदाचित् २० लक्ष टन गहूं अंशतः देणगीच्याच रूपानें मिळूं शकला असता. रशियाच्या बाबतींतलें धोरण विचारांत घेऊनच अमेरिका कोणत्याहि देशाला मदत करूं शकते. कॉम्युनिझमची वाढ होऊं न देणें हें अमेरिकेचें राजकारणांतील मुख्य धोरण आहे. धोरणाचें हें मुख्य सूत्र ध्यानांत ठेवूनच, अमेरिका इतर देशांशीं संबंध ठेवीत असते. आग्नेय आशियांतील मागासलेल्या राष्ट्रांबद्दल अमेरिकेला जिव्हाळा वाटतो, त्याच्या मुळाशीं हेंच राजकारण आहे.

आजच्या काळांत, १९ व्या शतकांतील ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यशाहीचें धोरण पूर्णपणें मागें पडलें आहे. यापुढें अशा साम्राज्यशाहीची भाषा कोणी बोलणार नाहीं. विसाव्या शतकांत लोकशाहीचें तत्त्व मान्य झालें आहे, व ही लोकशाही जुन्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर अधिष्ठित असावी कीं ती पूर्णपणें साम्यवादी स्वरूपाची असावी हा जगापुढें प्रश्न आहे. साम्यवादी लोकशाही शुद्ध स्वरूपांत टिकूं शकत नाहीं व तिचें रूपांतर लौकरच वैयक्तिक हुकूमशाहींत व इतर प्रश्नांना पूर्णपणें दडपून टाकण्यांत होतें, असा अनुभव रशियांत आला आहे. लोकशाही व समाजवादाकडे झुकणारें धोरण अशी ब्रिटनची विचारसरणी आहे. ब्रिटनचें धोरण कॉम्युनिस्टविरोधी असलें तरी तें जुन्या पद्धतीच्या अनिर्बंध भांडवलशाहीला उचलून धरणारेंहि नाहीं. आर्थिक परिस्थितीच्या दुबळेपणामुळें कांहीं बाबतींत अमेरिकेशीं सहकार्य ब्रिटनला करावें लागतें. अमेरिकेंत लोकशाही असली तरी अजून तेथें निग्रोंची परिस्थिति समाधानकारक नाहीं. मजुरांच्या चळवळींना व प्रश्नांना तेथें महत्त्वाचें स्थान नाहीं, व विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळें जुन्या पद्धतीची भांडवलशाही अर्थव्यवस्था तेथें यशस्वी झाल्यामुळें, जगांतील मध्यम परिस्थितींतील किंवा मागासलेल्या देशांतील जनतेचे आर्थिक प्रश्न काय आहेत व लोकशाहीच्या वातावरणांत हे प्रश्न कसे सोडवावे, याबद्दल अमेरिकन विचारसरणी किंवा मदत कितपत उपयुक्त होईल, याबद्दल शंका वाटते.

सारांश

सारांश, जागतिक लोकसंख्येच्या सहा टक्के लोकसंख्या असलेल्या अमेरिकेंत जगांतील सुमारें निम्में औद्योगिक उत्पादन होत असतें. जागतिक सुवर्णसाठ्यापैकीं ७० टक्के सांठा अमेरिकेजवळ असला व अमेरिकेंतील राहाणीचें मान जगांत सर्वांत उच्च दर्जाचें असलें तरी अमेरिकेनें स्वीकारलेलें व्यापारी धोरण इतर देशांना उत्तेजनपर व त्यांचा औद्योगिक विकास घडवून आणण्यास मदत करील असें नाहीं. औद्योगिक भांडवल सामान्यरीतिनें मागासलेल्या देशांत अमेरिका गुंतवील असेंहि नाहीं. कॉम्युनिझमला प्रतिबंध करण्यासाठी अमेरिका मदत करील. परंतु एखाद्या मागासलेल्या देशानें अशी अमेरिकेची मदत स्वीकारली तरी पुढें अशा गरीब देशानें अंतर्गत आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठीं अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून राहणें केव्हांहि फारसें शहाणपणाचें ठरणार नाहीं. चीनचा अनुभव आपणासमोर आहेच. विशिष्ट परिस्थितींत अमेरिकेला जगाच्या राजकारणावर वर्चस्व मिळवतां आलें, परंतु जगांतील बहुतेक देशांत लोकशाहीच्या कल्पनेचा प्रसार झाल्यामुळें, व त्याच वेळीं जगांतील पुष्कळसे देश औद्योगिक दृष्ट्या, अगदीं खालच्या पातळीवर असल्यामुळें खाजगी भांडवलशाहीकडे झुकणारें अमेरिकेचें धोरण मागासलेल्या देशांची उन्नति घडवून आणण्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरेल किंवा नाहीं याबद्दल शंका वाटते. युद्धप्रयत्न, ॲटम बॉंबसाठी खर्च, इ. अनेक प्रकारें अमेरिका जो अब्जावधि रुपयांचा खर्च करीत आहे त्याचा थोडासा अंश जरी आग्नेय आशियांतील मागासलेल्या देशांना औद्योगिक भांडवलासाठी मिळूं शकेल तरी मानवजातीच्या कल्याणांत फार मोठी भर पडेल. हें बोलणें सोपें आहे, परंतु युद्धप्रवृत्ति जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत या भाषेला व्यावहारिक दृष्ट्या कांहींच अर्थ नाहीं. अमेरिकेचें धोरण या मूलभूत गोष्टीनें मर्यादित झालें आहे, व आपल्या व्यावहारिक धोरणांत जोंपर्यंत अमेरिका नवीन मनोरचनेच्या गरजा लक्षांत घेऊन बदल करूं शकत नाहीं, तोंपर्यंत अमेरिकेकडून विशेष आशा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.


दि गोरेगांव को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

गोरेगांव, जि. कुलाबा.

स्थापना ता. २३।३।१९४९

दिवाळी व नवीन वर्ष बँकेच्या ठेवीदारांस, सभासदांस व हितचिंतकांस उत्कर्षाचें जावो.

अयुबसाो. कुर. बी. कॉम्.
चेअरमन

धी पेण तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, लि.

पेण, जि. कुलाबा.

स्थापना तारीख २५-४-४५

नवीन वर्ष व दिवाळी संघाच्या शेतकरी व नागरिक सभासदांना व हितचिंतकांना उत्कर्षाची जावो.

वि. स. गुमास्ते — मॅनेजर
ग. ह. मनोहर — चेअरमन

# देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणासाठी इंजिनिअरांची आवश्यकता

## इंजिनिअरिंग पदवीचें अर्थशास्त्र

( चिंतामण गोविंद काळे, बी. ए., बी. एस्सी., बी. ई., एम. आय. ई., सी. आय. ई., सेवानिवृत्त चीफ इंजीनिअर, मुंबई राज्य व प्राध्यापक, न्यू इंजीनिअरिंग कॉलेज, सांगली. )

सन १९४७ पर्यंत स्थापत्यशास्त्र व तत्सम यांत्रिक शास्त्रांत विश्वविद्यालयीन पदवीपर्यंत शिक्षण देणारी संस्था मुंबई प्रांतांत एकच होती व आज तसेंच शिक्षण देणाऱ्या एकंदर ७ संस्था चालू आहेत. त्या सर्वांमधून उत्तीर्ण होणारे पदवीधर चरितार्थाकरितां काय करणार ? बेकारी नक्की होणार हें उघड आहे. असे प्रश्न व विचार पुष्कळ समंजस व विश्वविद्यालयीन शिक्षणतज्ज्ञ लोक पुढें आणीत आहेत व या शिक्षणावर होणारा खर्च कितपत देशोपयोगी व उपकारक होईल अशी शंका दर्शवितात. संतोषाचीं चिन्हें एवढींच आहेत कीं, वरील संस्था चालविणारे व त्यांमध्यें आपलीं मुलें व मुली धाडणारे फारसे पालक उपरोक्त शंकेखोरांमध्यें नाहींत.

वास्तविक वरील प्रश्न कोणत्याहि पदवीधरांना लागू धरतां येईल व येतोच; पण तो इंजीनिअर पदवीधरांना कशा प्रकारें संबंधित आहे हें पाहणें आहे. असें सांगण्यांत येतें कीं इंजीनिअरिंग पदवीचा अभ्यासक्रम दीर्घ असतो; तें शिक्षण देणाऱ्या संस्था फारच खर्चाच्या—भांडवली व चालू—असतात व तें शिक्षण घेणें कष्टाचें व महाग पडतें. इतर आक्षेप म्हटलें, तर स्थापत्यशास्त्रज्ञ इतर व्यवसायांस फारसे उपयोगी पडणारे नसतात; त्यांचें शिक्षण विशिष्ट तऱ्हेचें असतें व त्यांना योग्य असलेलीं कामें भरभराटीच्या काळांत व श्रीमान् देशांतच मिळूं शकतात, वगैरे.

### शिक्षणक्रमावरील खर्च

स्थूलमानानें वरवर पहातां कोणत्याहि शिक्षणक्रमावरील रास्त खर्च किंवा तो पुरा पाडण्यास लागणारा योग्य काळ, तो क्रम हस्तगत केल्यानंतर पुढील आयुष्यांत मिळणाऱ्या प्राप्तीशीं विसंगत किंवा विषम प्रमाणांत असूं नये. विश्वविद्यालयीन शिक्षण केवळ ज्ञानार्जनाकरितां घ्यावें हा मुद्दा या विवेचनांतून वगळणें बरें व तद्वतच कोणतेंहि शिक्षण समाजांतील गरीब व श्रीमंत लोकांना सारख्याच सुलभतेनें घेतां यावें हाहि मुद्दा बाजूलाच ठेवावा; कारण कोणताहि शिक्षणक्रम घ्या ; त्यामध्यें प्रवेश मिळविण्याकरितां खटपट करणारांची संख्या उपलब्ध तरतुदीपेक्षां नेहमीच अधिक आढळते.

इंजिनियरिंग पदवी महाग पडते तें कसें व ती कितपत हें बघणें इष्ट आहे. विश्वविद्यालयीन इंटरपर्यंतचें शिक्षण सर्वच पदव्यांना ( शेतकी वगळल्यास ) घ्यावें लागतें. त्यापुढें कला, शास्त्रें किंवा कायदा या पदव्या घेण्यास २ वर्षें पुरीं पडतात, पण इंजिनिअर होण्यास आज ३½ वर्षें लागतात व पुढें ३ वर्षें लागतील. कारण, मुंबई व गुजराथ विश्वविद्यालयांनीं बी. ई. चा शिक्षणक्रम तीनच वर्षांचा मुकर केला आहे व पुणें विश्वविद्यालय लौकरच तसें करील असें वाटतें. म्हणजे, एस. एस. सी. नंतर बी. ए. किंवा बी. एस्सी. होण्यास ४, तर बी. ई. होण्यास ५ वर्षें लागणार. महाविद्यालयांतील फीचें सरासरी प्रमाण हिशेबी धरल्यास, बी. ई. होण्यास बी. ए. व बी. एससी.पेक्षां खालीलप्रमाणें अधिक खर्च पडतो:—

२ वर्षांची जादा फी = रु. २५० [(रु. ४२५ रु. – ३००) × २]
१ वर्ष संबंध फी = रु. ४२५ ( यांत जिमखाना वगैरे सामील आहेत. )
१ वर्ष वसतिगृहांतील रहाणें = रु. ७००
उपकरणें, पुस्तकें, शिक्षण सहली वगैरे = रु. ३००

---

एकूण खर्च रु. १,६७५

हा झाला ५ वर्षांच्या शिक्षणक्रमाचा. ५½ वर्षें सध्यां आहेत तीं धरल्यास जादा खर्च ( २१३ + ३५० ) रु. ५६३ होईल म्हणजे वट्ट रु. २,२३८.

इंजिनिअर ३० वर्षें नोकरी करील, व व्याजाचा दर शें. ४ धरल्यास, रु. २२३८ मुद्दल व त्यावरील व्याज फेडण्यास दरमहा रु. ११ हप्ता भरावा लागेल.

वरील ढोबळ विवेचनावरून असें दिसेल कीं, बी ई. इंजिनियरला बी. ए. किंवा बी. एससी. पेक्षां अधिक महिना प्राप्ती कमींत कमी रु. ११ हवी व तशी ती आजच्या बाजारभावाप्रमाणें पडतही आहे. बी. ए. ला रु. ८० व बी ई. ला किमान रु. १५० महिना पगार मिळतो. तेव्हां स्थापत्यशास्त्र, यांत्रिक किंवा विद्युत् पदवी घेणें आंतबट्ट्याचें नाहीं, हें उघड आहे.

### युद्धकालांत इंजिनिअर्सचें महत्त्व

स्थापत्य, यांत्रिक किंवा विद्युत् धंदे शिक्षण थोडें भांडवलाच्या बाजूनें महाग आहे यांत वाद नाहीं पण केवळ त्याच कारणाकरितां तें शिक्षण कमी प्रमाणांत द्यावें असें सुचविणें कोणत्याही स्वतंत्र देशाला मारकच होईल. स्वातंत्र्य टिकविणें, उद्योगधंद्यांत स्वयंपूर्ण होणें म्हणजे देश सामर्थ्यवान् असणें जरूर आहे. आजूबाजूला युद्ध सुरूं झाल्यास तटस्थपणा राखणें फारच थोड्या देशांना साधतें व आपल्यासारख्या मागासलेल्या देशाला तें कितपत व कोठवर शक्य आहे हें भविष्यकाळच दाखवूं शकेल. राष्ट्रहिताची किंवा संरक्षणाची तरतूद वाईट परिस्थिती येईल असें समजूनच शहाणा मुत्सद्दी करीत असतो. युद्धाचा समय आलाच तर अल्प काळांत संरक्षणाचीं साधनें व वाटा तयार होणें दुरापास्त. अलीकडील लढायांना सैन्याचे बरोबरीनें किंवा अधिक प्रमाणांत यंत्रें, पूल, रस्ते, रेल्वे, बंदरें वगैरे उपयोगी पडतात. पूल व रेल्वे बांधणें हें जसें एक शास्त्र आहे, तसेंच ते पाडणें हेंहि एक शास्त्रच आहे. कोणतेंही लढाईचें वृत्त वाचलें तर असें दिसतें कीं, तीमध्यें पुढें इंजिनिअर, मध्यें सैन्य व मागें डॉक्टर असा क्रम लागतो. गेल्या महायुद्धांत व तदनंतर पडझड झालेलीं घरें पार पाडणें किंवा तीं बिनधोक्याचीं करणें, चालचलाऊ नवीं घरें बांधणें हें एक अवाढव्य व जबाबदारीचें काम होऊन बसलें व तेथें इंजिनिअरांची उणीव भासूं लागली. तसेंच बंद पडलेला किंवा नवा पाणीपुरवठा सुरू करणें, पूल व रेल्वे रस्ते दुरुस्त करणें,

बंदरें व गोद्या कार्यक्षम ठेवणें, सुयारें खोदणें, अशा प्रकारचीं कित्येक जुन्या व नवीन घर्तीचीं बांधकामें इंजीनिअरांचे शिरीं-वर पडली. १९४७ पर्यंत वरील तऱ्हेच्या जबाबदारीची आपणांस फारशी निकट कल्पना आली नाहीं; या उप्पर ती प्रकर्षानें आली पाहिजे व दहा वर्षांनंतर कोणीं असें म्हणूं नये कीं "याची कल्पनाच आम्हांला आली नाहीं." या कामीं इंजीनिअरच उपयोगी पडणार. म्हणून त्यांची संख्या, त्यांचा दर्जा व त्यांचें कौशल्य वाढविणें आवश्यक आहे.

### शांततेचा काळ, हा तयारीचा काळ

शांततेचा काल म्हणजे तयारीचा व प्रगतीचा. प्रत्येक राज्य व मध्यवर्ती सरकार त्रैवार्षिक, पंचवार्षिक व लांब पल्ल्याच्या योजना आंखीतच आहे. पण त्या तयार करतांना किती व कोणत्या तऱ्हेचे तज्ज्ञ लागतील ह्याचाहि विचार होणें जरूर आहे, पण तसें होत नाहीं. पुष्कळांना व मोठ्या अधिकाऱ्यांना देखील तसें ऐकाविणें आवडत नाहीं, कीं प्रत्येक योजनेमागें (म्हणजे खरें पुढेंच) इंजीनिअर हा हवाच. श्रीगणपतिपूजन किंवा पाया खोदाई सुरू करण्याचा समारंभ एक वेळ न केला तरी चालेल, पण इंजीनिअर शिवाय भाषणें अशक्य. शाळा, दवाखाने, देवळें, रस्ते, महाविद्यालयें, शहर–रचना, पाणीपुरवठा, उद्यानें, कोणतीहि योजना घ्या तिचा ओनामा इंजीनिअरच करूं शकतो. कारण नकाशे, अंदाजखर्चाचा आंकडा व बांधणी इंजीनिअरनें केल्यावर मगच त्या योजना अस्तित्वांत येणार! तेव्हां लोकोपयोगी किंवा विकास–योजना जितक्या मोठ्या प्रमाणांत आपण हातीं घेऊं त्याच प्रमाणांत अधिक इंजीनिअर आगाऊ तयार केले जावेत हें उघड आहे. योजना ठराविक मुदतींत पुऱ्या न होण्याचें कारण पैशाचा अभाव नसून कार्यक्षम व पुरेशा इंजीनिअरांचा तुटवडा! कांहीं प्रसंगीं उत्तरोक्त कारण अवगत असूनहि योजना फुगविल्या जातात, त्याचीं कारणें फारच वेगळीं असतात. अगदीं अलीकडील मध्यवर्ती पंचवार्षिक योजनेमध्यें १५०० कोट रुपये नानाविध बांधकामांवर खर्च पडणार व तीं कामें स्थानिक व एतद्देशीय इंजीनिअराकरवीं करणें झाल्यास आतांपेक्षां त्यांची संख्या कितीतरी वाढली पाहिजे. तसें शक्य नच झालें तर "आम्हांस वेळेवर योग्य सल्ला व धोक्याची सूचना मिळाली नाहीं" हें खापर अधिकारी इंजीनिअरवर्गाचे डोक्यावर फुटणारच!

### संख्या वाढली तर उपकारकच ठरेल

कोणत्याहि यांत्रिक धंद्यांत सुरस असल्याखेरीज त्या धंदे-वाल्यांत प्रगति होत नाहीं, शिथिलता रहाते व कार्यक्षम माणसें निघत नाहींत. एकाऐवजीं सहा माणसें तेंच काम करण्याजोगीं तयार असलीं म्हणजे विविध तऱ्हेनें कामें करण्याच्या युक्त्या व क्लृप्त्या निघतात; व तज्ज्ञांचा भावहि सहाजिकच मर्यादेंत रहातो. चाकोरींतून जाण्याचे दिवस व मनोवृत्ति आपल्या देशांतून जितकी शीघ्रतेनें जाईल तितकें उत्तम व या चढाओढीच्या युगामध्यें जे लोक खरेच हुषार, चलाख, कार्यक्षम व कल्पक असतील तेवढेच पुढें येणार व यावेत. इंजीनिअरांची संख्या वाढली तर त्यांमध्यें जरूर व अवश्य वाटणारी सुधारणा खात्रीनें होईल व बांधकामाचा दर्जा वाढेल हें खास.

बरें, इतर पदवीधरांप्रमाणें बी. ई. इंजीनिअर कांहीं काळ बेकार झाले तर त्यांत भिण्याजोगें काय आहे? इतरांप्रमाणें त्यांनाहि चांगले व वाईट दिवस पहाणें योग्यच आहे. आज कित्येक धंदे व नोकऱ्या अशा आहेत कीं तेथें बी. ए. च्या पेक्षां बी. ई. सरस काम करूं शकेल. ज्या कामांत किंवा उद्योगांत पदवी अवश्य नाहीं तीं पदवीधर करूं लागतील व त्याचीं ताजी उदाहरणें वाढत्या प्रमाणांत नजरेस येतात व असें नाहीं झालें तरच आश्चर्य. नाहीं तर शिक्षणाचा उपयोग काय व सर्वांगीण सुधारणा व प्रगति कशी होणार? बी. ए. किंवा बी. एससी. पेक्षां बी. ई. ना कितीतरी विविध व अधिक विषयांचें ज्ञान दिलेलें असतें. मार्ग हुडकून काढण्याची नड भासली म्हणजेच नवे व उत्तमोत्तम मार्ग व वाटा सांपडतात. पदवीधर इंजीनिअरचें शिक्षण म्हणजे हातांनीं कामें करण्याची संवय व धमक, स्वावलंबनाचे धडे, प्रात्यक्षिकें, क्लृप्त्या, युक्त्या यांची जाणीव व दीर्घकाळ न दमतां उद्योगांत रहाण्याची संवय! हे गुण जर व्यवहारांत उतरविता आले नाहींत व एकादा पदवीधर इंजीनिअर बेकार राहिला तर त्याचा दोष शिक्षणक्रमाकडे कां असावा?


## पनवेल तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

**पनवेल–कुलाबा.**

स्थापना २९–३–४४.

नवीन वर्ष व दिवाळी संघाच्या शेतकरी व नागरिक सभासदांना व हितचिंतकांना उत्कर्षाची जावो.

द्वा. ना. लिखिते — मॅनेजर
गो. ना. सोहनी — चेअरमन

कोल्हापुरांतील प्रतिष्ठित सराफ व नागरीक यांनीं चालविलेली

## दि सराफ बँक ऑफ कोल्हापूर लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| विक्री झालेलें भांडवल | ५,००,००० रु. |
| वसूल भांडवल | २,५०,००० रु. |

खेळतें भांडवल ५,००,००० रुपयांचे वर

★ चालू सेव्हिंग्ज व मुदतींच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

★ ३ व ५ वर्षे मुदतीच्या मंथलि फिक्स्ड डिपॉझिट खात्यावर दर म. ५ रुपयांपासून ठेवी स्वीकारण्याची नवीन सवलत.

★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

**समक्ष भेटा अगर लिहा.**

४७४ सी, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर.

रा. ग. कदम. मॅनेजिंग डायरेक्टर.

# भारतांतील वीज–पुरवठ्याची सद्यःस्थिति

( श्री. व्ही. के. शहा, एम. एस्सी. ( बॉबे ), एस. एम. ( एम. आय. टी., यू. एस. ए. ) ए. एम. अमे. इ. इ. इ., मॅनेजर, दि पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि. )

विजेच्या ग्राहकांना वीज–कपात आतांच जाणवूं लागली आहे. परंतु ज्यावेळीं वीजकपातीची कल्पनाहि नव्हती अशा वेळीं, मे महिन्यांत, प्रस्तुत लेख लिहिलेला आहे. चालू वर्षी पाऊस अपुरा पडल्यामुळें टाटा–जी. आय. पी. मिळून वजिगृहांची उत्पादन-क्षमता २५% कमी होईल आणि त्यामुळें विजेचा घरगुती, व्यापारी व औद्योगिक वापर १५ ऑक्टोबर रोजीं सरकारनें काढलेल्या हुकुमाप्रमाणें ३३⅓% कमी करावा लागेल. त्या तारखेपासूनच ह्या कपातीची अम्मलबजावणी व्हावयाची आहे.

मुंबई–पुणें भागांतील विजेच्या मागण्या लक्षांत घेऊन नवीन वाफेच्या वीज-यंत्रांची मागणी करावी; जलशक्तीला बाष्पशक्तीचा जोड म्हणून उपयोग खात्रीनें होईल, असें ' मुंबई राज्य ' ह्या शीर्षकाखालीं पुढें म्हटलें आहे, त्याची आतां प्रचीती येत आहे. अशी उत्पादनशक्तीची वाढ सध्यां अनुभवीत असलेल्या पावसाच्या अभावाचे वेळीं उपयोगीं पडण्याजोगी झाली असती. सरकारनें आतां मळमपट्टीचें धोरण टाकून देऊन, आधीं मागविलेल्या यंत्रसामुग्रीचे जोडीस आणखी १,००,००० कि. वॅ. शक्तीची सामुग्री तात्काळ मागवावी. म्हणजे मागणी जसजशी वाढेल, तसतसा पुरवठा होऊं शकेल. सध्यांप्रमाणें मागणीला पुरवठा होईपर्यंत ह्याबाबत तिष्ठत बसावें लागणार नाहीं. तरी पण, कोयना योजनेस अद्याप मंजुरी नाहीं आणि त्याबाबत निर्णय झाल्यावरहि योजनेचें फळ मिळूं लागण्यास किमान ८ ते १० वर्षे लागतील. ह्या मुदतींत मुंबई-पुणें विभागाची वीजपुरवठ्याची भूक अतृप्त राहूं नये, ह्यासाठी बाष्पशक्तीची यंत्रसामुग्री ताबडतोब मागविण्यांत येणें अत्यावश्यक आहे. अर्थात्, मधल्या अडचणींवर तोडगा म्हणून सरकारी निर्बंध जरूरच आहेत आणि जनतेनें उजेड, पंखे, घरगुती व व्यापारी व्यापर, ह्यासाठीं होणाऱ्या विजेच्या खर्चांत बचत करण्याचे कामीं हार्दिक सहाय्य करावें, हें उचित आहे. त्यामुळें औद्योगिक उपयोगासाठी कारखान्यांना वीजपुरवठा ज्यास्त प्रमाणांत चालू राखतां येईल.

इतके दिवस आपणांस मागूं त्या वेळेलां व मागूं तितका वीज-पुरवठा कोणताही त्रास न पडतां होऊं शकत असे. परंतु हल्ली अगदीं त्याच्या उलट परिस्थिति निर्माण झाली आहे. ज्यावेळीं एकादी गोष्ट सुलभतेनें मिळत नाहीं, त्यावेळीं साहाजिकच आपण विचार करूं लागतों, व तात्पुरतें कां होईना पण त्या गोष्टीला महत्त्व येतें. विजेच्या वापरावरून मनुष्याच्या अगर एकाद्या देशांतील सुधारणांचें मोजमाप जर ठरवलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. नवीन नवीन लागत असलेल्या शोधांमुळें विजेचा वापर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत हल्ली आवश्यक होऊं लागलेला आहे. त्याचप्रमाणें, विजेचा वापर आतां शहरांपुरताच मर्यादित राहिला नसून सुधारलेल्या राष्ट्रांत खेडोपाडींहि शेतीसाठी सुद्धां विजेचा वापर हल्ली होऊं लागला आहे. आपल्या दैनंदिन व्यवहारांत जर उजेड, सिनेमा, रेडिओ, टेलिफोन, तारायंत्रें, हीं सध्या उपलब्ध नसतील तर आपलें जीवन कसें नीरस होईल याची कल्पना सुद्धां करवत नाहीं. खालीं दिलेल्या कोष्टकावरून इतर देशांशीं तुलना करतां आपल्या देशांत विजेचा वापर किती होतो, व आपण त्या बाबतींत अद्यापहि किती मागें आहोंत, याची कल्पना येईल.

ह्या कोष्टकावरून आपणांस असें दिसून येईल कीं हिंदुस्थानांतील वार्षिक दरडोई विजेचें उत्पादन अवघें १२ युनिटस् असून, ग्रेटब्रिटन व अमेरिका यांमध्यें तें अनुक्रमें ८५५ व १,७७५ युनिटस् इतकें आहे. जगामध्यें दरडोई वीज-उत्पादनांत कॅनडाचा पहिला नंबर लागतो. १९४७ च्या अखेरीस हिंदुस्थानांतील विद्युत्–उत्पादनक्षमता ( इन्स्टॉल्ड कॅपॅसिटी ) फक्त १·४ दशलक्ष किलोवॅटस इतकी असून ग्रेटब्रिटनमध्यें व अमेरिकेमध्यें ती अनुक्रमें १२·४ व ५१·६५ दशलक्ष किलोवॅटस इतकी आहे. यावरून औद्योगिक क्षेत्रांत पुढारलेल्या देशांच्या बरोबरीनें जर आपणांस मानाचें स्थान मिळवावयाचें असेल तर या क्षेत्रांत आपण अद्याप कितीतरी काम करावयाचें आहे, असें दिसून येईल. भारतांत युद्धापूर्वी २४४२ दशलक्ष युनिट इतकें

क्षेत्र, लोकसंख्या व उत्पादन : तुलनात्मक आकडे ( १९४७ च्या माहितीवरून )

| | जपान | अमेरिका | कॅनडा | स्विडन | ग्रे. ब्रिटन | भारत |
|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्र ( चौ. मैल ) | २,६३,००० | ३७,४३,५३० | ३६,०३,९१० | १,७३,०३५ | ५८,३४३ | १२,२०,०९९ |
| लोकसंख्या ( अंदाजे ) | ७,७९,४५,१९८ | १४,४०,०२,००० | १५,८०,००० | ६७,१९,००० | ४,९७,४८,००० | ३३,०२,००,००० |
| उत्पादनक्षमता ( कि. वॅ. ) | | | | | | |
| हैड्रो | ६२,९५,०३५ | १,४८,६२,००० | ७७,००,००० | २६,००,००० | ५,००,००० | ५,०८,१२९ |
| थर्मल | ३९,२४,१५७ | ३,६७,८५,००० | १,५७,००० | उपलब्ध नाहीं. फार कमी असावी | १,१९,००,००० | ८,५३,६३५ |
| एकूण | १,०२,१९,१९२ | ५,१६,४७,००० | ७८,५७,००० | २६,००,००० | १,२४,००,००० | १३,६१,७६५ |
| १९४७ मधील उत्पादन | | | | | | |
| दशलक्ष युनिटस् | ३०,४०७ | २,५५,७२० | ४५,०४८ | ११,७१२ | ४२,५७९ | ४,०७३ |
| उत्पादनक्षमता ( दर चौ. मै. कि. वॅ.) | ३८·८६ | १३·८० | २·१८ | १५·० ( हैड्रो ) | २१२·५४ | १·१२ |
| दरडोई वीज उत्पादन ( युनिटस् ) | ३९० | १,७७५ | ३,५८० | १,७१७ | ८५५ | १२ |

विजेचें उत्पादन होत असे. १९४८ सालीं ४५७५ दशलक्ष युनिट इतकी विज उत्पादन झाली. वीजपुरवठा करणाऱ्या कंपन्यांना हल्लीं विजेच्या मागण्या पुऱ्या करतां येईनाशा झाल्या आहेत. युद्धापूर्वी विजेचीं उपकरणें विकून गिऱ्हाईक मिळवण्याची मोहीम काढावी लागत असे. १९३८ सालीं लोकांना विजेचा उपयोग करण्याची गोडी लागावी व विजेचा खप वाढावा या उद्देशानें ग्राहकांनीं आदल्या महिन्यांत जेवढें विजेचें बिल दिलें असेल तेवढेंच बिल पुढील महिन्यासाठीं आकारण्याची सवलत कांहीं कंपन्यांनीं दिली होती. परंतु हल्ली विजेची मागणी बेसुमार वाढली असून त्या मानानें विजेचा पुरवठा मात्र अपुरा पडत आहे. लढाईच्या काळामध्यें वीज–उत्पादनाची यंत्रसामुग्री न मिळणें, त्या सामानास वाढती मागणी असणें, चलनवाढ, रॉकेलचा तुटवडा व विजेचा वाढता वापर या गोष्टींमुळें विजेचें उत्पादन जरूरीप्रमाणें वाढूं शकलें नाहीं. आपणाकडे होत असलेल्या विजेची वांटणी कशी झाली आहे, हें खालील कोष्टकावरून कळून येईलः—

| लोकसंख्या | भारतांतील गांवें अगर खेडीं यांची संख्या | सार्वजनिक वीजपुरवठा होणारीं गांवें व खेडीं | अशा गांवांचें अगर खेड्यांचें एकूण गांवांशीं प्रमाण% |
|---|---|---|---|
| १ लाखापेक्षां अधिक | ४९ | ४९ | १००·०० |
| ५०,००० ते १ लाख | ८७ | ८६ | ९८·८५ |
| २०,००० ते ५०,००० | २७७ | २३१ | ८३·३९ |
| १०,००० ते २०,००० | ६०७ | २२५ | ३७·०० |
| ५,००० ते १०,००० | २,३६७ | २१७ | ९·२० |
| ५,००० हून कमी | ५,५९,७४६ | १,९५९ | ०·३५ |
| एकूण | ५,६३,१३३ | २,७६७ | ०·४९ |

लोकसंख्येचे आंकडे १९४१ च्या शिरगणतीचे आहेत; त्यांत हैद्राबाद सुद्धां सध्या भारतांत समाविष्ट असलेल्या सर्व प्रदेशांची लोकसंख्या धरली आहे.

वरील कोष्टकावरून, १ लक्ष अगर त्यापेक्षां जास्त वस्ती असलेल्या सर्व शहरांना वीजपुरवठा होत असल्याचें दिसून येईल. परंतु ५,५९,७४६ खेड्यांपैकीं फक्त १९५९ खेड्यांनाच वीजपुरवठा, तो सुद्धां बहुतेक मद्रास, म्हैसूर, संयुक्तप्रांत वगैरे प्रांतांतील खेड्यांतूनच, होत आहे. हिंदुस्थानांतील २·६% वस्ती असलेल्या सहा शहरांतच हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या विजेपैकीं ६०% वीज वापरली जाते. विजेचा उपयोग फक्त शहरांतच केंद्रित झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

तेल, कोळसा व पाणी यांची वीजउत्पादनासाठीं आवश्यकता असते, त्याचप्रमाणें धबधबे, सूर्यप्रकाश व वारा यांचाहि वीजउत्पादनाचे कामीं उपयोग होतो. आपणाला तेलाचे अभावीं कोळसा व पाणी यावरच प्रामुख्यानें विजेचे उत्पादनासाठीं अवलंबून रहावें लागतें, वाफेच्या यंत्रापेक्षां आपणांस जलशक्तीच आर्थिक दृष्ट्या स्वस्त पडते. याशिवाय जलशक्ति केंद्रांमुळें पाणीपुरवठा, पुरांचें नियंत्रण, जलमार्ग-जमीन सुधराई, मलेरिया कावूंत आणणें, इ. गोष्टी सुलभ होतात. दामोदर व्हॅली योजनेसारख्या योजना अंमलांत आणून विजेचें उत्पादन वाढवण्यास आपणाकडे अद्यापि कितीतरी वाव आहे. जलशक्ति योजनेंत एकच गैरसोय असते. ती ही कीं, वीजउत्पादनकेंद्रें विजेचा उपयोग करणाऱ्याच्या केंद्रांपासून बरीच लांब असतात. विद्युत् क्षेत्रांत नवीन नवीन लागत असलेल्या शोधांमुळें विजेचा प्रवाह तीनशें मैल सुद्धां दूरवर नेता येतो. म्हणून भारतांत जलशक्तीच विशेष उपयुक्त ठरेल यांत शंका नाहीं. बाष्पशक्तीचा विशिष्ट उपयोग आहे. तीं यंत्रें सत्वर उभारता येतात व अवर्षणाचे वेळीं जलशक्ति ऐवजीं त्यांची वीज उपयोगांत आणतां येते.

निरनिराळ्या राज्यांतून अधिक वीज उत्पादन करून खेडोंपाडीं वीजपुरवठा करण्याच्या कितीतरी योजना आंखल्या गेल्या आहेत. या सर्व योजना नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करून आखण्या ऐवजीं फारच अवाढव्य योजना आंखल्यामुळें, याशिवाय त्यासाठीं लागणाऱ्या सामानाची दुर्मिळता, तज्ञांचा अभाव, सरकारची कंटाळवाणी ठराविक चाकोरी आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यांत जबाबदारी टाळण्याच्या दृष्टीनें लावलेली दिरंगाई, या सर्व गोष्टींमुळें आपल्या सर्व योजनांची प्रगति फारच मंदगतीनें होत असून बऱ्याचशा योजना कागदावर पडून आहेत. सध्यां १·४ दश लक्ष किलोवॅटस इतकें विजेचें उत्पादन होण्याइतकीं वीज-उत्पादन–गृहें आपणाकडे अस्तित्वांत असून १·२ दशलक्ष किलोवॅटस वीजनिर्मिति करणाऱ्या नवीन योजनांची अम्मलबजावणी चालू आहे. आणखी १·४ दशलक्ष किलोवॅट्स वीज निर्माण करण्याबाबत विचार चालू आहे. भारतांत २५ दशलक्ष किलोवॅटस इतकी वीज जलशक्तीवर निर्माण होऊं शकेल. राष्ट्रीयीकरणाच्या घोषणांमुळें पुरेशा भांडवलाचे अभावीं खाजगी कंपन्यांना यासंबंधांत फारसें लक्ष घालतां येत नाहीं. वीज–उत्पादन–केंद्रांची सध्यांची प्रगति व खेडोंपाडीं वीजपुरवठा करण्याबाबत नवीन हातीं घेतलेल्या योजनांची प्रत्येक राज्यांत काय परिस्थिति आहे हें पाहूं:—

मुंबईः—टाटा कंपनीचीं तीन जलशक्तिकेंद्रें व अहमदाबाद इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीचें अहमदाबाद येथील, बाष्पशक्तिकेंद्र हीं मुंबई राज्यांतील महत्त्वाचीं वीज उत्पादन केंद्रें आहेत. मुंबई राज्यांत निर्माण होणाऱ्या विजेपैकीं ९२% वीज वरील केंद्रांत व चोला केंद्रांत मिळून निर्माण होते.

वरील सर्व केंद्रांत जास्तींत जास्त वीज तयार होत असून यापेक्षां अधिक वीज तेथें निर्माण होणें तेथें शक्य नाहीं. उत्पादनकेंद्रावरील ताण कमी करण्यासाठीं टाटा कंपनीनें प्रत्येकीं बहा हजार किलोवॅट वीज निर्माण करूं शकणारीं दोन जलशक्ति–यंत्रें मागविलीं असून २२,०००किलोवॅट वीज निर्माण करणारी यंत्रसामुग्री बसवण्याचें काम टाटांच्या भिरा शक्तिकेंद्रांत चालूं आहे. प्रत्येकीं १८,००० कि वॅ. वीज निर्माण करणारीं तीन वाफेचीं यंत्रें मागविलीं असून १९५२ सालीं तीं हातीं आल्यावर १९५४ सालापर्यंत बसवलीं जातील व त्यानंतर ९६००० कि. वॅ. इतकी उत्पादनक्षमता वाढेल. सध्यांची वाढती मागणी व अपुरा पुरवठा लक्षांत घेतां, १९५४ सालीं आपली आजची गरज भागवण्याइतकाच वीजपुरवठा होऊं शकेल. परंतु १९५४ नंतर वाढणाऱ्या मागणीच्या पुरवठ्याची अद्याप कांहींच व्यवस्था झालेली नाहीं. ६०,००० कि. वॅ. क्षमता आणखी उभी करण्याची टाटांची आणखी एक योजना असून टाटांच्या सर्व कंपन्यांच्या परवान्यांची मुदत १९७० अखेर वाढवल्याशिवाय ही योजना हातीं घेण्यास कंपनी तयार नाहीं. सरकारनें वरील गोष्टीबाबत योग्य तो निकाल लवकर द्यावा अगर मुंबई–पुणें मार्गांतील लोकांच्या विजेच्या मागण्या लक्षांत घेऊन नवीन वाफेच्या यंत्रांची मागणी करावी. सरकारनें ठरवलेल्या कोयना नदी

योजनेच्या प्रत्यक्ष कामास सुरवात झाल्यापासून ती योजना पूर्ण होण्यास कमींत कमी ८।१० वर्षे तरी पाहिजेत. त्या दृष्टीनें व जलशक्तीला बाष्पशक्तीचा जोड म्हणून उपयोग खात्रीनें होईल. अहमदाबाद इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीनें १९४८ सालीं ३०,००० कि. वॅट इतकी उत्पादनक्षमता वाढविली असून लौकरच आणखी ३०,००० कि. वॅट वीजउत्पादन होणारी यंत्रसामुग्री बसवण्यांत येणार आहे. नर्मदा व तापी–योजनेमुळें अहमदाबाद येथें वीजपुरवठा होऊं शकेल व अहमदाबाद इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीची वीज ग्रिड स्कीमप्रमाणें बडोदें व आसपासच्या खेड्यांत पुरवतां येईल. त्याचप्रमाणें सहा वर्षांत सहा ठिकाणीं लहान डिझेल पॉवर स्टेशन्स उघडण्यांत आलीं आहेत.

आसाम:–या राज्यांत सध्यां अस्तित्वांत असलेल्या वीज-उत्पादन–केंद्रांची उत्पादनक्षमता वाढविण्यापलिकडे कोणतीही महत्त्वाची योजना आंखलेली नाहीं.

प. बंगाल:–(१) कलकत्ता इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीनें बाष्प-यंत्रांत १,१०,०००. कि. वॉ. पर्यंत केलेली उत्पादनक्षमतेची वाढ.

(२) गौरीपुर इ. स. कंपनीची १८,३५० कि. वॉ. तशीच केलेली वाढ.

(३) कलकत्ता इ. स. कंपनीकडून लहान लहान वीजउत्पादन केंद्रांतून घतलेल्या विजेचें वांटप. या योजनाशिवाय दामोदर व्हॅली प्रोजेक्टची योजना, या गोष्टी उल्लेखनीय आहेत.

बिहार:–हें राज्य कोळसा व लोखंड या बाबतींत खरोखरीच नशिबवान आहे. (१) ६०,००० कि. वॉ. इतकी वीज निर्माण करण्याऱ्या सिंद्री फर्टिलायझर फॅक्टरीची अद्यापही २०,००० कि. वॉ. इतकी वीज उपयोगांत आणण्यासारखी आहे.

(२) २,२२,००० कि. वॉ. वीज उत्पन्न करूं शकणारा डी. व्ही. ५. हैड्रो प्रॉजेक्ट व १,५०,००० कि. वॉ. वीज उत्पन्न करूं शकणारें बोखारो येथील बाष्पशक्ति केंद्र.

(३) कोसी नदीवरील १० लक्ष कि. वॉ. वीज निर्माण करणारी योजना.

(४) पाटणा येथील वीजवांटप करणाऱ्या लहान योजना.

मध्यप्रांत व वऱ्हाड:–कोळसा, लोखंड, मँगेनीज, इ. खाणींनीं समृद्ध असलेला हा प्रान्त औद्योगिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. (१) खापरखेडा येथील २०,००० कि. वॉ. वीज उत्पन्न करणारें थर्मल स्टेशन (२) २,७०,००० कि. वॉ. वीज उत्पन्न करू शकणारी वैणगंगा योजना (३) नर्मदा, तापी, वैणगंगा, इंद्रावती व महानदी या योजना.

मद्रास:–वीजपुरवठ्याच्या फार मोठ्या योजना या राज्यानें आंखलेल्या असून त्यांतील खालील महत्त्वाच्या आहेत.

(१) पायकारा व पापनाशम् जलशक्ति योजनांत ३३,००० कि. वॉ. वाढीची योजना.

(२) मोयर येथें ३६,००० कि. वॉ. ची योजना.

(३) मचकुंद हायड्रो प्रॉ. ५१,००० कि. वॉ.

(४) मद्रास, विजयवाडा येथील थर्मल स्टेशन्सची वाढीची योजना ३९,००० कि. वॉ.

ओरिसा:– महानदीवरील विविधांग योजना विशेष उल्लेखनीय असून तें काम चालू आहे.

पूर्व पंजाब–(१). नांगल हायड्रो प्रॉजेक्ट– काम चालू ९६,००० कि. वॉ.

(२) भाखडा लॉंग टर्म प्रॉजेक्ट (विचार चालू) ६४,८००

संयुक्त प्रांत:– (१) वेस्टर्न गंगा कॅनॉल स्कीम काम चालू १,००,५०० कि. वॉ.

| | |
|---|---|
| (२) शारदा कॅनॉल स्कीम काम चालू | ४१,८०० कि. वॉ. |
| (३) (१) यमुना नदी प्रॉजेक्ट (चौकशी चालू) | १,८०,००० कि. वॉ. |
| (२) रिहंद रिव्हर योजना (...”...) | २,३०,००० कि. वॉ. |
| (३) नायर ... ... | २,३२,००० कि. वॉ. |
| (४) बिटवा ... ... ... ... | ३,००,००० कि. वॉ. |
| (५) रामगंगा ... ... ... ... | ५०,००० कि. वॉ. |
| (६) गोमा ... ... ... | ३,००,००० कि. वॉ. |
| (७) पिंडर ... ... ... ... | ४०,००० कि. वॉ. |

वर उल्लेखिलेल्या योजनाशिवाय आणखी 'कितीतरी' योजना आंखल्या गेल्या असून या सर्व योजना अंमलांत आल्यास कितीतरी चांगलें दृश्य हिंदुस्थानांत दिसूं शकेल. परंतु एकाच वेळीं अनेक योजना हातीं घेतल्यामुळें भासणारा तज्ज्ञांचा तुटवडा, वाढत्या किंमती आणि पैशाची दुर्मिळता या गोष्टी विचारांत घेतां वरील योजना प्रत्यक्ष कृतींत न येण्याची साधार भीति वाटते. अनंत योजना हातीं घेण्यापेक्षां कांहीं थोड्या व निवडक योजनाच हातीं घेऊन त्यांवर लक्ष केंद्रित केल्यास सर्वच योजना कागदावर रहात नाहींत. सर्व राज्यांतील लोकांचें एक मंडळ नेमून त्या मंडळामार्फत सध्यांच्या वीज उत्पादन करणाऱ्या संस्थांना विजेचें उत्पादन वाढवण्यासाठी आर्थिक मदत देणें, हा एक अत्यंत सोपा व कमी वेळांत पुष्कळ काम होणारा उपाय आजचा विजेचा प्रश्न सोडवण्यास उपयोगी पडेल.

खेड्यांतील वीजपुरवठ्याबाबत बोलावयाचें झाल्यास, खेड्यांमध्यें खाजगी वीजपुरवठा करणाऱ्या कंपन्यांना उत्तेजन देणें व त्या लोकांची मागणी पुरी करणें हा एकच उपाय आहे. अशा कंपन्यांना सरकारनें आर्थिक मदत करून व खेड्यांतील वीज-निर्मितीला ज्यायोगें कमी खर्च येईल अशा अनेक सवलती देऊन कंपन्यांना पाठिंबा दिला पाहिजे. खेड्यांत निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग ग्रामोद्योगासाठी पण झाला पाहिजे. विजेच्या वाढत्या उत्पादनाबरोबर औद्योगिक क्षेत्रांतहि विजेचा वाढता उपयोग झाला पाहिजे.

दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि.
लक्ष्मी निवास बिल्डिंग
बुधवार, पुणें २
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
★
आमच्या भागदारांना, खातेदारांना व हितचिंतकांना नवें वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.
का. बा. साळवेकर
मॅनेजिंग डायरेक्टर

## लोकमान्य इंडस्ट्रीज् लि.

८२ पर्वती, पो. ऑ. बॉक्स नं. ५०७, पुणें नं. २.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१. श्रीमंत रावबहादूर ग. गो. शेंबेकर
२. आमदार डॉ. मो. ना. नातू, एम. एल. ए.
३. श्री. ग. कृ फडके, बी. ए.
४. प्रो. विं. घों. सर्चीगिरी, एम. ए.
५ श्री. वा. वि गडकरी, बी. ए., एलएल. बी.
६. श्री. दा. कृ. भावे, एल. सी. ई., एम. ए.
७. डॉ. कृ. सं. डोळे, एम. एस. सी., पी. एच. डी.
८. डॉ. रं. ह. सोमण, एल. सी. पी. एस.,
९. डॉ. रा. अ. राईरकर, एम. बी. बी. एस.
१०. श्री. वि. ह. काणे, एल. एम. ई.
११. डॉ. ना. अ. कानगो, एल. सी. पी. एस.
१२ श्री. दि. दा गांगल, एम. एस. सी. (ए. ऑ)
१३. डॉ. द. स. अनगळ, एल. सी. पी एस (ए. ऑ.)
१४. श्री. ग. ह. भागवत, बी. एजी. (ए. ऑ.)
१५ श्री. वा. ना. कलंत्रे, बी. ए. (ए ऑ.)

आमचे कारखान्यांत छापखान्यास लागणान्या सर्व प्रकारच्या छपाईच्या शाया तयार होतात. माल उत्तम प्रतीचा व दर माफक असे आहेत. दरपत्रक आजच मागवा.

आमचे सर्व भागीदार, ठेवीदार, गिऱ्हाईक व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन संवत्सर आनंदाचें व भरभराटीचें जावो.

वासुदेव नारायण कलंत्रे, मॅनेजिंग एजंट.



तार–वेस्टलाईफ फोन ३४०१

## दिवाळीचा खरा आनंद

मुलाचें शिक्षण, मुलीचा विवाह, पत्नीस पेन्शन व स्वतःचे वृद्धापकाळाची सोय ही सर्व

## वेस्टर्न इंडियाची अभिनव योजना पॉलिसी

घेऊन करा व दिवाळीचा खरा आनंद उपभोगा.

सविस्तर माहितीसाठी भेटा अथवा लिहा.
आपल्या विश्वासाठी व प्रतिनिधित्वासाठी एक आदर्श विमा संस्था.

—: मॅनेजर :—

**वेस्टर्न इंडिया लाईफ**
इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, सातारा.

शाखा कचेरी:—१७९, बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें १.
कँप:— C/o केसवेल्स, ईस्ट स्ट्रीट, पूना.



## —१४—

## श्री महावीर को. बँक लि., कोल्हापूर

ह्या बँकेच्या दृष्टीनें १४ हा आंकडा औचित्यपूर्ण आहे.

तिच्या १४ वर्षांच्या सेवेच्या, वाढीच्या आणि प्रगतीच्या कालखंडानें युद्ध व शांतता हीं दोन्हीं अनुभवलीं आहेत.

( स्थापना सन १९३७ )

हेड ऑफिस : कोल्हापूर. शाखा : जयसिंगपूर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| रोख भरलेलें भांडवल | रु. ६७,४४० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. ६२,९१८ |
| खेळतें भांडवल | रु. ६,९७,३७२ |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

डी. बी. शेटे. मॅनेजर. डी. वाय. मेंच मॅनेजिंग डायरेक्टर. बी. वाय. आवटे. प्रेसिडेंट.



## दि न्यू ओरिएंटल बँक लि., कोल्हापूर.

( स्थापना १९२६ )

बँकिंगचा सर्व प्रकारचा व्यवहार करणारी कोल्हापुरांतील आद्य बँकिंग संस्था.

बँकेनें नवीनच सुरू केलेल्या अभिनव व आकर्षक अशा शॉर्ट टर्म डिपॉझिट योजनेबद्दल व इतर बँकिंग व्यवहारासाठी समक्ष भेटा.

ऑफिस:—
गवळी बिल्डिंग, लक्ष्मी रोड, कोल्हापूर.

बी. बी. पाटील, मॅनेजर
बी. जी. देवगांवकर, मॅ. डायरेक्टर.

# औद्योगीकरणाची आजची दुर्दशा

## अनुकूल वातावरण पाहिजे !

( श्री. शंकर ज. जोशी, बी. कॉम., अलवाये, [त्रावणकोर–कोचीन] )

स्वातंत्र्य टिकवावयाचें, वाढत्या लोकसंख्येला उपजीविकेचीं साधनें पुरवावयाचीं आणि राहणीचें मान वाढवावयाचें तर औद्योगीकरणाखेरीज तरणोपाय नाहीं. याची जाणीव जितक्या तीव्रतेनें असावयास पाहिजे तेवढी आढळत नाहीं, हें कठोर सत्य आहे.

तसें नसतें तर षड्वार्षिक कोलंबो योजना आणि नियोजन समितीची पंचवार्षिक योजना यामध्यें उद्योगधंद्यांना गौण स्थान देण्यांत आलें नसतें.

### आजची स्थिति

असलेले कारखाने चालण्याच्या दृष्टीनें, तसेच नवीन उद्योगधंदे रुजण्याच्या, वाढण्याच्या दृष्टीनें भोंवतीं पाहिलें तर काय दिसतें ?

स्वदेशी चळवळीच्या दिवसांत जेवढे कारखाने निघाले तेवढेही स्वातंत्र्याच्या उषःकालांत निघालेले दिसत नाहींत.

मुंबई, कलकत्ता, यासारखीं कांहीं शहरें वगळलीं तर महाराष्ट्रांत कोल्हापूर, औंध, इचलकरंजी, सांगली सारख्या संस्थानांत तसेंच दक्षिण भारतांत म्हैसूर, त्रावणकोर व हैद्राबाद या संस्थानांत तेथील संस्थानिकांच्या प्रोत्साहनानें निरनिराळे कारखाने निघाल्याचें आढळतें. संस्थानें गेलीं; सारा हिंदुस्थान एक झाला आणि गेल्या चार वर्षांत नांव घेण्यासारखे नवीन किती कारखाने अस्तित्वांत आले ?

कांहीं सरकारी कारखाने उभारले जात आहेत. त्यांच्यावर होत असलेल्या खर्चाबाबत, त्यांच्या कार्यपद्धतीबाबत संसदेंतील चर्चा आणि श्री. गोरवाला यांचा अहवालही विदारक प्रकाश पाडतात.

नवीन पिढीला उद्योगधंद्यांची आवड कमी, असें कां आहे ? शास्त्रीय–यांत्रिक शिक्षण घेणाऱ्या–घेऊं इच्छिणाऱ्या तरुणांची प्रचंड संख्या काय दर्शविते ?

परंतु, उद्योगधंद्यांना पोषक असें वातावरणच नाहीं. भांडवलवाल्यांची नफेबाजी, कामगारांचा कामचुकारपणा, गिऱ्हाइकांची गैरशिस्त, सरकारी उधळपट्टी, वशिलेबाजी आणि अकर्तेपणा यांची जणू एक कोंडीच निर्माण झाली आहे. असलेले कारखाने चालविणेंहि जिथें जिकिरीचें झालें आहे, त्या वातावरणांत नवीन प्रयत्न व्हावेत कसे ?

### थोडें मागें वळून

ब्रिटिश आमदानींत उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यांत आलें नाहीं हें खरें. तसें मुळीं सरकारी धोरणच होतें. तथापि प्रसंगीं कांहीं गोऱ्या अधिकाऱ्यांची व हुशार–कर्तबगार हिंदी तरुणांची गांठ पडल्यावर त्यांना परदेशी शिक्षणाकरितां पाठविण्याबाबत जरूर तर विशेष खटपटी केल्या; परत आल्यावरच्या काळांत त्यांना उत्तेजन दिलें अशीं उदाहरणें आहेत. उलट, गेल्या चार वर्षांत कोण, किती मंडळी कशाकरितां परदेशीं गेली अन् परत आल्यावर त्यांच्यापैकीं किती जणांनीं कोणतें उत्पादन कार्य केलें याचें संशोधन केलें तर तें मनोरंजक होईल !

पोटार्थी खरेच, पण तरीही आपण आपल्या परीनें राष्ट्रकार्यच करीत आहोंत अशी कामगारांची पूर्वीच्या काळांत भावना. कारखान्याची–धंद्याची लढत परकीय सत्तेविरुद्ध असल्याची जाणीव. “ परदेशी कारखान्यांना स्वस्त माल देणें कसें परवडतें ? आपणही कार्यक्षमतेची आपल्या बुद्धी–कुवतीनुसार पराकाष्ठा करूं या” अशी विचारसरणी. कारखानदार–कामगारांच्या या कमाल प्रयत्नांचा परिपाक म्हणजे आजचे २५–३० वर्षांतील लहान–मोठे कारखाने ! आजच्या वर्गविग्रहाच्या कल्पनेनें आणि कार्यपद्धतीनें त्या वेळीं उत्पादनकार्य झालें असतें, तर हे कारखाने आज दिसलेच नसते !

### औद्योगिक भांडवल

१९४५–४९ सारखीं कांहीं वर्षे सोडलीं तर औद्योगिक भांडवलाचा प्रश्न नेहमींच कठीण होता आणि आहे. आतां सरकारलाच भांडवलाच्या अडचणींची झळ लागल्यामुळें भांडवल–प्रश्नाचा विचार जरा पद्धतशीरपणानें होऊं लागला आहे एवढेंच; आणि निकाल असा आहे कीं, परदेशी भांडवल आल्याखेरीज रामराज्याच्या कल्पना सोडून द्याव्या लागतील !

हळुहळु गेल्या २५–३० वर्षांत औद्योगिक भांडवल पुरविणारा असा एक जाणता वर्ग निर्माण झाला होता. वाढत्या महागाईच्या खाईत तो भांडवल गुंतविण्याच्या दृष्टीनें जवळ जवळ नाहींसा झाला आहे. भांडवलाचा प्रश्न—विशेषतः खाजगी भांडवलाचा प्रश्न—या कारणामुळें अधिकच बिकट झाला आहे. नवीन घडी बसायला वेळ लागणार. तोंपर्यंत औद्योगिक भांडवलाचा प्रश्न सरकारी मदतीच्या आधारेंच सोडवावा लागणार असें दिसतें.

गेल्या ५–१० वर्षांत सटोडियांनीं नाना प्रकारांनीं अपरंपार पैसा मिळविला. त्या काळ्या पैशाच्या जोरावर त्यांनीं गिरण्या विकत घेण्याचा सपाटा सुरू केला. मूळचे सटोडिया, त्यांना म्हणायचे व्यापारी. कारखाने खरेदी केले म्हणून झाले उद्योगपती. त्यांचें खरें स्थान कारखानदारांच्या उच्च श्रेणींतील नव्हेच ! त्यांना गिरण्यांचें ना प्रेम, ना कामाची माहिती ना पद्धत. उत्पादनकेंद्रें त्यांचीं भक्ष्यस्थानें बनलीं !! यापुढें असें होऊं नये म्हणून आतां भारत सरकारनें कंपनी कायद्यांत दुरुस्ती केली आहे. औद्योगिक आघाडीवरील हें एकमेव शुभ वर्तमान आहे.

### भांडवलाच्या वाढत्या गरजा

भांडवल मिळविणें केवळ अशक्यप्राय झालें आहे, एवढेंच नसून त्याच्या गरजाहि वाढत आहेत.

चार स्नेही–नातलग मंडळी जमली अन् त्यांनीं कारखाना सुरू केला असें होणें आतां कठीण झालें आहे.

औद्योगिक रासीव विभाग, कारखान्याच्या स्वतंत्र, विशिष्ट पद्धतीनें, विविध सोयीच्या इमारती, अधिकाधिक यंत्रसामुग्री, त्याबाबतच्या निरनिराळ्या व्यवस्था, कामगारांकरितां घरें, विश्रांतिस्थानें, डॉक्टरी उपचार, कँटीन, असा कितीतरी पसारा वाढला आहे. या व्यवस्था अनावश्यक आहेत, असें सूचित करण्याचा बिलकूल हेतु नाहीं. त्या जरूरच आहेत. पण या सर्वांमुळें भांडवली प्राथमिक खर्च वाढला आहे एवढेंच दाखवावयाचें आहे.

समानता हा युगधर्म. कामगार उद्योगांतील भागीदार ही युग-कल्पना. त्यांना त्या मानानें, त्या काळजीनें वागविलें पाहिजे हें ओघानेंच आलें. कारखान्यांतील लहान–मोठे–अधिकारी केवळ कामांत तज्ज्ञ असून यापुढें भागणार नाहीं. यंत्रज्ञां–तंत्रज्ञां-बरोबरच ते कामगार–मनोज्ञही असले पाहिजेत.

कोणतीही गोष्ट करावयाची तर आतां लिखापढी केल्या-शिवाय चालत नाहीं. सरकारी पत्रव्यवहार, माहितीपत्रकें, आंकडेवारी पूर्वीच्या मानानें खूपच वाढली आहे. याकरितां शिकलेली आणि अधिक मंडळी कामावर नेमावी लागतात.

या सगळ्याचा परिणाम कारखान्याचा पसारा नि खर्च वाढण्यांत झाला आहे. अनुत्पादक खर्च किती करावयाचा, निदान आजच्या दिवसांत, याचा विचार व्हावयास पाहिजे.

तथापि, लोकशाही पद्धतींत, आधुनिक पद्धतीनें चालणाऱ्या कारखान्यांना हें असें करणें जरूर आहे. कांहींसें अटळ आहे.

कारखान्यांच्या व्यापाचें हें स्थूल स्वरूप झालें.

कच्च्या मालाच्या तुटवड्याच्या, बेभरंवशाच्या वहातुकीच्या आजच्या दिवसांत कच्च्या–पक्क्या मालापायीं खूपच भांडवल गुंतवून ठेवावें लागतें.

### थोडी तुलना

इंग्लंडांत लोकशाही आली ती औद्योगिक क्रांतीनंतर कांहीं काळ गेल्यावर. पहिले यंत्राचे शोध येथें लागले. त्याचा फायदा मिळून गेला. परदेशी व्यापार व राजसत्ता यांच्या जोरावर इंग्लंडांत पैसा–भांडवलाचा धूर झाला !

दोन महायुद्धांत इंग्लंड राजकीय दृष्ट्या मागें पडलें; तसेंच आर्थिक दृष्ट्याहि. त्याचीं कारणें सांगण्यांत येतात तीं अशीं: कारखान्यांत न जातां दुरून परस्पर सूत्रें हलविणाऱ्या श्रीमंत बापाच्या उमरावी मुलांची मालकी आणि देशांतील वाढता समाजवाद.

अमेरिकेचा इतिहास सारा दोन–अडीचशें वर्षांचा. ना संस्कार ना परंपरा. मोजकीं माणसें, अफाट क्षेत्र, खूप काम करावें, माणसा-भावीं यंत्रें कामाला लावून उरक पाडावा. परदेशी मालाविरुद्ध जकातीच्या उंचच उंच भिंती उभारून देशी धंदे वाढवावे. खूप पैसा करावा. असें त्यांचें चालून गेलें.

जपानची पद्धत निराळी. सरकारी उपकारक धोरण. पाश्चात्यांचें तंत्र आत्मसात् केलें. शिस्तबद्ध अपरंपार कष्ट करणारे कलावंत, कामगार लाभले.

आपली गोष्ट सर्वतोपरी निराळी आहे. काळ बदलला आहे. वैचारिक क्रांतिकाल आहे. देशादेशांतील भौगोलिक अंतर कमी होत आहे. इंग्लंडांतील गैरहजर मालक, अडणारी कामगार संघटना, अमेरिकन अवजडपणा, जपानी तकलादूपणा, नि डळमळीत आर्थिक परिस्थिति अशा सर्व अडचणी अम् जोडीला: काळा बाजारवाले आपल्या वांट्याला आले आहेत.

### राष्ट्रीयीकरणाच्या मर्यादा

सर्व काळांत, सर्व ठिकाणीं राष्ट्रीयीकरणाचा 'तोडगा लागू पडेल असें नाहीं. राष्ट्रीयीकरणानें स्वस्ताई येईल असें नाहीं. संवेदना-क्षम व कार्यक्षमहि तें नाहीं. 'सामान्य जनांच्या सेवे' ऐवजीं 'नफेबाजी'हि असूं शकते !

मद्रास शहरांतील मोटारवाहतूक सरकारनें घेतली. दोन वर्षां-पूर्वी रोजचा गल्ला रु. २०,००० होता; तो आतां रु. ३२,००० झाला आहे.


# मध्यप्रदेश कोऑपरेटिव्ह बँक लि.

हेड ऑफिसः–टिळक पुतळ्याजवळ, नागपूर.

शाखाः–सीताबर्डी नागपूर, खामगांव, मलकापूर, चांदा, बैतुल, इटार्सी, हर्दा, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, राजनान्द्गांव, अमरावती, बुलढाणा, मण्डला.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत हिस्से भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेले हिस्से भांडवल | रु. | १०,९२,८७० |
| मुल्य गंगाजळी | रु. | ९,८४,११३ |
| एकूण ठेवींची रक्कम | रु. | २,०६,०६,४२० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,०१,११,६११ |
| सरकारी रोख्यांत गुंतलेलें भांडवल | रु. | ७०,९३,३६५ |

सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.
अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर.

ठेवीः–मुदती, बचती व चालू ठेविल्या जातात.
सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात.

नी. स. देव,
मॅनेजर.

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापनाः–१९३५ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | १,५५,१६० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ५६,१७९ |
| इतर फंडस् | रु. | ७०,७०० |
| ठेवी | रु. | १६,१३,७०२ |
| खेळतें भांडवल | रु. | १९,६४,५३१ |

डायरेक्टर्स

(१) श्री. ग. कों. गोडबोले, B. A., LL. B. चेअरमन.
(२) „ के. वि. भिडे.
(३) „ गं. गो. विनीवाले.
(४) „ रा. ल. कुलकर्णी, उद्गांवकर.
(५) „ म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
(६) „ वा. ह. गोसावी, B. A.
(७) „ ल. कृ. भिडे.
(८) „ वा. वि. वाटवे, B. A., LL. B.
(९) „ ग. का. वंडेकर.

बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. प. लागू, B. A., LL. B.,
मॅनेजर.

सकाळीं कामावर जातांना व संध्याकाळीं परत येतांना बसची वाट पाहण्यांत तासन् तास मोडतात; गर्दी करून उभ्यानें प्रवास करावा लागतो, ही गोष्ट नित्याची झाली आहे.

नवीन नवीन रस्त्यांवरून बसेस् सुरू करण्यांत येत आहेत. शहरांतील लोकसंख्या वाढत आहे. अशा स्थितींत जास्त बसेस सोडण्याची लवकर व्यवस्था करणें अगत्याचें असतांना तसें न करतां निकडीची जाणीवच नाहीं. अशा थाटांत मंत्री उत्तर देतात: "नवीन मोठ्या गाड्या बंगलोरच्या कारखान्यांत तयार करावयास दिल्या आहेत!"

दुसऱ्या एका प्रसंगीं वहातुक-कमिशनरनें सांगितलें, कीं गर्दी हटवावयाची तर निदान ३० जास्ती बसेस सुरू केल्या पाहिजेत आणि बोलतांना जणूं कांहीं चूक झाली, तिची दुरुस्ती करण्याच्या उद्देशानें पुस्ती जोडली, "बसेसच्या संख्येंत वाढ करणें हा सरकारी धोरणाचा प्रश्न असल्यानें याबाबत सरकारनेंच काय तें ठरवावयाचें आहे." याचा उघड अर्थ असा कीं, जास्ती बसेस सोडल्या तर कामावर जाणाऱ्यांची सोय होईल; पण खर्च वाढेल अन् तेवढा नफा कमी होईल. सरकार तसें करावयाला तयार नाहीं!

राष्ट्रीयीकरणांत राजकारणहि मिसळलें जातें. मुंबई एस. टी. कॉर्पोरेशनच्या संचालकमंडळावर व प्रादेशिक सल्लागार समित्यांवर एकजात सरकारी पक्षाच्या सभासदांची वर्णी लावण्यांत आली आहे. या अशा संस्था म्हणजे सरकारची मक्तेदारीच जणूं! विरोधी पक्षांतील जाणती मंडळी राहोत, पण निद्रान स्वतंत्र, अधिकारी वाणीनें बोलणारी, वागणारी मंडळीहि वगळण्यांत आली आहेत.

### औद्योगिक घरें

याबाबत पंचवार्षिक योजनेंत उल्लेख आहे.

कारखान्यानें व कामगारांनीं द्यावयाच्या रकमेचा बोजा अखेरीस धंद्यावरच पडणार हें उघड आहे.

कामगारांकडून बचत रूपानें कर्ज मिळण्याच्या शक्यतेचा फेरविचार होणें इष्ट वाटतें.

नॅशनल हौसिंग बोर्ड मार्फत घरें बांधली जाणार, त्याला चालू पद्धतीनुसार कालावधि लागणार हें उघड आहे.

केंद्र व प्रांतिक सरकारांनीं, तसेंच कारखान्यानें व कामगारांनीं द्यावयाची रक्कम निराळ्या खात्यांत जमा करून घरें बांधण्याची जबाबदारी कारखान्यावर टाकावी. जमीन, बांधकाम, सामान, मिळण्याबाबत सरकारनें कारखान्याला सहाय्य करावें. प्रयत्नशील कारखान्यांच्या सहकार्यानें अल्पावधींत पुष्कळ कार्य होईल असें वाटतें.

### कामगारांची उत्पादनक्षमता

उत्पादनक्षमता कमी झाली आहे आणि नाहीं अशी कारखानदार व कामगार प्रतिनिधींचीं उलट सुलट मतें असलीं तरी भारतीय कामगारांची सर्वसाधारण कार्यक्षमता इतर पुढारलेल्या देशांतील कामगारांपेक्षां कमी आहे, याबद्दल दुमत असण्याचें कारण नाहीं.


उत्पादनक्षमतेचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठीं, तो कसा करावा हें शिकविण्यासाठीं, परदेशांतून तज्ज्ञमंडळ आणावें अशी पंचवार्षिक योजनेंत सूचना आहे. परकीयांपुढें आपलें हें प्रदर्शन कशाकरितां? आपण कार्यक्षम कसें व्हावें हें परदेशीय कां कधीं सांगतील?

त्यापेक्षां कामगार, चालक व सरकार यांच्या प्रतिनिधींचीं एकत्र मंडळें परदेशीं पाठवावींत. सर्वांनीं मिळून एकाच वेळीं प्रवास, अवलोकन, विचार–विनिमय करावा. त्यांचे अनुभव आपल्याला अधिक पटतील. त्यांच्या अनुभवाचा, अभ्यासाचा फायदा आपल्याला अधिक होईल. इंग्लड–अमेरिकेंत अशीं मंडळें परस्पर देशांत वारंवार जाऊन येत आहेत.

### उद्योगाची तपश्चर्या

उत्पादन-कार्य हें एक व्रत आहे. आपल्या कार्याबाबत श्रद्धा पाहिजे. बरे–वाईट दिवस पाहण्याची मनाची तयारी हवी. अडचणींना तोंड देण्याची धमक पाहिजे. सहकार्यानें कार्य करण्याचा मनाचा मोठेपणा नि दृष्टीची विशालता पाहिजे.

देशांतील कांहींच्या तपश्चर्येमुळें – कर्तृत्वामुळें पुष्कळांना रोजगार मिळतो. अशी मंडळी पुढें येतील असें वातावरण निर्माण करण्याचें कार्य समाजाचें–सरकारचें–देशाचें आहे. रोजगार शोधणाऱ्यांपेक्षां रोजगार निर्माण करणारे नागरिक जास्तींत जास्त तयार करण्याचा प्रयत्न व्हावयास हवा; तसें वातावरण हवें.



## कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक लि. कोल्हापूर

( स्थापना १९३८ )

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | ७,००,००० |
| खपलेलें भांडवल | २,६२,९५० |
| खेळतें भांडवल | ३०,००,००० |

—: बँकर्स :—

दि बॉम्बे प्रॉ. को-ऑप. बँक लि. बॉम्बे

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१. मे. व्ही. जी. सरनाईक, एम. ए., एलएल. बी. ॲडव्होकेट ( प्रेसिडेंट ), २. मे. सरदार बहादूर डी. डी. जाधव, ( व्हाइस प्रेसिडेंट ), ३. मे. राव. ए. के. सरनाईक, ४. मे. कृष्णाजी तुकाराम पाटील, चुयेकर, ५. मे. गणपतराव आबाजीराव ढोंगळे, ६. मे. गुरुपाद राचय्या स्वामी, ७. मे. यशवंतराव भाऊसाहेब पाटील, ८ मे. दादा बळवंत पाटील, ९ एन. टी. सरनाईक, ( मॅनेजिंग डायरेक्टर )

ऑडिटर्स

मे. डी. डी. जोशी आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, बॉंबे

हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

—शाखा—

हातकणंगलें, मलकापूर, जयसिंगपूर.



## शेतकरी सहकारी संघ लिमिटेड

कोल्हापूर ( शाहूपुरी )

( स्थापना २३।१०।१९३९ )

—जिल्ह्यांत शाखा १८ आहेत—

**खेळतें भांडवल १६ लक्ष रु. पर्यंत**

संघानें आपले ध्येयानुसार भरीव कामें करून जनता व सरकार यांचा पूर्ण विश्वास संपादन केला आहे व सहकारी औद्योगिक क्षेत्रांत पाऊल टाकण्याचा प्रयत्न चालू आहे.

आमचे सहकारी बांधवांना पुढील वर्ष सुखाचें जावो.

ता. गो. मोहिते, मॅनेजिंग डायरेक्टर

एस्. एल्. बेनाडीकर, ( क्षात्रजगद्गुरु ) प्रेसिडेंट

ही दिवाळी आमचे शेतकरी बंधूंना आनंदाची जावो.



## दि बुधगांव बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : बुधगांव

जि. दक्षिण सातारा

शाखा:—माधवनगर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, | १,००,००० |
| वसूल भांडवल | ,, | १,००,००० |
| गंगाजळी व इतर फंडस | ,, | १,२०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, | ११,००,००० चे वर |

ही दिवाळी आमचे ग्राहकांस सुखाची जावो

—सर्व व्यवहार केले जातात—

रा. म. गोकावे
मॅनेजर.



## दि कमर्शिअल बँक लि.

स्थापना ] कोल्हापूर [ १९३६ इ.

हेड ऑफिसः—लक्ष्मीपुरी-कोल्हापूर

शाखा - ( १ ) पापाची तिकटी, कोल्हापूर
( २ ) इचलकरंजी ( ३ ) हुपरी

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

( १ ) श्री. एस. जी. दाभोळकर, चेअरमन, बी. ए. एलएल. बी., ॲडव्होकेट, प्रिन्सिपॉल, शहाजी लॉ कॉलेज ( २ ) एल. एम. शेठ, व्हाइस चेअरमन, एजंट, दि बर्मा शेल कंपनी, कोल्हापूर. ( ३ ) श्री. डी. एम. साळोखे, व्यापारी, कोल्हापूर. ( ४ ) श्री. डी. जे. सासने, चेअरमन, वर्क्स कमिटी, डी. एल बी., कोल्हापूर. ( ५ ) श्री. बी. पी. बुधले, हार्डवेअर मर्चंट, कोल्हापूर. ( ६ ) श्री. बी. टी. देवरुखकर, बी. ए., एलएल. बी., कोल्हापूर. ( ७ ) श्री. जी. एन. सांगले, मिल ओनर्स, इचलकरंजी. ( ८ ) श्री. एस. एस. सुगंधी, व्यापारी कोल्हापूर.

कॅप्टन एस्. एस्. गुप्ते, बी. कॉम्., सेक्रेटरी टू दि बोर्ड

वाय्. एस्. बोरगांवकर, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर

# औद्योगिक कंपन्यांतील ठेवींचा प्रश्न.

प्रा. परशुराम महादेव लिमये, एम्. ए.

पुण्यांत सप्टेंबर, १९५१ महिन्याच्या अखेरी ठेवीदारांची परिषद भरल्यापासून वरील प्रश्नाकडे सार्वजनिक रीत्या लक्ष वेधलें गेलें आहे. शेअरचें कायम भांडवल कमी पडल्यामुळें ठेवींच्या रूपानें खेळता पैसा जमा करण्याची प्रथा विशेषतः गेल्या १२–१५ वर्षांतली आहे, व आतापर्यंत केलेल्या चवकशीवरून ती महाराष्ट्र व बंगाल या दोन प्रांतांत विशेष प्रचलित आहे असें दिसतें. औद्योगिक क्षेत्रांत पाऊल टाकावें व देशाच्या औद्योगीकरणाला साहाय्य करावें, अशा मध्यमवर्गीय सुशिक्षितांच्या इच्छेंतून व तळमळींतून महाराष्ट्रांत तरी लहान लहान औद्योगिक कंपन्यांचा उदय झाला आहे. औद्योगीकरणाच्या हेतूबरोबरच स्वतःच्या कर्तबगारीला नवें क्षेत्र उत्पन्न करणें, व त्याबरोबरच आपली स्वतःची लौकिक व सांपत्तिक स्थिति सुधारणें, हेहि व्यक्तिगत हेतू वरील प्रयत्नांच्या बुडाशीं असणें स्वाभाविक व समर्थनीय आहे. ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड, या दृष्टीनें पाहतां हातीं घेतलेल्या उद्योगांत यश आल्यावर चालकांना आणि पुढाकार घेणाऱ्यांना विशेष सांपत्तिक लाभ झाला तर त्याचें वैषम्य भांडवलांत पैसे गुंतविणाऱ्यांना किंवा ठेवीदारांना वाटण्याचें कारण नाहीं. पण तो उद्योग फसला म्हणजे मात्र चालकांच्या कर्तबगारीचा, वाकबगारीचा, कार्यक्षमतेचा व प्रामाणिकपणाचा तपास नुकसानींत आलेल्या व्यक्ति करूं लागतात व कंपन्यांच्या संचालकांपुढें पेंचप्रसंग येऊन उभा राहतो, अशी स्थिति आज महाराष्ट्रांतील बहुसंख्य औद्योगिक कंपन्यांची झाली आहे.

ठेवीदारांचे परिषदेला आजपर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, ४८ कंपन्यांपैकीं ८ नादारींत निघाल्या आहेत; २२ कंपन्यांनीं ठेवीवरील व्याज देण्याचें व मुदत भरल्यावर ठेवी परत करण्याचें थांबविलें आहे आणि १८ कंपन्या सध्यां ठेवीवरील व्याज देत आहेत. शेवटच्या गटांतील कांहीं कंपन्या मुदत भरल्यावर ठेवी परत करण्याची चालढकल करितात, किंवा ठेवींची मुदत वाढविण्याची भीड ठेवीदाराला घालतात; मुदत भरल्याबरोबर ठेवीदाराला रक्कम परत करणाऱ्या कंपन्या फार थोड्या आहेत.

ठेवीदारांपेक्षांहि या कंपन्यांतील शेअरहोल्डरांची स्थिति अधिकच संकटाची आहे. ठेवीदाराला व्याज नाहीं, तर शेअरहोल्डरला नफा कोठला ? कंपनीवर वाईट प्रसंग आला तर शेअरहोल्डरनीं आपलें सर्वस्व गेलें असेंच समजणें प्राप्त आहे. शेअरच्या पूर्ण रकमेचा भरणा झाला नसल्यास, बुडूं घातलेल्या कंपनींत उघड्या डोळयानें आणखी पैसा बुडविण्याची कायदेशीर सक्ति शेअरहोल्डरवर केली जाईल. नुकसानीचे दृष्टीनें शेअरहोल्डरची स्थिति ठेवीदारांपेक्षांहि अनुकंपनीय असली, तरी या दोघांच्या कंपनीशीं असलेल्या संबंधांत मूलतःच फार फरक आहे. सांपत्तिक व सामाजिक दर्जाचे दृष्टीनें या दोन वर्गांत कांहीं फरक नाहीं. शेअर घेणारा मनुष्य त्याच कंपनींत ठेवहि ठेवतो. पण शेअर घेतांना त्याची दृष्टि व अपेक्षा निराळी असते आणि ठेव ठेवतांना निराळी. शेअरमध्यें पैसे गुंतले म्हणजे ते कायमचेच, अशी भावना असल्यानें तो विशेष प्रकारची सांपत्तिक अनुकूलता असल्याशिवाय फारसे पैसे शेअरमध्यें गुंतवीत नाहीं; अधिक नफा मिळण्याचें आमिष त्याला नसतें, कारण शेंकडा ५।६ चे वर नफा वाटणाऱ्या कंपन्या क्वचितच. तेवढें व्याज ३।४ किंवा ४।५ वर्षांचे मुदतीच्या ठेवींवर मिळत असल्यानें, व मुदत भरल्यावर आपली ठेव बिनतक्रार परत मिळेल अशी त्याची भावना असल्यानें, शें–दोनशें रुपयांचे शेअर घेण्यास खळखळ करणारी व्यक्ति त्याच कंपनींत कांहीं हजारांची ठेव ठेवण्यास सुद्धां मागें पुढें पहात नाहीं. अधिक सुरक्षितता व ठराविक काळानंतर पैसा परत मिळण्याची खात्री, या दोन विचारांचा पगडा त्या व्यक्तीचे मनावर बसतो.

वैयक्तिक पतीवर व जबाबदारीवर ठेव मागण्यास कोणी आला तर त्याला पैसे मिळणार नाहींत; पण कंपनीचे नांवावर ठेव मागितली तर मिळते हा एक मानसिक चमत्कार आहे असें म्हटलें पाहिजे. कंपनीचा व्यवहार सार्वजनिक व उघड्या स्वरूपाचा; त्या कारभारावर शेअरहोल्डरांची व त्यांनीं निवडलेल्या संचालक मंडळाची ( बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ) देखरेख; ऑडिटरांकडून वार्षिक हिशेबतपासणी, वगैरे उपाधींमुळें कंपनीविषयीं स्वाभाविकपणेंच ठेवीदाराला अधिक विश्वास वाटतो व त्याचे आधारावर तो कंपनीकडे ठेव ठेवण्यास तयार होतो. हा विश्वास कांहीं प्रमाणांत सकारण आहे, पण सर्वस्वीं मात्र नाहीं. त्यांत बरीच भूलहि आहे. चार माणसें एकत्र आलीं व त्यांनीं कंपनी उभी केली कीं निश्चिंत राहाण्याला हरकत नाहीं, हा विश्वास म्हणजे केवळ अंधविश्वास ठरण्याचा मोठा संभव आहे. चार मूर्ख एकत्र आले म्हणजे शहाणपणा उत्पन्न होत नाहीं; व चार लुच्चे एकत्र आले म्हणजे प्रामाणिकपणाचा उदय होत नाहीं असें कार्लाइलचें प्रसिद्ध सूत्र–वाक्य आहे; पण तसा आभास उत्पन्न होतो हें मात्र खरें.

ठेवीदार कंपन्यांत पैसे गुंतविण्याला राजी होतात याचें दुसरें कारण म्हणजे आपला पैसा कंपनींत थोडेच दिवस ठेवावयाचा असल्यानें तेवढ्या अवधींत त्याला धोका नाहीं, मग कंपनीचें अंतिम भवितव्य कांहीं का असेना, ही विचारसरणी होय. कंपनी अखेरीं यशस्वी झाली नाहीं तरी दोन–तीन वर्षें तिचा कारभार चालण्याला हरकत नाहीं, व आपला पैसा परत मिळण्याला अडचण नाहीं असें तो समजून चालतो. वेळेवर व्याज मिळण्याचा व ठेव मुदत भरल्यावर परत मिळण्याचा अनुभव कांहीं काळ त्याला स्वतःला व त्याच्या समवर्गीयांना येतोहि. नव्या ठेवी मिळत आहेत तोंपर्यंत जुन्या परत करण्यांत येतात, व भांडवलांतून ठेवीवरील व्याजहि देण्यांत येतें. पण चालू व्यवहारांत तोटा येऊं लागला, म्हणजे भांडवल हळू हळू संपुष्टांत येतें, व व्याज देणें कंपन्यांना अशक्य होऊन बसतें. अशी स्थिति कांहीं दिवस चालल्यावर नादारीचा प्रसंग येतो. वरील क्रमानें नादारींत निघालेल्या कंपन्या ८, व व्याज थांबविणाऱ्या २२ इतक्यांचीं नांवें परिषदेला उपलब्ध झालीं आहेत. माहींत असल्यापैकीं १८ कंपन्या अजून व्याज देत आहेत. ज्यांचेवरील व्याज थांबलें अशा ठेवी निदान पाऊण कोट रुपयांच्या आहेत. सर्वच कंपन्यांसंबंधीं साधार व तपशीलवार माहिती जमविण्याचा उपक्रम परिषदेनें सुरू केला असून ती हातीं आली म्हणजे प्रसिद्ध केली जाईल.

कंपन्यांवर आलेल्या आपत्तीचें कारण तरी काय हा गंभीरपणें विचार करण्याचा प्रश्न असून ठेवी घेणाऱ्या कंपन्यांची चवकशी करण्यासाठीं कमिशन नेमलें जावें असा एक ठराव परिषदेनें पास केला आहे. सरकारनें चवकशी कमिशन नेमलें तर ठीकच; नाहीं तरी तशी चवकशी स्वतंत्रपणें करणें इष्ट आहे. महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाची कसलीहि योजना आखतांना आलेल्या बऱ्यावाईट अनुभवाचा खात्रीनें उपयोग होईल.

कंपन्यांच्या व्यवहाराची चवकशी वर सुचविल्याप्रमाणें झाली तर अपयशाच्या बुडाशीं मॅनेजिंग एजंटांची गैरवाकबगारी, कार्यक्षमतेचा अभाव, कारभाराचा गैरहिशेबीपणा, संचालकांचा ढिलेपणा किंवा निष्काळजीपणा, भांडवलाचा अपुरेपणा, परिस्थितीची अटळ प्रतिकूलता व शेवटीं अप्रामाणिकपणा आणि फसवेगिरी या कारणांपैकीं कोणतीं कारणें व किती प्रमाणांत आहेत हें समजून येईल. अप्रामाणिकपणाचा व निष्काळजीपणाचा पुरावा दोषी मंडळींच्या माथीं मारतां आला तर त्यांचेकडून थोडीफार नुकसानभरपाई करून घेणें शक्य होईल.

सध्यांच्या अनुभवावरून भविष्यकाळासाठी काय उपाययोजना करतां येईल, हा पुढचा प्रश्न. ठेवी घेण्यावर कांहीं नियंत्रण घालणें व ठेवीदारांना कांहीं अधिकार देणें हे उपाय सुचण्यासारखे आहेत. भांडवलाच्या चौपट–पांचपटपर्यंत ठेवी घेणाऱ्या औद्योगिक कंपन्या महाराष्ट्रांत आहेत. ही स्थिति समाधानकारक किंवा कंपन्यांच्या दृष्टीनें सुद्धां सुरक्षितपणाची आहे असें कदापि म्हणतां येणार नाहीं. चलती चालली आहे, तोंपर्यंत ठीक; पण अडचणीच्या काळांत ठेवीदार पैसे परत मागूं लागले तर काय करावयाचें या प्रश्नाचा विचार जितक्या गंभीरपणानें व्हावा तसा होत नाहीं. ठेवी वाढविण्याबरोबरच भांडवल वाढविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत अशी सूचना मी एका वार्षिक सभेचे वेळीं केली असतां भांडवल वाढवून नफ्यांत भागीदार कशाला उत्पन्न करावयाचे? शेकडा ४॥ दरानें ठेवी मिळत असतां शेकडा १० नफ्यांत जास्त वाटेकरी कशाला, असें स्पष्ट उत्तर संचालक मंडळाकडून मला मिळालें. तीच कंपनी आज एक वर्षाच्या ठेवीवर शेकडा ६ प्रमाणें व्याज देत आहे. मोठें व्याज वर्षानुवर्ष मिळत गेलें तर कंपनीचे शेअर विकत घेऊन कायम गुंतून पडण्याला आकर्षण तरी कसलें? खासगी व्यक्तीशीं व्यवहार करतांना स्थावर मालमत्तेच्या अर्ध्याहून अधिक किमतीपेक्षां अधिक कर्ज कोणी देत नाहीं. पण कंपनी म्हटली कीं तिला भांडवलाच्या वाटेल तितक्या पट ठेवी घ्यावयाला हरकत नाहीं, ही विचारसरणी सयुक्तिक नाहीं. ठेवींचा उपयोग खेळतें भांडवल म्हणून होतोच असें नाहीं. या पैशांतून इमारती बांधल्या जातात, यंत्रें खरेदी करण्यांत येतात; मग पैसे परत देण्याचा प्रसंग आला तर नव्या ठेवी मिळेनाशा झाल्या म्हणजे काय वाट? मुख्यतः ठेवींच्या पैशानें बांधलेल्या इमारती व खरेदी केलेलीं यंत्रें यांच्या तारणावर कर्ज काढून ठेवीदारांचे पैसे "अनसिक्युअर्ड डिपॉझिटस्" या पंक्तीला बसविले जातात व त्यांचा उघड उघड विश्वासघात केला जातो ही गोष्ट निराळीच.

ठेवी घेण्याचें प्रमाण बांधणें हा एक उपाय. त्याबरोबरच ज्या औद्योगिक कंपन्या ठेवी घेतात त्यांच्या संचालक मंडळावर ठेवीदारांना प्रतिनिधित्व देण्यांत यावें हा दुसरा. सध्यां ठेवीदाराला अधिकाराचें व मानाचें असें स्थानच नाहीं. तो वार्षिक सभेला हजर राहूं शकत नाहीं; शेअरहोल्डरला मिळूं शकते अशी माहिती मागण्याचा त्याला हक्क नाहीं. सगळाच कारभार अर्जजीचा व संचालकांच्या मर्जीचा. ही स्थिति पालटली पाहिजे, व ती पालटण्यासाठी कंपनी कायद्यांत जरूर तो फरक घडवून आणला पाहिजे.

वरील दिशेनें ठेवीदारांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याचा प्रयत्न परिषद करील. महाराष्ट्रांतील औद्योगिक कंपन्यांमध्यें एकंदर २–२॥ कोटिइतका ठेवीदारांचा पैसा गुंतला आहे, यावरूनच प्रस्तुत प्रश्नाचें महत्त्व लक्षांत येतें. आपल्या हितसंबंधांच्या संरक्षणाचा प्रयत्न करीत असतां महाराष्ट्राच्या आर्थिक घडीला धक्का बसूं नये ही जाणीव परिषदेनें ठेविली असून, दहाव्या ठरावाअन्वयें "चांगल्या प्रामाणिक कंपन्यांनीं ठेवीची रक्कम सुरक्षित राहील अशी हमी दिल्यास त्यांच्याशीं सहकार्य करण्यास ठेवीदार केव्हांहि तयार आहेत" असें आश्वासन दिलें आहे.

प्रस्तुत लेख ठेवींच्या प्रश्नाचें स्थूल स्वरूप विशद करण्यासाठी लिहिला आहे. अधिक माहिती हाताशीं आली, म्हणजे या प्रश्नाचा सांगोपांग परामर्ष आणखी एका लेखांत घेतला जाईल.


रेखा फर्निशर्स

३२४ सदाशिव, पुणें २

सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे कारखानदार



दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

तालुका–बेळगांव

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ४०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हज् | रु. ३१,००० ,, |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ३,४७,००० ,, |

या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर आकर्षक आहेत. याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.

बँक सुरुवातीपासून "अ" वर्गात आहे. यावरून बँकेचा कारभार अत्यंत दक्षतेनें केला जातो हें सिद्ध होतें.

विशेष माहितीसाठीं भेटा.

ए. के. सोमणात्रे, D. Co-op. सेक्रेटरी.

जी. एम्. भातकांडे, चेअरमन.

# ठेव ठेवतांना कोणती दक्षता घ्यावी ?

( ग. रा. साठे, दि साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि., पुणे )

मी येथन जुलैमध्यें नवीन यंत्र खरेदीकरितां परदेशीं प्रयाण केलें. त्यानंतर ठेवीदारांत खळबळ उडवून देणाऱ्या कांहीं घटना घडून आल्याचें परत येतांच समजलें. मी जाण्यापूर्वी येथील एका दैनिक पत्रकारांनीं याबाबत लेख लिहून या विषयास तोंड पाडलें होतें, तेव्हां त्यांच्या लेखास उत्तर देऊन दुसरी बाजू मांडण्याचा प्रयत्न केला होता, पण त्याचा थोडा विपर्यस्त अर्थ करून त्यांनीं पुन्हां लेख लिहून आपलेंच म्हणणें खरें, असें दाखविण्याचा प्रयत्न केला होता. ठेवीदारांनीं काय खबरदारी घेणें आवश्यक आहे, या विषयासंबंधीं मी १९४१ सालीं एक लेखमाला लिहिली होती. ती आपण उद्धृत करा अशी विनंति मी त्यांना केली होती पण पुढें तें प्रकरण शितकेंच राहिलें. पुन्हां या विषयानें उसळी मारून परिषद् भरविण्यास व अर्थमंत्र्यापर्यंत हें प्रकरण नेण्यास काय विशेष घडामोडी झाल्या तें मला माहीत नाहीं. परिषदेच्या एका निमंत्रकाशीं माझा या विषयासंबंधीं पत्रव्यवहार झालेला होता. आजची अवघड परिस्थिति उत्पन्न होण्यास कांहीं थोड्या कंपन्या जितक्या जबाबदार आहेत तितक्याच प्रमाणांत ठेवीदारही जबाबदार आहेत असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. पुन्हां तरी अधिक आपत्ति महाराष्ट्रीय ठेवीदारांवर येऊं नये व प्रामाणिक कारखानदारांचा ठेव रूपानें मिळणाऱ्या भांडवलांचा मार्ग बंद होऊं नये म्हणून १९४१ मधील लेख पुन्हां वाचकांपुढें मांडीत आहे, त्याचा ठेवीदारांनीं शांतपणें विचार करावा.

महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांस ठेव स्वरूपानें भांडवल सध्यां अधिक सौकर्यानें उपलब्ध होण्यासारखें आहे व ठेव घेणारे जबाबदारी ओळखूं लागल्यास धंद्यास लागणारें खेळतें व थोडेंफार स्थायी भांडवलहि मिळण्याची शक्यता आज उत्पन्न झाली आहे. तथापि, ठेव-योजनेचें यश केवळ ठेव घेणाऱ्यांच्या एकतर्फी जबाबदारीवरच अवलंबून नसून ठेव देणारावरहि थोडीफारच नव्हे तर बरीच जबाबदारी आहे व ती ठेवीदारांनीं ओळखली नाहीं तर प्रामाणिकांतला प्रामाणिक व सावधांतला सावध ठेव घेणाराहि अयशस्वी होण्याचा संभव उत्पन्न होऊन हें उपलब्ध झालेलें साधन लुप्त अगर निदान कष्टसाध्य तरी निश्चित होणार: आहे. तेव्हां ठेवी ठेवणारांनीं ठेव ठेवण्यापूर्वी काय करावयास पाहिजे तें आपण पाहूं.

### ठेव कोणाकडे ठेवावी ?

ज्याच्याकडे ठेव ठेवावयाची त्याच्या पूर्वीच्या व्यवहाराची शक्य तितकी माहिती मिळविणें जरूर आहे. आपले दोष शक्यतों लपवून ठेवण्याचा सर्वसाधारण मनुष्यस्वभाव आहे. आपल्या धंद्यांत कमाई नाहीं असें सांगून आपणांकडे पैसे मागण्याकरितां क्वचितच कोणी येईल. बहुतेक जण आपल्या धंद्याची भरपूर खरीखोटी प्रशंसा करून पैशाची मदत मिळाल्यास आपण धंदा कसा वाढवूं व पैसे कसे तेव्हांच फेडूं याचेंच वर्णन करील. त्यांत देशोद्धाराच्या गोष्टी येतील, पूर्वी आपण काय केलें त्याचें रसभरित वर्णन येईल, पूर्वी केव्हां बुडालों असल्यास लोकांनीं आपल्याला फसवल्याचें गाऱ्हाणें सांगण्यांत येईल, धंद्याची परिस्थिति अनुकूल असल्याचें सांगण्यांत येईल, व धंद्यांत मिळणारा सर्वच नफा आपणच खाण्याच्याविरुद्ध आपण असून नफा पुष्कळ मिळणार असल्यामुळें आपण भरपूर व्याज देऊं, असें आमिषहि दाखविलें जाईल. तथापि या सर्व गोष्टींस भुलून न जातां, सांगितल्या गेलेल्या गोष्टींची शक्याशक्यता नीट पारखणें जरूर असतें. पुष्कळ वेळां असेंच आढळून येतें कीं, खरे प्रामाणिक लोक लाजाळू ('शाय') असून आपली बाजू व्यवस्थित पटण्याच्या स्वरूपांत मांडूं शकत नाहींत. उलट, खूप बोलणारे व अघळपघळ गप्पा मारणारे केवळ दिशाभूल करणारे ठरतात. तेव्हां रकम ठेवणाऱ्यांनीं सांगितल्या गेलेल्या सर्व गोष्टी खऱ्याच असतील असें न मानतां, तसेंच एखाद्या अबोल माणसास आपली बाजू फगवून मांडतां आली नाहीं म्हणून त्याची बाजू लंगडी आहे अशी समजूत करून न घेतां, प्रत्येक योजना शांतपणानें पारखून ठेव ठेवावयाची किंवा नाहीं तें ठरवावें.

### चौकशीचे मुद्दे

पुढील गोष्टी विचारांत घेऊन आपल्या मनास पटेल असें समाधानकारक उत्तर आपलें मन देऊं शकल्यास, केलेला व्यवहार सहसा धोक्याचा ठरणार नाहीं. विचार करावयास पाहिजेत अशा प्रमुख बाबी पुढीलप्रमाणें:—

(१) धंद्याच्या सुरुवातीपासूनच्या वाढीचा इतिहास, (२) व्यवहाराचा नियमितपणा, (३) धंद्यांत गुंतलेलें स्थायी तसेंच खेळतें भांडवल, (४) त्यांतला धंदेवाल्याचा स्वतःचा हिस्सा, (५) स्वतःचें अधिक भांडवल उपलब्ध असूनहि तें धंद्यांत गुंतविण्याबद्दलची धंदेवाल्याची नाखुषी अगर कुचराई, (६) सुधारणावृत्तीचा अभाव, (७) धंद्यास उपलब्ध असलेला वाव, तसेंच, (८) चढाओढीची शक्यता, वगैरे.

### स्वावलंबन व आत्मविश्वास

साधारणपणें ज्या धंद्याची हळू कां होईना पण सतत सालोसाल प्रगति होत आहे, जो चालकांनीं स्वतः मेहनत करून उदयास आणण्याचा प्रयत्न चालविला असेल, ज्यांत चालकांनीं आपलें सर्वस्व घातलेलें असेल, तो धंदा बुडण्याची सहसा भीति नाहीं असें निश्चित समजावयास हरकत नाहीं. पण जो उभारण्यास श्रम मुळींच पडले नसतील व ज्याबद्दल स्वतः चालक स्वतःची रकमहि गुंतवण्याइतका आत्मविश्वास दाखविण्यास कचरत असतील तेथें कांहींतरी पाणी मुरत आहे असें समजण्यास हरकत नाहीं. नाहींतर धंदा फायदेशीर आहे असें लोकांस सांगून अधिक व्याज देतां येण्याची शक्यता दुसऱ्यास सांगणारा, स्वतःची असलेली रकम त्या धंद्यांत कां गुंतविणार नाहीं ?

### पतीचें महत्त्व

धंद्याचें यशापयश धंद्यांतील पतीवरहि पुष्कळसें अवलंबून असतें. केलेले वायदे वेळचेवेळीं पुरे करतां न आल्यास लाखाबारी भांडवल असूनहि धंद्यास स्थायीपणा येत नाहीं. ज्याचें स्वतःचें मालकीचें भांडवल कांहीं नाहीं, पण केवळ देवघेवीच्या नियमितपणावरच ज्यांनीं धंद्यास उर्जितावस्था आणली अशीं उदाहरणेंहि अनेक दाखवितां येतील. उलट, स्वतःचें भांडवल भरपूर असूनहि बिनहिशेबीपणानें वागणारास बाजारांत पत नसल्याचें दिसून येतें. तेव्हां ठेवी घेणाराचा व्यावहारिक नियमितपणाहि पाहणें जरूर आहे.

### व्यवहारी वृत्ति

कांहीं माणसें मूळचीं खरोखरीच प्रामाणिक असतात. त्यांनीं धंद्यांत आपलें सर्वस्वहि घातलेलें असतें. पण ते व्यवहारांत बिन-

हिशेबी व बेफिकीर असतात व फाजील धाडसी असतात. जिन्याच्या खालच्या पायरीवरून एकदम शिखर गांठणें जवळजवळ अशक्यप्रायच समजण्यास हरकत नाहीं. हेनरी फोर्ड हा एकदम हेनरी फोर्ड झालेला नाहीं. एवढेंच नव्हे, तर आपले महाराष्ट्रीय हेनरी फोर्डहि—किर्लोस्कर—एका दिवसांत त्या पदवीला गेलेले नाहींत हें कोणींहि विसरूं नये. तेव्हां मजल गांठावयाची ती पायरीपायरीनेंच गांठली पाहिजे. मग कोणी जलद गांठूं शकेल तर कोणास अत्यंत वेळ लागेल. हा व्यवहार ओळखणाराच अखेर मजल गांठूं शकतो. तेव्हां ठेव घेणारांची व्यवहारी वृत्तीहि लक्षांत घेतली पाहिजे.

कांहीं धंदे असेहि असतात कीं, ते कांहीं विशक्षित काळपर्यंत व्यवस्थित चालतात; पण त्यांत गैरवाजवी गर्दी होऊं लागली कीं ते डबघाईस केव्हां येतील त्याचा नेम सांगवत नाहीं. अशा वेळीं धंदेवाल्याच्या कसोटीची वेळ असते व जो गांगरून जाऊन हताश होतो तो कितीहि प्रामाणिक, व्यवस्थित, नियमित असला तरी बुडण्याचाच संभव अधिक. अशा अडचणींच्या वेळीं गर्दीतून वाट काढून स्वतःकरितां निराळें व निश्चित कार्यक्षेत्र निर्माण करण्याची लायकी जो दाखवूं शकेल तोच निभावून जातो. याकरितां मनुष्य धिम्या वृत्तीचा व निश्चयी असावा लागतो.

### घाबरटपणा नको

इतक्या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यानंतर स्वतःची खात्री करून घेऊन एकदां ठेव दिल्यानंतर मात्र ठेवीदारानें घाबरटपणा दाखवितां कामा नये. धंद्यांत चढउतार नेहमींच राहणार. शिवाय समाजांत अकारण शत्रूहि कांहीं कमी नसतात. तेव्हां कोठें तरी, कोणीं तरी सांगितलेली गप्प खरी मानून घाबरटपणानें ठेवीदारांनीं एकदम रकमेची मागणी केल्यास धंदा कितीहि चांगला चाललेला असला व ठेव घेणारा कितीहि प्रामाणिक असला तरी तो पुरा पडूं शकणार नाहीं. ठेव म्हणून घेतलेली रक्कम ही कांहीं कोणी बँकेंत ठेवण्याकरितां घेत नाहीं. ती धंद्यांतच या ना त्या रूपानें गुंतवलेली असते व एका क्षणांत सर्व रक्कम उभी करणें अशक्यच असतें. अशा वेळीं निष्कारण घाबरटपणा करून अमुक गोम्या रक्कम काढून घेत आहे तेव्हां कांहीं तरी भानगड असली पाहिजे, अशी समजूत करून एकदम रकमेची मागणी करणें म्हणजे चालत्या गाड्यास खीळ घालण्यासारखेंच आहे. असल्या अगदी घाबरटपणाचें ठळक उदाहरण म्हणून स्पीसी बँकेचें देतां येईल. ही बँक केवळ ठेवीदारांच्या घाबरटपणामुळेंच बंद झाली हें वर्षानुवर्षें लिक्विडेटरचा भरमसाट खर्च चालवूनहि ठेवीदारांसच नव्हे, तर भागीदारांसहि रुपयाचे चौदा आणे मिळाले या एकाच गोष्टीवरून सिद्ध होत आहे. या घाबरटपणामुळें या मोठ्या बँकेबरोबर त्या वेळीं अनेक छोट्या बँकाहि नाहक बंद होऊन त्यांत अनेकांचें मनस्वी नुकसान झालें.

अशा कोट्यवधि भांडवल असलेल्या बँकेसारख्या संस्थेचा जेथें टिकाव लागत नाहीं, तेथें बिचारा तुटपुंजे भांडवल असलेला गरीब धंदेवाला काय पुरा पडणार! अशा रीतीनें एखादा बुडाल्यास गैरविश्वासाचें वातावरण निर्माण होऊन त्यांत कित्येक प्रामाणिक, धंद्यांत सर्वस्व घातलेलेहि, होरपळून निघाल्याशिवाय राहणार नाहींत व त्याचें सर्व खापर घाबऱ्या ठेवीदारांच्या माथींच फोडावें लागेल. बेजबाबदारपणें ठेवी घेणारे जितके देशद्रोही गणले जातील, तितकेच अविचारानें ठेव ठेवणारे व घाबरटपणा दाखविणारे ठेवीदारहि देशद्रोही ठरतील.

### नालायकांस मदत नको

अनेक वेळां ठेवी घेणाराची पुरी परीक्षा न करतां, ठेवीदाराची लायकी—नालायकी न पाहतां, धंद्याच्या शक्याशक्यतेचा कांहीं अंदाज न करतां व कित्येक वेळां अधिक व्याजाच्या आशेनें विनबुडाच्या बेजबाबदार माणसालाही ठेव देण्यांत येते व त्यांत बूड आली कीं ठेवीदारांस तेवढेंच निमित्त पुरून 'पहा लोक कसे अप्रामाणिक आहेत, अमक्यास ठेव दिली तीं बुडाली, तेव्हां धंदेवाल्याचा विश्वास धरावा कसा!' असें म्हणण्यास फावतें. यांत वास्तविक ठेवीदाराचीच चूक असते. वर नमूद केलेली कसोटी लावून जी रक्कम धंद्यांत गुंतविली जाईल, ती ९०–९५ टक्के तरी सुरक्षित म्हणून समजण्यास हरकत नाहीं.

जें विवेचन ठेवीस तेंच थोड्याफार फरकानें शेअर्सलाहि लागू आहे. धंद्यास ठेवरूपी चालू भांडवलाची, तसेंच शेअररूपी कायम स्वरूपाच्या भांडवलाचीहि जरूरी असते. ज्यांना शक्य असेल त्यांनीं शेअररूपानें, शक्य नसेल त्यांनीं ठेवरूपानें, धनिकांनीं तसेंच मध्यम वर्गानींहि आपली जबाबदारी ओळखून सरस–निरस पारखून, महाराष्ट्रांत लपलब्ध असलेल्या तुटपुंज्या धनाचा अंशतः तरी ओघ उद्योगधंद्याकडे वळवल्यास महाराष्ट्रांतील असलेले धंदे वाढीस लागून तसेच नवीन धंदेहि निर्माण होऊन महाराष्ट्राचे संपत्तींत भर पडल्याशिवाय राहणार नाहीं.


मुजुमदार टॉय वर्क्स

माना हालणारीं लाकडी चित्रें.

समक्ष येऊन खात्री करा.

३५५ सदाशिव पेठ [ शेडगेवाडी ] पुणें २



तार : BANKOP फोन १८९

दि बँक ऑफ कोल्हापूर लिमिटेड

स्थापना : १९१६

मुख्य कचेरी : लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

शाखा : (१) फोर्ट-मुंबई. तार BANKOLA, फोन ३४०४६ (२) मांडवी (३) शाहूपुरी–कोल्हापूर (४) गुजरी–कोल्हापूर (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) पेठ-वडगांव (८) मलकापूर (९) गडहिंग्लज (१०) निपाणी.

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. १०,१३,००० |
| एकूण रिझर्व्हज | रु. ११,८०,००० हून अधिक |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,७७,००,००० |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरीमध्यें सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्कृष्ट व्यवस्था

रिकरिंग डिपॉझिट व तीन वर्षें मुदतीच्या कॅश सर्टीफिकेटसच्या आकर्षक योजना.

—विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.—

व्ही. ए. सावंत

जनरल मॅनेजर.

# प्रचलित विमा–कायदा व त्याबाबत कांहीं विचार

## खऱ्या उत्पादकाची गळचेपी: ध्येय व योजना ह्यांतील विसंगति

( एक निरीक्षक. )

हिंदुस्थानांतील विमा–व्यवसाय प्रगत व्हावा, विमासंस्थांचा कारभार शुद्ध पायावर चालावा व देशभर इतस्ततः पसरलेल्या विमेदारांच्या हितसंबंधांचें संरक्षण व्हावें, म्हणून विमा–व्यवसायावर व विमासंस्थांच्या कारभारावर नियंत्रणें व निर्बंध लादणारा असा एक कायदा केलेला आहे. हा कायदा सन १९३८ चा विमा–कायदा या नांवानें ओळखला जातो. या देशांत आजतागायत जे अनेक कायदे झालेले आहेत त्यांत या विमा–कायद्यानें एक विशिष्ट स्थान मिळविलेलें आहे; कारण या कायद्याचा एकंदर इतिहासच मोठा मनोरंजक आहे. हा कायदा प्रथम तयार झाल्यावर व प्रत्यक्ष अमलांत येण्यापूर्वीच त्यांत दुरुस्त्या कराव्या लागल्या. ही या कायद्यांत दुरुस्ती करण्याची सुरू झालेली परंपरा आजतागायत चालू असून १९५० सालीं तर मूळ कायद्यांत विलक्षण दुरुस्त्या झालेल्या आहेत; व अनेक नवीन नियंत्रणें व निर्बंध मूळ कायद्यांत घुसडण्यांत आलेले आहेत. अद्यापही कांहीं नवीन दुरुस्त्या सुचविल्या जात आहेतच. म्हणजे, मूळ कायदा तयार होऊन आज जवळ जवळ तेरा वर्षे होत आलीं, तरीही हा कायदा अद्यावत् व सर्वांचें समाधान करण्यास समर्थ झाला असें म्हणता येत नाहीं. मूळ १९३८ सालच्या कायद्यांत १९५० ला सुधारणा झाली, तरीही कित्येक ठिकाणीं या कायद्याचे भाषेंत सुलभता आली नाहीं, दुर्बोधता राहिली आहे, दोष राहिले आहेत व कित्येक कलमांची वाक्य व शब्दरचना समाधानकारक नाहीं, असें तज्ज्ञ म्हणतात. परंतु एकंदरींत आजचा कायदा विमासंस्थांचे चालक व विमागणिती यांना पसंत आहे.

एवंगुणविशिष्ट असा हा विमा–कायदा करण्याचें मुख्य कारण व सूत्र "विमेदारांचें हितसंरक्षण" असें सांगण्यांत येतें. विमासंस्था ही मुख्यतः विमेदाराकडून हप्त्यांचे रूपानें आलेल्या पैशावर चालते. एकेका विमासंस्थेकडे, तिच्या कार्याच्या व्यापाप्रमाणें, विमेदारांकडून आलेले लक्षावधि रुपये जमा होत असतात. या पैशाचा योग्य विनियोग व्हावा, गैरहिशेबी कारभार चालू नये व हा जमा झालेला पैसा विश्वस्तनिधि असल्यामुळें त्याचा व्यवहार विमेदारांचें अंतिम नुकसान होऊं नये याच पद्धतीवर व्हावा, तसेंच विमा उतरण्याचा हेतु विफल होऊं नये, म्हणून विमा–कायद्यानें अनेक निर्बंध, नियंत्रणें व दंडक घातले आहेत. त्या सर्वांचा समाचार घेणें स्थलाभावीं शक्य नाहीं. सबब यापैकीं कांहीं विशिष्ट बाबींचा परामर्श या लेखांत घेण्याचें ठरविलें आहे.

### झळ फक्त खालच्या थराला

विमेदारांचें हितसंरक्षण व्हावें, एतदर्थ १९५० च्या दुरुस्त विमा–कायद्यानें जीवन विमा–संस्थांचे खर्चाचे प्रमाणावर बंधन घातलें आहे. हेतु हा कीं, विमा–संस्थांचा कारभार काटकसरीनें चालावा व भरमसाट खर्चास आळा बसावा. अर्थात् संस्थेच्या खर्चांत जर काटकसर व्हावयास हवी असली, तर खर्चाचे कपातीची कात्री वरपासून खालपर्यंत, सर्वत्र प्रमाणशीर चालवावयास हवी. पण प्रस्तुत कायद्यांत तशी योजना नाहीं; एवढेंच नव्हे, तर हा व्यवहार काटकसरीनें व्हावा म्हणून जीं बंधनें आहेत, त्यांचा उपसर्ग मुख्यतः विमा–संस्थेच्या घटकांपैकीं खालच्या थरालाच ज्यास्त पोहोंचणार आहे व स्वार्थत्यागाची झळ त्यांनाच लागते असें दिसून येईल.

चालू कायद्याप्रमाणें जीवन–विमा संस्थांच्या मूल्यमापनांत जर 'विभागणी–शिल्लक' आढळून आली, तर त्यापैकीं फक्त ७½ टक्केच शिल्लक भागीदारांत वाटण्याकरितां वेगळी करतां येते. पण यापुढें एक पाऊल जाऊन या ७½ टक्क्यांतून करमाफ ५ टक्केचे वर भागीदारांना नफा पडत असल्यास, असा नफा वांटण्यास कायद्यानें बंदी करावी, निदान १० वर्षे तरी अशी बंदी असावी. भागीदार हे संख्येनें अतिशय मर्यादित असतात; तसेंच त्यांनीं भांडवलाचा एकदाच पुरवठा केलेला असतो. तेव्हां देशांतील विमा–संस्था प्रगत आणि बळकट होण्याकरितां, त्यांचेकडून या त्यागाची अपेक्षा करणें वावगें नाहीं.

### संचालकांचा मोबदला

संचालक–मंडळाचे सभासदांना सभा–हजेरीकरितां, प्रवासखर्च म्हणून व संस्थेचें इतर कार्य करण्याबद्दल काय मोबदला मिळावा यावर सांप्रत नियंत्रण नाहीं. तेव्हां प्रत्येक संस्थेच्या प्रथमोत्तर वर्षाच्या नक्त हप्त्याच्या—रिन्यूअलस—उत्पन्नाच्या पायऱ्या (स्लॅब्स्) पाडून त्यावर ह्या मोबदल्याचे, काटकसरीचे धोरणास अनुसरून, टप्पे पाडावेत व हा मोबदला कायद्यानें ठरवून द्यावा. तसेंच, वर्षअखेर भागीदारांचेपुढें मंजूर होण्याकरितां




अखिल भारतवर्षीयांस ही दिवाळी व नूतन वर्ष भरभराटीचें व सुख समृद्धीचें जावो !

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोकरी ), धातूचें सामान, चंदनी लाकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, साग तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स् मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवीवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. COM., C. A. I. I. B.
मॅनेजर

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठा.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

जे जमा–खर्च टाकले जातात, त्यांत संचालक–मंडळाच्या प्रत्येक सभासदास हिशोबाचे वर्षांत किती रकम व काय कारणास्तव दिली गेली याचा तपशील जोडण्याची सक्ति असावी; म्हणजे हाताच्या बोटावर मोजतां येणाऱ्या व्यक्तींवर विमा–संस्थेचा किती खर्च झाला याची विमेदारांना परिपूर्ण कल्पना येऊं शकेल. हल्लींच्या विमा–कायद्यान्वयें संचालक–मंडळाचे सभासदांपैकीं एक चतुर्थांश सभासद विमेदारांतर्फेंचे म्हणून दर तीन वर्षांनीं निवडून येतात. विमेदारांचे हितसंरक्षणार्थ त्यांनीं काय कार्य केलेलें असतें, त्याचा अहवाल कोठेंही वाचावयास अगर पहाण्यास मिळत नाहीं. याबाबत कांहींतरी व्यवस्था व्हावी. प्रस्तुत लेखकाचे अल्प समजुतीप्रमाणें, विमा–संस्थेच्या मुख्याधिकाऱ्यास अगर शेष भागीदारांतर्फेंच्या संचालक मंडळास पसंत नसलेली व्यक्ति विमेदारांतर्फें म्हणून निवडून येणें कठिण असते. तसेंच विमा–संस्थेचे संचालकास बँकेचे संचालक–मंडळावर काम करण्यास बंदी असावी.

### वेतन–श्रेणींत विसंगति

विमासंस्थेच्या मुख्याधिकाऱ्यासही संस्थेच्या रिन्युअल उत्पन्नांतील प्रमाणावर व खर्चाचे प्रमाणावर जास्तींत जास्त किती पगार घेतां येईल हें ठरवून दिलें पाहिजे. नाहींतर " मुख्याधिकारी तुपाशी आणि इतर उपाशी" अशी स्थिति होईल. विमा–संस्थेच्या खर्चानें मोटार, वगैरे सुखसोयी साधारणपणें मुख्याधिकाऱ्यास असतातच. क्वचित् प्रसंगीं मुख्याधिकारी व हाताखालचे दुय्यम अधिकारी व इतर नोकरवर्ग यांचे वेतनश्रेणींत जमीन–अस्मानाचा फरक असतो, असें ऐकण्यांत येतें. हें खरें असल्यास ही परिस्थिति हृदय-विदारक आहे असें म्हणावें लागेल. विमा–संस्थेच्या मुख्याधिकाऱ्यास इतरत्र कोठेंही अधिकाराची अगर संचालक–मंडळावर काम करण्याची मनाई असावी.

### विमा–गणिति

सन १९३८ सालचे विमा–कायद्याप्रमाणें प्रथम दर पांच वर्षांनीं मूल्यमापन करण्याची तरतूद होती. १९५० सालीं हा कायदा दुरुस्त केल्यावर त्रैवार्षिक मूल्यमापनाची सक्ति झाली आहे. म्हणजे १५ वर्षांचे कालांत तीन ऐवजीं पांच मूल्यमापनें होतात. याचाच अर्थ, पूर्वीपेक्षां नवीन कायद्यामुळें निदान दोन मूल्यमापनें अधिक होतात. अर्थात् त्यामुळें मूल्यमापन करणाऱ्या विमागणितीस दोन जादा मूल्यमापनांचा पैसा नवीन कायद्यामुळें खिशांत पडणार आहे. हिंदुस्थानांत मूल्यमापनाचें काम घेणारे विमा–गणिती फारच थोडे आहेत. त्यांचे विद्वत्तेबद्दल वगैरे मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. तथापि सर्वसाधारणपणें विमा–गणितीस भरपेट तनखा मिळतो व त्यांतच आणखी भर घालण्याच्या योजनेचें आश्चर्य वाटतें. जर विमाकायद्याचा मुख्य रोख देशांतील विमासंस्था जोमदार व्हाव्यात असा असेल, तर त्याकरितां विमा–गणितींकडूनही थोडाफार त्याग झाला पाहिजे. याकरितां विमा–गणितीस द्यावयाच्या मोबदल्यावर नियमन हवें.

### मध्यमवर्गीय नोकरांची दुःस्थिति

विमासंस्थेंत काम करणाऱ्या नोकरवर्गाचे दोन भाग पडतात. एक अधिकारीवर्ग व दुसरा दुय्यम ( कारकून इ. ) वर्ग. यांपैकीं दुसऱ्या वर्गाची सांप्रतची परिस्थिति कांहीं संस्थांतून अनुकंपनीय आहे असें म्हणतात. या वर्गांत सर्वसाधारणतः मध्यमवर्गीयांचाच भरणा असतो. देशांतले विद्वान् लोक मध्यमवर्गीयांचे परिस्थितीबाबत सहानुभूतीचे व विषादाचे उद्गार काढतांना आढळतात. पण तींत सुधारणा मात्र करण्याची जोरदार कोशीस कोणी करीत नाहीं. बँकांच्या नोकरवर्गाबाबत एक सरकारी हुकूमनामा–अवार्ड–झाला आहे. तथापि, विमा–संस्थांतील नोकरवर्गाला मिळणाऱ्या वेतनश्रेणींची व रजा, प्रॉव्हिडंड फंड इत्यादि बाबतची संपूर्ण चौकशी होऊन त्याबाबत एकादा हुकूमनामा–अवॉर्ड–अद्यापपर्यंत कां निघाला नाहीं, याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. दुय्यम नोकरवर्गानें पगारवाढ, महागाई भत्तावाढ, रजेचे न्याय्य हक्क, वगैरे गोष्टींची मागणी केल्यास त्यांचेंपुढें खर्चाचे प्रमाणाचा बागुलबोवा उभा केला जातो. मात्र इतर अनेक वायफट खर्च करतांना या गोष्टींचा विसर चालकवर्गास पडतो. स्वतःची मिजास चालू ठेवून, चालू महागाई व चढतें जीवनमान यामुळें लाचार व अगतिक बनलेल्या दुय्यम नोकरवर्गास "खर्चाचे प्रमाणाचे " नांवाखाली दाबून ठेवणें मानवधर्मास निश्चित धरून नाहीं.

### "अधिकारी"ची व्याख्या पाहिजे

अधिकारीवर्गाबाबत जरा निराळ्या दृष्टीनें पहावयास हवें. अधिकारी कोणास म्हणावें याबाबतची निःसंदिग्ध शब्दांत व्याख्या विमाकायद्यांत सांपडत नाहीं. त्यामुळें साधारणतः संस्थेंत एखादा विभाग अगर शाखा ज्याचे देखरेखीखाली चालते, ती व्यक्ति अधिकारी या सदरांत मोडेल असें वाटतं. यामुळें एकादे लहान विमासंस्थेंत १००–१२५ रु. पगारावर देखरेखीचें काम असलेला व जेमतेम उदरनिर्वाह करणारा व एकादे मोठे संस्थेंत ५००–७०० रुपयांचेवर पगार घेऊन एकादा विभाग संभाळणारा, हे दोघेही अधिकारीच. विमाकायद्याचें कलम ३१ अ प्रमाणें अधिकारी व्यक्तीस विमा एजंट म्हणून काम करण्यास बंदी आहे. वास्तविक पहातां संस्थेंतील अंतर्गत काम करणें व बाहेरील क्षेत्रांत फावल्या वेळांत विमा–गिऱ्हाईक मिळविण्याचें काम करणें, हीं कर्तृत्वाचीं दोन भिन्न क्षेत्रें आहेत. असें असतां जर एकाद्या व्यक्तीस अधिकारी म्हणून काम करूनही, विमा–गिऱ्हाईक मिळविण्याचें कसब असलें, तर तसें काम मिळवून साधा एजंट म्हणून मोबदला घेण्यास कां आडकाठी असावी हें समजत नाहीं. संचालक मंडळाच्या सभासदांस व मुख्याधिकाऱ्यास सभा–हजेरी-भत्ता, प्रवासभत्ता, संस्थेचे इतर कांहीं कार्य केल्यास त्याबद्दल मोबदला, इतरत्र संचालक म्हणून काम करण्याची मुभा, अशा सवलती असतात. मग दुय्यम अधिकाऱ्यांवरच तेवढे असे निर्बंध कां ? हें सर्वांना समान संधि मिळण्याच्या तत्त्वास धरून होतें कां ? किमानपक्षीं मासिक ५०० रुपयांपेक्षां कमी मिळकत असणारी व्यक्ति कोणतेंही काम विमा–संस्थेंत करीत असल्यास, तिला अधिकारी असें मानण्यांत येणार नाहीं, अशी तरी सोडवणूक हवी. वास्तविक विमा–काम जितकें वाढेल तितकी राष्ट्रीय संपत्तींत भर पडते म्हणतात. तेव्हां विम्याचें काम वाढण्याचे मार्गांत हा अधिकारी वर्गावर घातलेला निर्बंध जाचक नाहीं कां, याचा सुज्ञांनीं विचार करावा.

### मोबदल्यावर कडक निर्बंध

विमाप्रतिनिधींचे तीन वर्ग आहेत: एक चीफ एजंट, दुसरा स्पेशल एजंट व तिसरा साधा एजंट. विमा संस्थेचा बराचसा पैसा या तिन्हींही प्रकारचे एजंटांना विमा काम मिळविण्याबाबत देण्यांत येणाऱ्या मोबदल्यावर खर्ची पडतो. तेव्हां काटकसरीचा कारभार व्हावा म्हणून या मोबदल्यावर अतिशय कडक निर्बंध घातले आहेत; त्या सर्वांचा परामर्ष घेणें एका छोट्या लेखांत शक्य नाहीं. तथापि, बानगीदाखल स्पेशल एजंटांपुरताच विचार करूं. स्पेशल एजंट म्हणून काम करणें असल्यास त्यास कायद्याप्रमाणें खालील अटी पूर्ण कराव्या लागतातः—

(१) स्पेशल एजंट म्हणून काम करण्याचा प्रतिवर्षी पुनर्जिवित करण्याचा सरकारी दाखला घेणें.*

(२) हाताखाली विमा–काम मिळविणारे किमान दोन साधे एजंट बाळगणें.

(३) प्रतिवर्षी ५०,००० रुपयांचें व ज्यावर पूर्ण वर्षाचे हप्ते भरले गेले आहेत, असें काम पुरें करणें.

(४) एखादे वर्षी वरीलप्रमाणें काम पुरें न झाल्यास मिळालेल्या मोबदल्याचा पन्नास टक्के भाग विमासंस्थेस परत करणें; तो जप्त होईल.

(५) दोन वर्षे लागोपाठ उपरोक्तप्रमाणें काम न झाल्यास स्पेशल एजन्सी रद्द होते.

(६) दोन साधे एजंट हाताखालीं न ठेवतां, स्पेशल एजंटानें स्वतःच सर्व काम पुरें केल्यास त्यास मोबदला साध्या एजंटाप्रमाणें मिळावयाचा.

### खऱ्या उत्पादकाचे हाल

वरील अटींचा सूक्ष्म अभ्यास केल्यास, एक गोष्ट प्रामुख्यानें डोळ्यांत भरते. विमा कामाची वाढ होणें हें जर राष्ट्रीय संपत्तींत भर घालण्याचें साधन आहे असें समजलें, व त्याचें उत्पादन वाढविणें हेंही एक राष्ट्रीय कर्तव्य आहे असें मानलें, तर फक्त विमा क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींवरच या उत्पादनाचा परिणाम व दर्जा ( क्वॉलिटी व क्वॉन्टिटी ) याबाबत जबाबदाऱ्या टाकल्याचें दिसून येईल. उद्योगधंद्यांतल्या इतर कोठल्याहि शाखेंत एकाद्या व्यक्तीनें किती व कोणत्या दर्जाचें उत्पादन केलें पाहिजे, याबाबत कायद्याचें जबर नियंत्रण नाहीं. मात्र विम्याचें काम करणारा स्पेशल एजंट असला कीं त्यानें वर्षांत ५०,००० रुपये रकमेचें काम एका विशिष्ट पद्धतीनेंच पुरें केलें पाहिजे हें परिमाण व त्यावर पूर्ण वर्षाचे हप्ते जमा व्हावेत हा त्या कामाचा दर्जा. याप्रमाणें काम न झाल्यास त्याला शिक्षा म्हणून निम्में कमिशन जप्त. 'समान संधी'च्या कल्पनेची यापेक्षां निर्दय थट्टा ती कोणती? संस्थेचें काम वाढो न वाढो, खर्चाचें प्रमाण खाली येवो न येवो, विमेदारांस बोनस व भागिदारांस नफा मिळो वा न मिळो, संचालक मंडळाच्या मुशाहिऱ्यांत कपात नाहीं. मुख्याधिकाऱ्याच्या वेतनांत अगर वाढींत काट नाहीं. मात्र स्पेशल एजंटांचे कामांत जरा कसूर झाली कीं त्याला मुर्दंड व निम्मी मिळकत जप्त. उन्हातान्हांत हिंडावें, पाऊसपाण्यांत काम करावें. थंडी वाऱ्याची पर्वा न करितां मर मर मरावें, मानापमानाच्या कल्पना विसराव्यांत, विमेच्छूंच्या हेटाळणीचा विषय बनावें, स्वाभिमानास पारखें व्हावें, एक एक विमेदार मिळविण्याकरितां रक्त आटवावें व एका परमोच्च अशा " सामाजिक–स्थैर्य " व " राष्ट्रीय-संपत्ति " वर्धमान करण्याच्या कामांत जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करीत असतां जरा कुठें थोडाफार उणेपणा आला कीं त्याकरितां जबर शिक्षा भोगावी. विमा–कायद्याचा हा खासा न्याय होय!

हा परमेश्वरा! 'खर्चाचे प्रमाणाचा' बागुलबोवा दाखवून दारिद्र्यांत पिचत ठेवल्या गेलेल्या विमासंस्थेच्या नोकरवर्गाचा व विमाकायद्याचे बंधनामुळें हतबल व निराश झालेल्या विमा-प्रतिनिधी वर्गाचा पाठिराखा आतां तूंच! विमा संस्थांच्या ह्या रक्तवाहिन्या कार्यप्रवण व कार्यक्षम राहिल्या, तरच विम्याचा प्रसार होणें शक्य होईल आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या व्यवसायाचा खरा फायदा समाजास मिळूं शकेल. ह्या व्यापक दृष्टीनेंहि ह्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे.

---

शिल्लक टाका, तिचें योग्य जतन करा!

शिल्लकेनें

★ आपली प्रतिष्ठा वाढेल.
★ औद्योगिक भरभराट होईल.
★ कार्यक्षमता वाढेल.
★ मानसिक स्वास्थ्य मिळेल.

मुदतींच्या ठेवींसाठीं सवलतीचे दर

डेक्कन मर्चंटस्
को-ऑपरेटिव्ह बँक लि.

२१७ चर्निरोड, मुंबई ४. बी. बी. स्टेशन, दादर.

सांडू ब्रदर्स यांची अनुभवसिद्ध औषधें

सांडू-प्रेग-युटेरो — गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
सांडू-बाळंत काढा — नं.१ पहिले दहा दिवसांत घेणेंचा, नं.२ दहा दिवसानंतर घेणेंचा
सांडू-बाल कडू — मूल उपजल्यापासून देण्यास योग्य
सांडू कुमारी आसव नं.३ — मुलांचे यकृत (लिव्हर) विकारांवर उत्कृष्ट टॉनिक
सांडू-टोमॅटो कंपाउण्ड — भूक लागून अन्नपचनाकरितां व्हिटॅमिन युक्त टॉनिक

द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट अँड ड्रगिस्ट, चेंबूर - मुंबई

# हिंदी संशोधक नाउमेद व निष्क्रिय कां?

## राष्ट्रीय प्रगतींत शास्त्रज्ञांचें महत्त्वाचें स्थान

( श्री. ल. फणसळकर, एम. एस. ( यू. एस. ए. ), ए. आर. टी. सी. ( ग्लासगो ), ए. आर. आय. सी. ( लंडन )
चीफ केमिस्ट, दलौदा, मध्य भारत. )

सुमारें दोन वर्षांपूर्वी न्यूयॉर्कमध्यें स्टॅन्डर्ड ऑइल कंपनीचे अध्यक्ष एका सभेंत भाषण करतांना म्हणाले:—"कामानिमित्त मला पुष्कळ वेगवेगळ्या देशांना भेटी द्याव्या लागतात व सहाजिक पुष्कळ लोकांच्या गाठी–भेटी होतात, तेव्हां अनेक वेळां अमेरिकेची सुबत्ता व सुसंपन्न स्थिति याबद्दल बोलणें निघतें. निसर्गानें सढळ हातानें अमाप संपत्ति अमेरिकेला दिली असल्यानें सहाजिकच अमेरिका धनाढ्य झाली आहे, असें मत बहुतेक ठिकाणीं प्रदर्शित केलें जातें. राष्ट्राची सुबत्ता जर नुसत्या निसर्गाच्या देणगीवर अवलंबून असेल, तर अमेरिकेपेक्षा उच्च दर्जाच्या लोखंडाच्या भरपूर खाणी व पेट्रोलचा साठा असलेल्या दक्षिण अमेरिकेंतील गौतामेला देश इतका मागें कां ? मोटारीस आवश्यक असलेल्या गोष्टी भरपूर असून सुद्धां तेथें दर दोनशें माणसांना एक मोटार, तर अमेरिकेंत तेंच प्रमाण दर तीन माणशीं एक कां ?

"निसर्गाची देणगी तर अत्यंत महत्त्वाची आहे. पण अव्वल दर्जाचें शास्त्रज्ञांचें पाठबळ व त्यांना संशोधनांत गुंतवून, त्यांना लागेल ती मदत करून, नैसर्गिक संपत्तीचा मानवतेला अधिकांत अधिक उपभोग मिळवून देण्याची व त्यामध्यें व्यापारांत वृद्धि करावयाची अमेरिकन लोकांची व कारखानदारांची वृत्ति हेंच या सुसंपन्नतेचें खरें कारण आहे. तीन वर्षांमागें गल्फ कंपनीनें ( हीं पण स्टॅन्डर्ड ऑइल कं. सारखी अमेरिकेंतील मोठी तेलाची कंपनी आहे. ) एका नव्या पद्धतीचा शोध लावून तेल शुद्ध करण्याच्या खर्चांत दर गॅलन मागें अर्धा सेंटची बचत केली. आम्हांला हें कळलें मात्र, आम्हीं लागलीच आमच्या संशोधन खात्याच्या मागें लागलों, त्यांना गेल्या दोन वर्षांत सुमारे ४० लाख डॉलर्स दिले आणि सांगावयास अत्यंत आनंद वाटतो कीं, आमच्या शास्त्रज्ञांनीं आम्हांला जी नवीनच पद्धत दिली आहे, तिनें आम्हीं आतां गॅलन मागें एक सेंट वाचवूं शकूं.

"आमच्या प्रतिस्पर्ध्यानें, एखाद्या गोष्टींत आपल्यावर जर मात केली, तर त्याला खाली ओढण्याचा प्रयत्न न करतां, आपली कल्पकता, शोधक बुद्धि व साधनसामुग्री ह्यांचा ईर्षेनें उपयोग करून, त्याच्या पुढें जाण्याचा प्रयत्न आम्हीं करतों व त्या प्रयत्नांत सहाजिकच आमची कार्यक्षमता इतकी वाढते कीं, जगाच्या बाजारपेठेंत आमचा माल उत्तम व फायदेशीर ठरतो व व्यापारांत आमची चलती होते."

दीड शतकाच्या पारतंत्र्यानंतर आपण स्वतंत्र झालों आहोंत व त्याबरोबरच जगांत एक मानाचें स्थान पण आपणांस प्राप्त झालें आहे. तो मान टिकवणें हें जसें आपल्या राजकीय व लढाऊ बळावर अवलंबून आहे, तसेंच ते आपले व्यापारी, कारखानदार व संशोधक यांवर पण अवलंबून आहे. आपली आजची स्थिति आपण विचाराकरतां घेऊं. आपला देश शेतीप्रधान आहे. जगांत असणाऱ्या दुभत्या जनावरांपैकीं १/३ जनावरें आपल्या देशांत आहेत. पण पिढ्यान् पिढ्या अर्धपोटीं राहिलेल्या आपल्या जनतेस अर्धपोटीं तरी जगण्यासाठीं लागणाऱ्या अन्नासाठीं इतर देशांपुढें सध्या हात पसरावे लागत आहेत. एकेकाळचे दूधदुभत्यानें सुसंपन्न असलेले आपण, कसेंतरी चहाला पुरेसें, भरपूर पाणीमिश्रित दूध अगर परदेशांतून आणलेल्या पावडरचें बनवलेलें दूध मिळवूं शकतों आणि अस्सल तुपाऐवजीं डालडासारख्या कृत्रीम तुपावर समाधान मानूं लागलों आहोंत. घरें बांधावयास लोखंड व सिमेंट नाहीं म्हणून अद्याप लक्षावधी माणसें उन्हा-पावसांत रहात आहेत. शिक्षण सार्वत्रिक होऊन ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें व्हावयास पाहिजे, पण पुस्तकें छापावयास लागणारा बहुतेक व वर्तमानपत्रांचा सर्वच कागद परदेशाहून येणार तेव्हां ! आज अंगभर कपडा मिळूं शकला तरी तो विकत घेतांना नाकीं नऊ येतात.

आमची कारखानदारी लक्षांत घ्यावी तर हल्लीं लेथ, वगैरे मशिन टूल्स आम्हीं येथें बनवूं लागलों आहोंत. परंतु तीं चालवावयास लागणारीं विशिष्ट पोलादें परदेशाहूनच आणावीं लागतात; कोट्यावधी रुपयांच्या प्लॅस्टिकच्या चिजा आतां येथें होऊं लागल्या आहेत; पण त्यांना लागणारी प्लॅस्टिकची पावडर अगर ब्लॉक्स विलायतेहूनच यावे लागतात. देशाच्या सर्व भागांत डोंगर पसरले आहेत व पाऊसही भरपूर असून सुद्धा अगदी थोड्या प्रमाणांत हायड्रो–इलेक्ट्रिकच्या उत्पादनामुळें जरूर ती विद्युतशक्ति परदेशांतून डीझेल तेल आणूनच उत्पन्न करावी लागते.

या वर्षीच्या मेकॅनिकल इंजिनिअर्स असोसिएशनच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना अध्यक्ष श्री. जे. पी. श्रीवास्तव म्हणाले:—

"आपल्या जीवनास आवश्यक असणाऱ्या प्रत्येक बाबतींत परदेशी यंत्रसामुग्री व परदेशी सुटे भाग ह्यांवर आपणांस सर्वस्वी अवलंबून रहावें लागतें, ही अत्यंत नामुष्कीची व दुःखाची गोष्ट आहे. नांव घेण्याजोगी जवळजवळ एकहि बाब भारतांत निर्माण होत नाहीं. शेतीचा विचार केला तर टूल्स, इंप्लिमेंटस व प्लँटस ह्याविषयीं पुरेशा सोईचा अभाव असल्यानें आपण मोठ्या प्रमाणावर शेती करूं शकत नाहीं. त्या गोष्टींचें उत्पादन तर दूरच राहिलें, पण आपल्या मेकॅनिकल इंजिनिअर्सचा दर्जा इतका कनिष्ट आहे कीं, कित्येक ठिकाणीं उभी केलेली यंत्रसामुग्री कार्यक्षमतेनें व व्यवस्थितपणें चालविण्यासहि आपण असमर्थ ठरलों आहों. कारखान्यांस लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या उत्पादनाचा विचार केला, तर त्यांतहि परिस्थिति तितकीच असमाधानकारक आहे. वहातुकीसाठीं लागणारीं रेल्वे इंजनें, सडी चेपण्याचे रूळ, मोटारी, मोटार सायकली, आगबोटी, विमानें, ह्या सर्वांचे बाबतींत आपण परदेशांवर अवलंबून आहों. पाणीपुरवठा, ड्रेनेज किंवा इरिगेशनचीं कामें घेतलीं तरी त्यास लागणारे पंप, व्हाल्व्ह आणि फिटिंग्ज हींहि परदेशांतूनच येतात. खाणींत वापरण्यांत येणारे कोलकटर्स, कोळसा वहाण्याचीं साधनें, इत्यादींसाठीं व इंजिनिअर्स, सर्जन्स, गणिती, ह्यांस लागणारीं अत्यंत बिनचूक हत्यारें ह्यांसाठींहि परदेशांकडे पहावें लागतें. परदेशी घड्याळें, परदेशी फाउंटन पेनें, परदेशी रेडिओ, परदेशी रेफ्रिजरेटर्स, परदेशी टेलिफोन्स, इत्यादि रोजच्या गरजेच्या जिन्नसाहि हीच कहाणी सांगतात."

गेल्या लढाईच्या धामधुमीत आपल्या कारखानदारांनीं भरमसाट फायदा मिळविला आहे. पण एका हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या लोकांनींच मिळालेल्या नफ्यांतील थोडासा भाग संशोधनाकरतां खर्च केल्याचें आढळतें आणि या सर्वांचा जो नैसर्गिक परिणाम व्हावयाचा तोच झालेला आपण पहातो. आपली कारखानदारी व व्यापार म्हणजे विलायती मालाची नक्कल व त्यांच्या मालाची दलाली, इतकेंच. परदेशांतून आलेल्या गोष्टींना थोडासा उजळा देऊन अगर त्याची बरहुकूम नक्कल करून कधींच अव्वल दर्जाची कारखानदारी आपणांकडे निर्माण व्हावयाची नाहीं. जोपर्यंत आपले तज्ज्ञ त्यांत सुधारणा करून जगांत नांव मिळवण्याइतपत त्यांत प्रगति करीत नाहींत, तोंवर या सर्व बाबतींत आपणांस सदैव परदेशांवरच अवलंबून रहावें लागणार.

आपल्याकडे अव्वल दर्जाचे शास्त्रज्ञ नाहींत असें नाहीं, परंतु त्यापैकीं पुष्कळांचें लक्ष थिओरेटिकल संशोधनाकडे केंद्रीभूत झालें आहे व त्यांनीं त्यांत आंतरराष्ट्रीय कीर्ति पण मिळविली आहे. खरी कमतरता आहे ती नैसर्गिक संपत्तींतून उपयुक्त व किफायतशीर वस्तूंची निर्मिति करणाऱ्या संशोधकांचीच. त्यांचें मुख्य ध्येय कुठलाही धंदा कच्च्या मालाच्या टंचाईमुळें अडून बसूं नये याकरतां कच्चा माल म्हणून उपयोगी पडतील असे निरनिराळे पदार्थ शोधून काढणें, त्यावर होणाऱ्या क्रियेवरील खर्चामध्यें बचत घडवून आणणें व मालाची पैदास सदैव उत्तम प्रतीची होईल अशी व्यवस्था करणें. या दृष्टीनें आपणाकडे अत्यंत कमी प्रमाणांत लक्ष दिलें जातें तर परदेशांत, विशेषतः अमेरिकेंत, या गोष्टीला अत्यंत महत्त्वाचें स्थान देण्यांत येतें. मला माहीत आहे, कीं एका मोठया अमेरिकन कारखान्यांत तेथील तांत्रिक सल्लागारानें लुब्रिकेटिंग तेलाचें सर्क्युलेशन जरा एका वेगळया पद्धतीनें करून लुब्रिकेटिंग तेलाच्या खर्चांत बचत करून दाखविली. त्याबरोबर त्या कंपनीनें, त्याचे नांवावर त्याचें पेटंट देऊन व त्याला बक्षिस देऊन त्याचा गौरव केला. आपल्याकडे मात्र संशोधकाची दुहेरी कुचंबणा होते. एक तर तो नोकरी करीत असतांना त्यानें संशोधन केलें तर त्याचे वरिष्ठ अधिकारी, त्यांना त्याचा उत्कर्ष सहन न होऊन म्हणा अगर इतर कारणानें म्हणा, पण त्याला कुठलेंही प्रोत्साहन देत नाहींतच, उलट त्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न करतात. दुसरें, एखाद्यानें स्वतंत्र रीत्या असें कांहीं संशोधन केलें तर कारखानदार त्याला मदत तर करीत नाहींतच पण त्याला योग्य मोबदला सुद्धां न देतां त्याचें संशोधन पदरांत पाडून घेण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितींत संशोधक नाउमेद व निष्क्रिय होऊन राहिले असल्यास कांहीं नवल नाहीं.

कुठलाही संशोधक मनाची शांति असेल तरच नवीन शोध वगैरे लावून राष्ट्राच्या संपत्तींत भर टाकूं शकेल. त्याकरितां जर सर्व कारखानदारांनीं आपल्या निव्वळ नफ्यापैकीं कांहीं भाग दरवर्षी जमा करून ती रक्कम आपल्या धंद्यांत येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्याकरतां खर्च केली तर पुढील दहा वर्षांत आपण संशोधनांत प्रगति करून, आपल्या सर्वांगीण उत्पादनांत वाढ करून जगाच्या बाजारपेठा काबीज करूं शकूं व आज अर्धपोटी, अर्धनग्न लोकांचा आपला देश खरोखरच सुजलां, सुफलां होऊं शकेल.

---


## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

हेड ऑफिस :– सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
शाखा :– दादर, माहीम, बेळगांव, पुणें

मॅनेजर
वा. पुं. वर्दे

खेळतें भांडवल:—
१ कोटी, १८ लाखांवर

असि. मॅनेजर
यो. मं. काम

ठेवी:—
१ कोटी, ८ लाखांवर




बँकेचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

श्री. सि. संझगिरी चेअरमन

---

## महाड तालुका सहकारी खरेदी विक्री संघ. लि.

महाड, कुलाबा.

दिवाळी व नूतन वर्ष संघाच्या शेतकरी आणि नागरिक सभासदांना व हितचिंतकांना सुखसमृद्धीचें जावो.

एम्. एम्. चांदे, B. Com. मॅनेजर.

सुं. मे. बुटाला, B. A., LL. B. चेअरमन.

---

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व हितचिंतकांस सुखाचें व समृद्धीचें जावो.

## दि बँक ऑफ औंध लि.

हेड ऑफिस:–१११–११२, सदाशिव पेठ, सातारा.

शाखा:–औंध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

★ मुंबई, पुणें, सांगली, सोलापूर व कऱ्हाड वगैरे ठिकाणांवर ड्राफ्टस् माफक दरांत दिले जातात.

★ कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यू यांचेकडून नुकतीच प्रत्येकीं रु. २० च्या अेक प्रमाणें रु. १,७६,१८० चे ८८०९ शेअर्स विक्री करणेंस व प्रत्येक शेअरवर रु. १० प्रमाणें मागणी करणेंस परवानगी मिळाली आहे.

★ शेअर्सना मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. शेअर घेऊं इच्छिणारांनीं वरील पत्त्यावर मागणी करावी.

★ मुदत ठेवी १ ते ५ वर्षे मुदतीनें आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

१ वर्ष–३% २ वर्षे–३¼% ३ वर्षे–३½%
४ वर्षे–३¾% ५ वर्षे–४%

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

वा. वा. घमंडे, C. A. I. I. B., मॅनेजर.
न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.

# लहान व मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांस भांडवल पुरवठा

## ब्रिटिश फिनॅन्स कॉर्पोरेशनची अनुकरणीय व्यवहार पद्धति

( चिंतामणि राजाराम सोनाळकर, बी. एस्‌सी., सी. ए. आय्. आय्. बी., युनायटेड कमर्शिअल बँक लि. )

वेगवेगळ्या उद्योगधंद्यांच्या कर्जविषयक प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करण्याची संधि मला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा एक अधिकारी व नंतर युनायटेड कमर्शिअल बँकेचा एक अधिकारी, ह्या नात्यानें मिळाली. भारतांत उद्योगधंद्यांना आपल्या बँका फारशी मदत देऊं शकत नाहींत; विशेषतः लहान उद्योगधंद्यांना फारच थोडें सहाय्य मिळतें, असा अनुभव आहे. बँकांनीं मोठाल्या उद्योगधंद्यांना कर्जे दिलीं, तरी तीं दीर्घ किंवा मध्यम मुदतीचीं बहुधा नसतातच. कच्चा माल आणि तयार माल ह्यांच्या तारणावर मोठ्या उद्योगधंद्यांना कर्जपुरवठा केला जातो, आणि क्वचित प्रसंगीं इमारती व यंत्रसामुग्री ह्यांचे तारणावरहि कर्ज दिलें जातें. परंतु लहान उद्योगधंद्यांची मात्र आबाळ होते. मोठ्या उद्योगधंद्यांची स्वतःची जमीन, इमारती, यंत्रसामुग्री, इत्यादि असूं शकतात; परंतु लहान उद्योगधंद्यांना भाड्याच्या जागींच आपला संसार चालवावा लागतो आणि त्यांना सहानुभूतीपूर्व मदतीची आवश्यकता असते. नेमकें तेवढेंच सहाय्य बँका देऊं शकत नाहींत! लहान उद्योगधंद्यांना मोठ्या बँकांनीं सहाय्य केल्याचीं उदाहरणें अपवादात्मकच ठरतील, आणि तीसुद्धां जुन्या विश्वासू खातेदाराला तयार व कच्च्या मालाच्या तारणावर अल्प मुदतीच्या बोलीनेंच!

लहान उद्योगधंद्यांना युद्धपूर्व काळांत वैयक्तिक प्रयत्न व सहाय्य ह्यांवरच विसंबून बसणें भाग पडे. सरकारची वृत्ति बेपर्वाईची होती आणि परदेशी चढाओढीपासूनकांहींहि संरक्षण नव्हतें. लहान उद्योगधंद्यांची जोपासना करण्याची जबाबदारी बँकांनीं पत्करली नाहीं, म्हणून त्यांना दोषी ठरवणें इष्ट होणार नाहीं. कारण एकतर, दिलेल्या कर्जावर देखरेख ठेवण्यासाठीं त्यांना अनुभविक असा अधिकारी व नोकरवर्ग लागतो आणि त्यावर सूक्ष्म नजर ठेवावी लागते. आणि दुसरें म्हणजे बँकिंगच्या क्षेत्रांत गुंतलेल्या पैशापेक्षां जास्त पैसा बाहेरच होता आणि शेतीच्या आणि कारखान्याच्या मालावर कर्ज देण्याचा साधा व किफायतशीर धंदा त्यांनीं केला तरी त्यांचे जवळील पैसा अपुरा पडावा, अशी परिस्थिति होती.

औद्योगिक कर्जपुरवठ्याचे कांहीं प्रयत्न करण्यांत आले, परंतु ते फारसे यशस्वी झाले नाहींत. औद्योगिक बँकिंगला सोइस्कर अशी त्या संस्थांच्या ठेवींची रचना नव्हती, हें त्याचें एक कारण होय. त्यांच्या डायरेक्टर बोर्डावरील बडे उद्योगपती लहान कारखानदारांकडे पुरेशा सहानुभूतीनें पहाण्याऐवजीं त्यांच्या योजनाच आत्मसात करतील अशी त्या कारखानदारांना भीति वाटत असावी, हें दुसरें कारण असावें. नव्या बँकिंग कायद्यानें तर हिंदी बँकांचा उद्योगधंद्यांना मदत करण्याचा जो कांहीं उत्साह होता तो पार मावळून टाकला आहे. महायुद्धानंतर, आतां देशाचा औद्योगिक आराखडा पार बदलत चालत आहे. जलद गतीनें औद्योगीकरण करण्याचा राष्ट्रानें संकल्प केला आहे. ज्या उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें परराष्ट्रीय हुंडाणावळीची बचत होणार आहे, अशांना सरकारी सहाय्य मिळण्याची खात्री लोकांना वाटत आहे. मध्यवर्ती इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना झालेली आहे आणि वेगवेगळ्या राज्यांतून स्टेट कॉर्पोरेशन्स स्थापन होऊं घातलीं आहेत. अशा पार्श्वभूमीवर मोठ्या उत्साहानें मी ग्रेट ब्रिटनमधील बँका व इंडस्ट्रिअल ॲन्ड कमर्शिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ह्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला. तो अभ्यास करतांना ज्यांच्याशीं माझा संबंध आला त्या सर्व अधिकाऱ्यांनीं मला अत्यंत तत्परतेनें व परिश्रमपूर्वक माहिती पुरवली व ती पुरवितांना जें सौजन्य दाखविलें त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें अत्यंत अगत्याचें आहे. अशा तऱ्हेचें सौजन्य, तत्परता वगैरे गुण हे ब्रिटिश बँकिंगच्या जगांतील व इतरही व्यवसायी जनांचा एक स्वभावच बनून गेला आहे व तो निःसंशय अनुकरणीय आहे.

युद्धोत्तर काळांत घडवून आणावयाच्या औद्योगिक पुनर्घटनेंत आपआपला वांटा उचलण्याच्या हेतूनें १९४५ सालीं बँक ऑफ इंग्लंड, लंडनच्या ११ प्रमुख बँका व ८ स्कॉटिश बँका यांनीं हें कार्पोरेशन प्रस्थापित केलें. या कॉर्पोरेशनचें शेअर भांडवल व खेळतें भांडवल असें सर्वच भांडवल या बँकांनीं पुरविलें आहे. आजपर्यंत या कॉर्पोरेशननें लहान व मध्यम ३०० कारखान्यांस भांडवल पुरविलें आहे. पूर्णतः व्यापारी दृष्टीनें, राष्ट्रहिताकडे नजर देऊन व सरकारच्या औद्योगिक धोरणाशीं सुसंगत राहून होतकरू नवीन उद्योगधंद्यांना दीर्घ मुदतीचा भांडवल-पुरवठा हें कॉर्पोरेशन करीत आहे. प्रारंभीं व्यापारासाठींहि ही संस्था भांडवल देत असे, पण आतां मात्र फक्त उद्योगधंद्यांनाच भांडवल देण्याचें धोरण तिनें अवलंबलें आहे. बँका ज्यांना भांडवल पुरवूं शकत नाहींत अगर शेअर विकून ज्यांचें भांडवल उभारलें जात नाहीं, अशांना हें कॉर्पोरेशन भांडवल पुरवीत असतें. एका कारखान्यास किमान भांडवली साह्य पांच हजार पौंड व कमाल २ लक्ष पौंडापर्यंत या कॉर्पोरेशनकडून पुरविलें जातें. परतफेडीची मुदत १५ ते २० वर्षें असते. हें भांडवली साह्य कारखान्याचे कर्जरोखे विकत घेऊन, तारणाशिवाय अथवा तारणासह कर्ज देऊन, प्रेफरन्स अगर ऑर्डिनरी शेअर विकत घेऊन, सदर संस्था करीत असते. मुळांतच कर्जाच्या अर्जांची छाननी फारच काळजीपूर्वक केली जाते. या छाननींतून अनेकांना नकार मिळतो. प्रारंभीं प्रारंभीं ७ पैकीं ६ व गतवर्षी ६३४ पैकीं ५१४ अर्ज नाकारले गेले. हे अर्ज सामान्यतः चार्टर्ड अकौंटंट अगर सॉलिसिटर यांच्यामार्फत कॉर्पोरेशनकडे येतात. अशा अकौंटंटसुद्धा मार्गदर्शनाकरतां कॉर्पोरेशननें एक सूचना पत्र तयार केलें आहे. त्यामुळें कॉर्पोरेशनला जास्ती कर्जासाठीं येणाऱ्या अर्जदाराच्या उद्योगधंद्यांची माहिती जास्तींत जास्त तपशीलवार मिळूं शकते. एकदां अर्जाची नीट छाननी केल्यावर कर्ज देण्याचें ठरलें, म्हणजे ज्याच्या कर्तृत्वावर धंद्याची मदार असते तो योजक तेथें कायम राहील याची कॉर्पोरेशन खात्री करून घेते. तसेंच या सर्व व्यवहाराचे वेळीं संबंधित धंद्यांच्या योजकांचीं पात्रता, त्यांचें चारित्र्य, त्यांची वागणूक, त्यांचें व्यक्तिमत्व, यांचा कसोशीनें विचार केला जातो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कर्जे देण्याबाबत कॉर्पोरेशनचें धोरण सढळ असून धंद्याची एकदां निवड झाली म्हणजे त्यांत कद्रूपणा दाखविला जात नाहीं. इतकी चिकित्सा करून अर्ज मंजूर केले, तरीहि कांहीं कर्जे बुडीत ठरण्याची शक्यता असतेच व त्यासाठीं कॉर्पोरेशननें आपल्या

नफ्यांतून खास शिल्लकहि ठेविली आहे. कॉर्पोरेशनच्या कर्जांचा व्याजाचा दर तारण घेतलेल्या कर्जांवर (डिबेंचर्स) ४॥ ते ५ टक्के व बिगरतारण कर्जावर ५॥ ते ६ टक्के असतो. कॉर्पोरेशन अर्जांची छाननी करण्यासाठी कोणतीहि फी आकारीत नाहीं. कर्ज मंजूर झालें, तर मात्र कर्जाच्या रकमेच्या दीड टक्का फी ती आकारते. अर्जाची छाननी व पहाणी वगैरे करणें यासाठी सर्व प्रकारच्या धंद्यांतील तज्ज्ञ, कॉस्ट अकौंटंट वगैरे कॉर्पोरेशनकडे असतात. यामुळें कोणीहि या कॉर्पोरेशनकडे मोकळेपणीं अर्ज करूं शकतो.

ज्याला कर्ज दिलें आहे अशा कारखान्यांना कांहीं अडीअडचणी आल्यास कॉर्पोरेशन आपले तज्ज्ञ त्यांचे मदतीस पाठविते. पण दैनंदिन कारभारांत मात्र कॉर्पोरेशन हात घालीत नाहीं किंवा आपला डायरेक्टरहि त्यांचे बोर्डावर नेमीत नाहीं. कॉर्पोरेशननें स्वतःचे वेगवेगळे तज्ञ इंजिनिअर, कॉस्ट अकौंटंट्स वगैरे नेमलेले आहेत. त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या धंद्यांच्या खास तपशीलवार शिक्षणासाठी ठिकठिकाणीं पाठवून आणण्यांत येतें. त्यामुळें, कोणत्याहि उद्योगधंद्याचा अर्ज आला, तरी त्याची छाननी करण्यासाठी तज्ञ नेहमींच हाताशीं असतो.

कॉर्पोरेशननें स्वतःचे वेगवेगळे तज्ञ इंजिनिअर, कॉस्ट अकौंटंट्स वगैरे नेमलेले आहेत. त्यांना वेगवेगळ्या ठिकाणीं पाठवून धंद्याचें खास तपशीलवार शिक्षण देण्यांत येतें. त्यामुळें, कोणत्याहि उद्योगधंद्याचा अर्ज आला, तरी त्याची छाननी करण्यासाठी तज्ञ नेहमींच हाताशीं असतो.

बाजारपेठेची पहाणी करून आर्थिक माहिती संकलन करणारें एक खातें कॉर्पोरेशननें संवर्धित केलें आहे. प्रत्येक नव्या अर्जदाराची छाननी हें खातें करतें. अर्जदारांचा लौकिक, त्यांची व्यावसायिक सचोटी, तांत्रिक ज्ञान, स्वभाव, संवयी, माणसाकडून कामें करवून घेण्याची हातोटी, इत्यादि सर्व गोष्टींवर भर दिला जातो. अर्जदार कंपनीची परवानगी घेऊन तिच्या बँकरकडेहि अर्जदाराविषयीं विचारणा केली जाते. त्याचप्रमाणें, ज्यांचेकडून अर्जदार माल खरेदी करतो व ज्यांना तो माल विकतो, त्यांचेकडूनहि त्याच्या व्यवहारपद्धतीविषयीं माहिती काढण्यांत येते. ज्यांनीं अर्जदार कंपनीची इमारत बांधली किंवा ज्यांनीं यंत्रसामुग्री पुरविली, अशांच्या मतांसहि मान दिला जातो. ज्या धंद्यास कर्ज हवें, त्याचा मागील इतिहास आणि त्याचें भवितव्य ह्यांचा अभ्यास केला जातो. त्याच प्रकारचे धंदे जगांत इतरत्र कसे काय चालू आहेत, हेंहि पाहिलें जातें. गेल्या सहा वर्षांत अशा रीतीनें कितीतरी महत्त्वाची माहिती कॉर्पोरेशनजवळ जमा झालेली आहे, ती नीट जुळवून ठेवण्यांत आली आहे. तिचा कॉर्पोरेशनला व तिच्या कर्जदारांना केव्हांहि उपयोग करून घेतां येतो.

कर्जदाराच्या तारणाबरोबरच त्याच्या व्यक्तित्त्वासहि तितकेंच महत्त्व दिलें जातें. कर्जाची मुदत संपेपर्यंत कंपनींतील एकादा विशिष्ट मनुष्य कामावर राहिला पाहिजे, अशी अट कित्येक वेळां कॉर्पोरेशन घालते. एकदां कर्ज मंजूर होऊन दिलें गेलें, म्हणजे कॉर्पोरेशनच्या दुसऱ्या एका स्वतंत्र खात्याकडे देखरेखीचें काम सोंपविण्यांत येतें. कर्जदाराच्या कारखान्यावर लक्ष ठेवण्यासाठी वेळोवेळ तज्ञांची योजना केली जाते व कारखान्यांनीं पाठविलेले नियतकालिक अहवाल तपासून माहून बोर्डाकडे मासिक रिपोर्ट केला जातो.

या कॉर्पोरेशननें ब्रिटनच्या औद्योगिक उन्नतीस महत्त्वाचें साह्य केलें आहे. आपल्याकडेहि मोठ्या धंद्यांना कर्जें देण्यासाठी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन स्थापन झालें आहे व लौकरच घटक राज्यांतहि लहान व मध्यम धंद्यांना भांडवली साह्य करण्यासाठी औद्योगिक पेढ्या राज्यनिहाय निघणार आहेत. आपल्याकडील परिस्थिति ध्यानीं घेऊन ब्रिटनमधील या इंडस्ट्रिअल अँड कमर्शिअल फायनान्स कॉर्पोरेशनच्या कार्यपद्धतींतील ज्या अनुकरणीय गोष्टी आहेत त्यांचाहि आपणांस फार उपयोग करून घेतां येईल.

कांहीं काळ यशस्वी रीतीनें चाललेल्या उद्योगधंद्यांना जादा आर्थिक मदत हीं कार्पोरेशन्स देतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. नवीन उद्योगधंद्यांना प्रारंभ करून देणें हें कांहीं त्यांचें कार्य नव्हे. विशेष राष्ट्रीय महत्त्व असलेल्या कांहीं अपवादात्मक उद्योगधंद्याच्या अस्तित्वाच्या सुरवातीच्या काळांत मात्र हें कार्पोरेशन मदत करूं शकतें. फिनान्स कार्पोरेशनमध्यें मिळणाऱ्या कर्जांकरतां कराव्या लागणाऱ्या अर्जांत या उद्योगधंद्यांना ज्या प्रकारची माहिती पुरवायची आणि ज्या मुद्यांचें स्पष्टीकरण करावयाचें त्यांची नामावली अनुक्रमें देणें विषयाला सोडून होणार नाहीं, असें वाटतें.

(१) आर्थिक सहाय्य कसें असावें याचें सविस्तर विवेचन.—

(अ) एकंदर रकमेची आवश्यकता.

(ब) ह्या आर्थिक सहाय्याचा कशा तऱ्हेनें उपयोग केला जाईल. उ. खालील विशिष्ट गोष्टींकरतां किती रक्कम लागेल ?

(i) नवीन इमारती किंवा त्यांचा वाढविलेला भाग.

(ii) नवीन यंत्रसामुग्रीचा व्याप.

(iii) जादा चालू भांडवल.

(क) अस्तित्वांत असलेल्या भागीदारांकडून पुरविल्या जाणाऱ्या नवीन आर्थिक सहाय्याचें एकंदरींत प्रमाण.

(२) व्यापारः—व्यापाराच्या स्वरूपाची व इतिहासाची ओझरती कल्पना व शिवाय मुख्य (उत्पादनाचे) पदार्थ, विक्रीचा कल, गिऱ्हाइकांचे प्रकार यांचें पुरेसें विस्तृत विवेचन आणि सध्यांच्या दर्जाची कल्पना येण्याकरतां चालू प्रगतीच्या मानाचें स्पष्ट चित्र देणें.

(३) व्यवस्थाः—व्यवस्थेच्या बाबतींत जीं माणसें जबाबदार समजलीं जातात त्यांची थोडक्यांत माहिती.

(४) जमाखर्चः—(अ) अगदीं अलीकडे तपासलेल्या जमाखर्चाची प्रत.

(ब) पुष्कळ वर्षांपूर्वीपासूनचा त्रोटक वृत्तांत —जमल्यास शेवटच्या दहा वर्षांतील प्रत्येक वर्षाचाः

(i) उलाढाल.

(ii) ठोक नफा.

(iii) कर देण्याआधीं झालेला निव्वळ नफा.

(क) ज्या ताळेबंदांत कराचा अंतर्भाव केला असेल असा अगदीं ताजा ताळेबंद व ज्या जमाखर्चाच्या काळाशीं त्याचा संबंध आहे तो विशिष्ट काळ दर्शविणारा असा आराखडा.

सर्वस्वी नवीन व नुकत्याच सुरू झालेल्या संस्थांकरितां आगाऊ अंदाजपत्रक व उत्पादन-खर्चाची टप्पा-टप्पावर छाननी, उलाढाल व फायदा ह्यांचा अंदाज.

(५) ओळखीः—अर्ज करणाऱ्याच्या बँकेचें नांव व पत्ता बँकेला संबोधलेल्या पत्रासहित असावा. त्यांत अर्जांत अंतर्भूत असलेल्या गोष्टींची कॉर्पोरेशनशीं चर्चा करण्याचा अधिकार बँकेला दिलेला असावा.

---

# लोकराज्याच्या यशासाठी औद्योगीकरण

( प्रो. दिनेश बलवंत केरूर, एम्. ए., डेप्युटी सेक्रेटरी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें )

कोणत्याहि समाजाची राज्यव्यवस्था ही त्या समाजाच्या प्रकृतिधर्माला अनुरूप असावी लागते किंवा एक विशिष्ट राज्यव्यवस्था आग्रहानें पत्करली असेल तर समाजाची त्या दिशेनें पूर्वतयारी करून घेणें आवश्यक ठरतें. नाहींतर राज्यव्यवस्था व समाज यांमध्यें विसंवाद निर्माण होऊन समाजाची अकल्पनीय हानी होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतानें एक विशेष राज्यव्यवस्था पत्करली आहे आणि त्या दृष्टीनें भारतीय समाजाची पूर्वतयारी आहे किंवा नाहीं, नसल्यास काय दिशेनें उपाययोजना केली पाहिजे व या उपाययोजनेंत द्रुत औद्योगीकरण हा कसा त्वरित फलदायी उपाय आहे याचा मर्यादित प्रपंच या लेखांत केला आहे. सामाजिक प्रश्नासंबंधीचें विवेचन निर्णायक असूं शकत नाहीं. तें तसें असूं शकत नाहीं तें दोन कारणांसाठी. एकः समाज हा असेर मनुष्यांचा बनलेला आहे. दुर्दैवानें किंवा सुदैवानें 'मानवी मना'च्या व्यापाराची निर्णायक उपपत्ति अद्यापि लागलेली नाहीं. तो प्रांत मानसशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ यांचा असून त्यांच्या दृष्टीनेंहि 'मन' हें अजून गूढ राहिलें आहे. तेव्हां या शास्त्रज्ञांनीं 'मना' संबंधीं जे कांहीं सिद्धांत—सापेक्ष व साक्षेप—शोधले आहेत त्यांच्या आधारावरच इतर समाजशास्त्र विषयांची इमारत उभारलेली असते हें पहिलें कारण. प्रत्यक्ष विवेचकाचा मर्यादित अभ्यास हें दुसरें कारण. कुणाचाहि अभ्यास संपूर्ण व सर्वंकस असा असूं शकत नाहीं. ह्या वस्तुस्थितीला प्रस्तुत लेखकहि अपवाद नाहीं. यामुळें या लेखांत मांडलेले विचारविचारवंतांच्या पुढें येऊन, त्यांची मीमांसा झाली तर त्याला निःसंशय आनंद वाटेल.

२६ जानेवारी १९५० ला भारत हें प्रजासत्ताक गणराज्य किंवा लोकराज्य राहणार आहे, असें आपण जाहिर केलें आहे. म्हणजे भारतीय राज्यव्यवस्था ही 'लोकशासक' राज्यव्यवस्था राहणार असून प्रत्येक भारतीय हा देशाचा व पर्यायानें स्वतःचा शासक ठरला आहे. 'राज्यशासन' किंवा राज्यव्यवहार हा एक गंभीर असा प्रयोग होय. त्यांतून लोकशासक राज्यव्यवहार हा त्याहूनहि गंभीर होय.

लोकराज्यांत, प्रत्येक नागरिक हा राज्यव्यवहार चालविण्यास पात्र आहे असें गृहीत धरलें जातें. वर उल्लेखिल्याप्रमाणें, लोकराज्याचा नागरिक हा केवळ स्वतःचाच नव्हे तर प्रसंगीं इतरांचाहि शासक असतो. या दृष्टीनें ही पात्रता फार महत्त्वाची बाब ठरते. राज्यशास्त्राची भाषा वापरायची, तर असें म्हणतां येईल कीं, लोकराज्याच्या नागरिकाजवळ स्वतःचें जीवन जाणून, इतरांचें जीवनहि जाणण्याची क्षमता वा कुवत असावी लागते. प्रत्यक्ष वा संभाव्य राज्यशासक म्हणून कित्येक सामान्य किंवा असामान्य गोष्टींबाबत लोकराज्याच्या नागरिकाला निर्णय घ्यावे लागतात. मतदान करतांना उमेदवार, त्याचा पक्ष, त्या पक्षाचा जाहीरनामा, इत्यादींचा अभ्यास त्याला करणें प्राप्त असतें. या निर्णयाचा व मतप्रदर्शनाचा परिणाम, चांगला किंवा वाईट, जितका त्याच्या स्वतःच्या जीवनावर तितकाच अन्य नागरिकांच्या जीवनावर होणें साहजिक असतें. नवप्राप्त भारतीय स्वातंत्र्याचा परिपाक सध्या लोकराज्याच्या अवतारांत व्हावयाचा असेल तर प्रत्येक भारतीय हा जागरूक जाणीवेचा, सुशिक्षित, कार्यप्रवण असा नागरिक कसा होईल या दिशेनें आपलीं सर्व पाउलें पडलीं पाहिजेत.

जागरूक, साधक—बाधक व बरेंवाईट यांचा सारासार विचार करून प्रत्येक घटनेची कारणमीमांसा शोधूं पाहणारी तर्कनिष्ठ बुद्धिवादी वृत्ति ही कांहीं एका विशेष वातावरणांतच रुजते, मूळ धरते, आणि वाढीस लागते. शिक्षणाचा व साक्षरतेचा सार्वत्रिक प्रसार होऊन इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादि समाजशास्त्र विषयांचा अभ्यास सरसहा सुरू झाल्यानें जागृत अशा लोकशासक नागरिकांची निर्मिति सुकर व सुलभ होईल. परंतु केवळ शिक्षणप्रसारानें सर्व कार्यभाग साध्य होणार नाहीं. शिक्षणानें फार तर विचारपद्धतींचें ज्ञान होतें. एखाद्या विषयाचा यथासांग अभ्यास कसा करावा ही गोष्ट शिक्षणानें साधेल, हें खरें. मात्र सुशिक्षित नागरिक हा जागृत व कार्यप्रवण राहील कीं नाहीं हें संशयास्पद व अनिश्चित राहतें. ग्रामोद्धार, ग्रामसुधारणा, दलितोद्धार, इत्यादि गोष्टींचा सांगोपांग अभ्यास करून त्यांत प्राविण्य व तज्ञता मिळविणारी मंडळी अनेक आढळतात. पण प्रत्यक्ष कार्याचा प्रसंग उभा राहिला कीं या मंडळींचें ज्ञान बहुधा त्यांच्या ग्रंथांतच राहतें हा अनुभव कांहीं नवा नाहीं. केवळ शिक्षण व ज्ञान—संपादन म्हणजे कार्यसिद्धि नव्हे, हें स्पष्ट आहे.

तेव्हां नागरिक हा कार्यप्रवण असा हवा असेल तर त्याच्या मनाचा विकास, बुद्धिवादि—क्रियाशील वृत्तीला पोषक अशा वातावरणांतच होणें अगत्याचें आहे. म्हणजे, या वातावरणाची निर्मिति हेंच लोकराज्याच्या सिद्धीचें व यशाचें रहस्य म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आतां हें वातावरण किंवा ही परिस्थिति म्हणजे काय याचा थोडा स्पष्ट विचार केला पाहिजे. बुद्धिवादि—क्रियाशील प्रवृत्तीला पोषक परिस्थिति याचा अर्थ उघड आहे व तो हा कीं, ज्या परिस्थितींत बुद्धीचा उपयोग करावा लागतो, ज्या परिस्थितींमध्यें स्वतःच्या क्रियेला व श्रमाला अधिक प्राधान्य असतें, ती परिस्थिति किंवा याचाच अर्थ पुढील पद्धतीनें लावणेंहि शक्य आहे.

सामान्य जनांच्या बाबतींत—असामान्य व्यक्तींचा विचार या लेखांत प्रस्तुत नाहीं—त्यांचे विचार, त्यांच्या भावना, इत्यादि सर्वांची गुंफण त्यांच्या व्यवसायाभोंवतीं झालेली आढळते. दैनंदिन जीवनासाठी करावा लागत असलेला व्यवसाय व जीवनाकडे बघण्याची दृष्टि या दोहोंचा, सामान्य जनांच्या बाबतींत निकट संबंध असतो. त्यांच्या विचारांत, भावनेंत व वृत्तींत त्यांच्या व्यवसायाचें नकळत प्रतिबिंब पडलेलें असतें. कारकुनी वृत्ति, शाळामास्तरी वृत्ति, बाजारी वृत्ति, रंगेल वृत्ति, इत्यादींची उपपत्ति वरील सत्यांत आढळते. म्हणजे सामान्यजनांचे विचार बुद्धिवादी आणि वृत्ति क्रियाशील अशी हवी असल्यास त्यांना पत्करावा लागणारा जीवनव्यवसाय अशा वृत्तीला पोषक असाच असणें इष्ट आहे.

हा सिद्धांत एकदा मान्य केला—व तो मान्य करणें अपरिहार्य आहे—तर आपल्या पुढील समस्येचें उत्तर सोपें आहे. भारतीय प्रजासत्ताक राज्यांतील सामान्य जनांचा जीवनव्यवसाय हा त्यांचे बुद्धिवादी विचार व क्रियाशील वृत्ति जागृत ठेवील असा असला पाहिजे, हें तें उत्तर होय. या पद्धतीचा जीवनव्यवसाय राहिल्यानें

सामान्य जनांची जीवनाकडे बघण्याची दृष्टि तर्कनिष्ठ व बुद्धिवादी बनेल व ते खरे लोकशासक होण्यास पात्र ठरतील. तेव्हां अशा जीवनव्यवसायाचा शोध हाच लोकराज्य सार्थ करण्याचा अचुक मार्ग होय.

गेलीं कित्येक वर्षें, किंबहुना शतकें, 'शेती' हा भारतीयांचा प्रमुख व्यवसाय आहे. बहुजन समाजाच्या बाबतींत शेती ही केवळ एक जीवनसाधन म्हणून पत्करलेली नसून, त्यांचें संपूर्ण जीवनच कृषिमय झालेलें आहे. त्यांच्यां दृष्टीनें शेती हेंच जीवन व शेती हेंच जीवनसाधन. साध्य व साधन हीं दोन्ही या ठिकाणीं एकरूप आहेत ही वस्तुस्थिति आहे. त्यामुळें सहजच, भारतीय सामान्य जनांची वृत्ति, विचारकार्यपद्धति, हीं कृषिसंस्कृतीची प्रदर्शक झालीं आहेत. दुर्दैवानें कृषिजीवन व कृषिसंस्कृति वर विस्तारानें चर्चिलेल्या बुद्धिवादि-क्रियाशील वृत्तीला फारशी पोषक व अनुकूल नसते, असा कित्येक देशांच्या इतिहासांचा दाखला आहे.

संपत्तीची निर्मिति ही नेहमींच मानव व निसर्ग यांच्या सहकार्यानें होते व म्हणून कृषिसंपत्तीच्या निर्मितींतहि मानव व निसर्ग यांचें सहकार्य असतें, हें उघड आहे. परंतु प्रमाणतः निसर्गाचा वांटा शेतीमध्यें फार मोठा असतो. जमीन, पाऊस-पाणी, हवामान व सूर्यप्रकाश, इत्यादींनाच शेतींत प्राधान्य राहतें, व या बाबींवर मानवाचें नियंत्रण नसतेंच असें म्हटलें तरी चालेल. मशागत, पेरणी व राखणी येवढ्यापुरतेंच मानवी श्रमाचें क्षेत्र मर्यादित असतें. म्हणजे शेतीच्या व्यवसायांत स्वतःच्यां आधीन नसलेल्या अशा अनेक बाबींच्या लहरींवर मनुष्याला अवलंबून रहावें लागतें. त्यामुळें शेतींतून निर्माण होणारी संपत्ति प्रधानतः निसर्गाधीन राहते.

या पराधीनतेमुळें, शेतीच्या व्यवसायावर जगणारे, शेतीलाच जीवन वाहणारे लोक, हे परिणामतः दैववादी बनतात. स्वतः अविश्रांत खपूनहि फल मात्र स्वतःच्या आधीन नसल्यानें या मंडळींनीं निराशावादी वृत्तीचा आश्रय केला तर आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अशा परिस्थितींत या समाजाची मनोवृत्ति बुद्धिवादी, तर्कनिष्ठ राहूंच शकत नाहीं आणि दैववादी व क्वचित् निराशावादी बनलेले सामान्य जन यथार्थत्वानें 'लोकशासक' कधीं झाले तर तो एक 'चमत्कार' म्हणावा लागेल.

अशा समाजांत 'लोकराज्य' रुजत नाहीं व वाढत नाहीं. या समाजाची राज्यव्यवस्था या ना त्या स्वरूपांत संरजामशाही पद्धतीची राहते. जमीनदार, इनामदार, वतनदार व सरदार मंडळींची प्रतिष्ठा या समाजांत वाढते. ही मंडळी स्वतः जमीन कसत नाहींत; उलट शेत-जमिनीपासून म्हणजे व्यवसायक्षेत्रापासून दूर राहून नगरांतील व शहरांतील विलासी जीवनाला आसक्त झाल्यानें शेतीच्या संवर्धनाकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. या तऱ्हेनें समाजाचा प्रधान व्यवसाय जो शेती, त्याच्या मुळावरच घाव बसतो आणि आधींच दैवाधीन व पराधीन असलेल्या या व्यवसायाची दुरावस्था होते. या दुरावस्थेच्या चक्रांत वतनदार मंडळी व सर्व जनसमाज सांपडून त्या समाजाची सुव्यवस्था व सुसंस्कृतता मृत्युपंथास लागते.

भारतीय समाजजीवनाचा गेल्या २००-२५० वर्षांचा इतिहास ज्यांनीं अभ्यासला आहे, त्यांना याहून कांहीं निराळें तात्पर्य आढळेल असें वाटत नाहीं. मग जिथें सामान्य जनच मृत्युपंथाला लागलेले तिथें 'लोकराज्या' चा विचार तो काय शिल्लक राहाणार ?

शेतीप्रधान समाजांत अन्य व्यवसाय नसतात, असें नाहीं.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि०

हेड ऑफिस : लक्ष्मी रोड, पुणें २.

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पदमजी श्री. मा. बी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर श्री. भा. म. गुप्ते

बँकेच्या शाखा

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली व अमरावती.

ही दिवाळी आमचे भागीदारांना व खातेदारांना सुखसमृद्धीची जावो !


ग. ल. हळवे,
ॲक्टिंग मॅनेजर.

(पॅरॅमाऊंट लि.)

मुंईमुगाच्या

# शेंगाचा सीझन सुरू झाला!

आपणांस लागणाऱ्या पॉवरवर अगर हातानें चालणाऱ्या लहानमोठ्या शेंगा फोडण्याच्या यंत्रांची ऑर्डर आजच नोंदवा-



भिडे ॲण्ड सन्स,
शिवाजीनगर,
सांगली

[ पिठाच्या चक्क्या व शेती उपयोगी यंत्रांचे प्रमुख कारखानदार. ]

व्यापार–उद्योगधंदे यांची वाढ कांहीं प्रमाणांत झालेली या समाजांत आढळते. परंतु या समाजव्यवहारावर कृषिसंस्कृतीचा ठसा सर्वत्र उमटलेला असतो. या समाजांत जमीनदार, व इनामदार हा वर्ग साहजिकच प्रामुख्यानें धनिक, त्यामुळें हीच मंडळी व्यापार-उदीम क्षेत्रांत प्रवेश करतात. व्यवसाय चटकन बदलता आला तरी मूळचा पिंड कायम राहिल्यानें, हे वतनदार कारखानदारीकडेहि जमीनदारी–इनामदारी वृत्तीनेंच पाहातात. या वर्गांतून आलेल्या कंपन्यांचे संचालकांची वृत्तीहि त्याच पद्धतीची रहाते. कंपनीचा प्रत्यक्ष कारखाना व उत्पादनक्षेत्र यांनीं क्वचितच पाहिलेलें असतें. परिणामतः अशा कंपन्यांचीहि दुरवस्था होते. आपल्या इकडील लिमिटेड कंपन्यांच्या अभ्यासकांना हीहि वस्तुस्थिति अपरिचित नाहीं.

या सर्व दुरावस्थेतून एक त्वरित फलदायी मार्ग आहे, तो द्रुत औद्योगीकरणाचा होय. उद्योगधंद्यांची वाढ शेतीनें श्रीमंत झालेल्या इनामदार, वतनदार मंडळींच्या लहरीवर अवलंबून ठेवण्यापेक्षां राज्यशासन संस्थेनें नियोजनपूर्वक देशाचें औद्योगीकरण घडवून आणणें हाच तो मार्ग होय.

उद्योगधंदे व कारखानदारी यांचा व्यवहार आणि शेतीचा व्यवहार हे मूलतः भिन्न आहेत. शेतीच्या उलट उद्योगधंद्यामध्यें मानवी श्रम व निसर्ग यांच्या संयुक्त प्रयत्नाला मानवनिर्मित यंत्रशक्तीची जोड असते. कच्च्या मालावर, यंत्रशक्ति व श्रमशक्ति यांच्या सहाय्यानें विविध प्रक्रिया करून उपभोग्य (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष) पक्का माल निर्माण करणें म्हणजे उद्योगधंद्याचें सार म्हणतां येईल. स्वतःच्या हातानें, डोळ्यांदेखत, वस्तू निर्माण होत असलेली कामगार बघूं शकतो. उद्योगधंद्यामध्यें निर्मात्याची भूमिका प्रामुख्यानें मानवी श्रमाकडे राहते हें उघड आहे. त्यांत कामगाराला प्रत्यक्ष निर्मितीचा आनंद मिळतो येवढेंच नव्हे तर त्यांच्यामध्यें स्वतःबद्दल एक आत्मविश्वास निर्माण होतो.

एकादे वेळीं निर्माण केलेली वस्तु योग्य त्या प्रमाणाची व दर्जाची न झाल्यास त्याची चिकित्सा होऊं शकते. हलक्या प्रतीचा कच्चा माल, सदोष यांत्रिक प्रक्रिया, इत्यादींपैकीं एक वा अनेक कारणें वरील गोष्टींच्या मुळाशीं असल्याचा शोध लागतो. तसेंच कारखान्यांत एखादा अपघात झाला तर, कदाचित् विजेंत, कदाचित् यंत्रांत बिघाड झाला असेल वा तीं तीं खातीं संभाळणाऱ्या यंत्रज्ञांच्या गाफीलपणामुळें तो झाला असेल याची मीमांसा लागते. त्यामुळें घडलेल्या गोष्टी या दैवाधीन व निसर्गाधीन होत्या असें मानण्याची प्रवृत्ति कमी होऊन मूळ कारणें शोधून तीं सुधारण्याचा प्रयत्न सुरू होतो.

शिवाय, कारखान्यांतील सर्व व्यवहार विशेष शिस्तीनें व सहकार्यानें करावे लागतात. उदाहरण म्हणून बिस्किटांच्या कारखान्याचा विचार करतां येईल. त्या कारखान्यांत गहूं दळणें, आटा तयार करणें, साखर व अन्य द्रव्यें मिसळणें, मिश्रण लाटून विशिष्ट आकाराचीं बिस्किटें बनवून भाजणें, तयार बिस्किटांचे पुडे तयार करणें, इत्यादि क्रिया लागोपाठ यथाक्रम, ठरावीक वेळेस व ठरावीक पद्धतीनेंच पार पाडाव्या लागत असल्यानें, या वेगवेगळ्या क्रिया करणाऱ्या कामगारांना काळजीपूर्वक एकमेकाशीं सहकार्य करणें आवश्यक असतें.

त्याचप्रमाणें कारखान्याची व्यवस्था पाहणाऱ्या प्रमुखालाहि अत्यंत दक्षतेनें व्यवहार करावा लागतो. कारखान्याचें उत्पादन सामान्यतः बाजारपेठेसाठीं असल्यानें, संभाव्य ग्राहकांची आवडनिवड, बाजारांतील स्पर्धा, यांचा बारकाईनें अभ्यास करून स्वतःच्या मालाची प्रत सुधारून त्याची आकर्षकता वाढविण्यासाठी सतत प्रयत्न करावा लागतो. बाजारांतील तेजी–मंदीचा कानोसा घेऊन तत्परतेनें जोड–उत्पादनाची व्यवस्थाहि त्यांना ठेवावी लागते.

या पद्धतीनें नित्य काम करीत राहिल्यानें उद्योगधंद्यांत व कारखानदारीच्या व्यवसायांत व्यग्र झालेल्या मंडळींची—व्यवस्थापक, तंत्रज्ञ, कामगार व विक्रेते—मनोवृत्ति चिकित्सक, जागरूक, तर्कनिष्ठ व बुद्धिवादी न बनली तरच नवल. शेतीव्यवसायांतील शेतकरी–कामकऱ्यापेक्षां कारखान्यांत कायमचा गुंतलेला कामगार हा अधिक संघटनशील, जागरूक, स्वतःच्या हक्कांना जपणारा, वेळ आल्यास लढा देणारा, असा असतो; याचें रहस्य या वरील मनोवृत्तींत आहे.

शेती व्यावसायिकांमध्यें या बुद्धिवादी वृत्तीची वाढ व्हावी असें वाटत असेल तर शेतीव्यवसायहि एक " कारखानदारी " म्हणूनच चालविला पाहिजे. शेतीला मनुष्यनिर्मित यंत्रशक्तीची जोड द्यावयाला हवी. धरणें, पाटबंधारे बांधून पावसाच्या लहरीस्वभावाचा धोका कमी केला पाहिजे, येवढेंच नव्हे तर अरण्यांचें संवर्धन करून पावसाची नियमितता व निश्चितता वाढविली पाहिजे. अरण्यसंवर्धनामुळें जमिनीची धूपहि साहाजिकच कमी होईल. पण त्याच बरोबर सेंद्रीय खतांच्या जोडीला रासायनिक खतांचा वापर करून जमिनीच्या धारणेंत व सुपीकतेमध्यें भर टाकावयास हवी. म्हणजे, मानवी श्रम व निसर्ग यांत मानवी श्रमाचा भाग कटाक्षानें वाढवून शेती व्यवसायाची पराधीनता जेवढी म्हणून कमी करतां येणें शक्य आहे तेवढी कमी करण्याचा अविश्रांत प्रयत्न केला पाहिजे. तरच शेती ही परंपरागत शेती न राहतां तीहि एक कारखानदारी होईल, व शेतावरील शेतकरी–कामकरीहि औद्योगिक कामगाराप्रमाणें संघटनशील, सुबुद्ध, विचारी व तर्कनिष्ठ होईल.

एकंदर सामान्य जनांचा व्यवसाय या पद्धतीचा ( कारखानदारीचा ) राहिल्यानें त्यांची मनोवृत्ति बुद्धिवादी, क्रियाशील व जागरूक राहील आणि लोकराज्यांतील नागरिकत्व पेलण्यास ते समर्थ ठरतील.

भारत स्वतंत्र होऊन चार वर्षें झालीं. परंतु या स्वातंत्र्याचा सामान्य जनाला काय लाभ झाला ? या मुक्ततेनें त्यांच्या दैनंदिन जीवनांत काय नवीनता आली ? त्यांच्या आयुष्यक्रमांत काय शाश्वत सौख्यें निर्माण झालीं ? या प्रश्नांचीं उत्तरें आपण शोधूं लागलों तर स्वातंत्र्याची काव्यमय अपूर्वता नष्ट होऊं लागते.

स्वातंत्र्यासाठीं राजकीय लढा दिला. त्यावेळीं राजकीय नेत्यांनीं व समाज नेत्यांनीं स्वातंत्र्योत्तर जीवनासंबंधीं सामान्य जनतेच्या अपेक्षा फार उंचावून ठेवल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष अनुभव वेगळा येत असल्यानें सामान्य जनतेच्या जीवनांत नैराश्य व क्वचित् विफलता फार झपाट्यानें येत आहे.

या अगतिकतेमुळें आधींच पारलौकिक विचारानें नित्य भारावलेला आपला समाज अधिकच दैववादी होत असून समाजजीवनांतील अस्थिरता प्रत्यहीं वाढत आहे. या एकंदर परिस्थितीचा समाजांतील सर्व थरांतील विचारवंतांनीं गंभीरपणें विचार केला पाहिजे.

या भयानक परिस्थितींतून हा 'सनातन' समाज तरून जाऊन त्याची राज्यव्यवस्था 'लोकशासक' पद्धतीची होणें इष्ट असेल तर तात्काल व परिणामकारी उपाययोजना अमलांत आणणें अगत्याचें आहे व या उपाययोजनेंतील अत्यंत सत्वर फलदायी उपाय हा शीघ्र औद्योगीकरणाशिवाय दुसरा नाहीं.

# आकडे नेहमीच खरा निष्कर्ष काढतील, असें नाहीं.

## सावधगिरीची आवश्यकता

प्रत्येक बरोबर–चूक मताच्या पुष्ट्यर्थ आकडेशास्त्राचा आधार घेतलेला आढळतो. परंतु त्याबद्दल आकडेशास्त्रज्ञाला दोष देणें चुकीचें होईल. तो आकडे गोळा करतो आणि त्यापासून निष्कर्ष काढतो; इतरांनीं जाणूनबुजून त्याचा दुरुपयोग केला तर तो बिचारा काय करणार ? आकडेशास्त्राच्या दुरुपयोगानें फसगत होऊं नये, इतपत तरी प्रत्येक नागरिकानें ज्ञान करून घेतलें पाहिजे.

आकड्यांचे सर्व संबंध, हे कारण व त्याचा परिणाम अशा स्वरूपाचे असतात, ह्या समजुतीमुळें फार घोटाळे उडतात. दोन गोष्टींमध्यें संबंध आढळतो असें आकडेशास्त्रज्ञानें सांगितलें, तर त्याचा अर्थ त्या दोन गोष्टी एकत्र आढळण्याची प्रवृत्ति असते, एवढाच मर्यादित घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, मुलांचें वय व त्यांची उंची ह्यांचेमध्यें नातें असतें. १०० मुलें त्यांच्या वयाच्या प्रमाणांत रांगेनें उभीं केलीं, आणि तीं पुनः उंचीच्या प्रमाणांत उभीं केलीं, तर दोन्ही रांगांत फारसा फरक आढळणार नाहीं. अशा प्रकारें दोन्ही गोष्टींत संबंध असला म्हणजे एकांतील फरकामुळें दुसऱ्यांतहि बहुतेक प्रसंगीं तात्काळ फरक घडून येतो. परंतु प्रत्येक वेळीं तसें घडेलच असें नाहीं. शाळेंतील मुलांच्या पायाचा आकार आणि मुलांच्या लेखनाचा वेग ह्यांचेमध्यें संबंध निश्चित असतो; परंतु पायाच्या मोठ्या आकारामुळें लेखनाचा वेग वाढतो, असें नाहीं. मोठ्या आकाराच्या पायाबरोबर मोठें वय हें आलेंच आणि मोठीं मुलें ज्यास्त वेगानें लिहूं शकतात. अशा तऱ्हेची चूक पुष्कळ वेळां होते. मुलांची हुशारी व त्यांच्या जन्माच्या वेळचें त्यांच्या बापांचें वय ह्यांचा संबंध निकटचा असतो, असें कांहीं वेळा सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. समाजांतील व्यावसायिक वर्ग हा सर्वांत बुद्धिमान असतो आणि त्या वर्गांतील लोकच उशीरा विवाह करतात. त्यामुळें मध्यम वयाच्या ह्या लोकांचीं मुलें त्यापेक्षां तरूण बापांच्या मुलांपेक्षां अधिक बुद्धिमान आढळतात. विवाहाचें वय लांबलें कीं पुत्रप्राप्तीचे वेळीं बापाचें वय ज्यास्त होतें. तेव्हां मध्यम वयाचे बाप हे बहुंशीं व्यावसायिकांच्या वर्गांतील असतात. ह्या वस्तुस्थितीची, मध्यम वयाच्या बापांचीं मुलें अधिक हुशार निपजणें ही केवळ आनुषंगिक बाब आहे.

कॅन्सरला बळी पडणारांची संख्या वाढत आहे, असे आकडेशास्त्रज्ञ सांगतात. त्यामुळें, आपल्याला कॅन्सर होण्याचा संभव वाढला आहे असें पुष्कळ लोक मानतात. परंतु ही उपपत्ति बरोबर नाहीं. मृत्यूचीं इतर कारणें कमी होत चाललीं असून, जे तरूणपणीं टॉयफाईड, देवी, इत्यादींनीं मृत्यू पावावयाचे, ते कॅन्सर होईपर्यंत जगतात, एवढेंच खरें आहे !

डब्लिन येथील एका इस्पितळांत वरच्या मजल्यावरील वार्डांपेक्षा खालल्या मजल्यावरील वार्डांत मृत्यूंचें प्रमाण अधिक आढळलें. ह्या गोष्टींची इस्पितळाच्या अहवालांतहि नोंद झाली आणि मुद्दाम तपासणी करण्यांत आली. नवीन पेशंट आले, म्हणजे जे जिना चढून जाऊं शकतील त्यांना वरच्या वार्डांत ठेवावयाचे व जे चालू शकत नसतील त्यांची खालींच सोय करावयाची अशी इस्पितळाची पद्धत होती. त्याचें प्रतिबिंब मृत्यूंच्या कमी–अधिक प्रमाणांत पडलें, तर आश्चर्य कोणतें !

शेकडेवारीचे आकडे देऊन चुकीचे निष्कर्ष काढण्याची हातचलाखी मोठ्या प्रमाणावर आढळते. एकादी संख्या दीडशेची दोनशे झाली असें न म्हणतां ती अमूक % नें वाढली असें सांगणें अधिक शास्त्रशुद्ध मानलें जातें. अर्थात्, कांहीं वेळां % नें फरक समजावून सांगणें खरोखरच सोपें व सोइस्कर असतें. परंतु, मूळ आकडे न सांगता फक्त % चाच उपयोग केला जातो, तेव्हां त्यांत कांहींतरी शंकास्पद असण्याचा संभव असतो. एस. एस. सी. बोर्डाच्या परीक्षेंत ५०% विद्यार्थी उत्तीर्ण झाले, परंतु आमच्या शाळेचा निकाल ७५% लागला असें अभिमानानें सांगितलें, तर एकूण फक्त चारापैकीं तीन मुलें पास झालीं एवढेंच सत्य त्यांत असूं शकतें. किंवा, पासांची संख्या गतवर्षींपेक्षा १००% वाढली असें म्हटलें, तर दोन ऐवजी चार मुलें पास झालीं, एवढाच त्यांत सत्यांश असण्याचा संभव असतो. आरोग्य खात्यावरील खर्च ४००% वाढला असें सरकारी मंत्र्यानें सांगितलें, तरी इतर खात्यांचा खर्च ६००% वाढलेला असूं शकतो व अखेर आरोग्य-खात्याची आबाळच झालेली अगदी शक्य असते. म्हणजे, एकाच बाबीवरील खर्चांतील प्रचंड वाढ सांगितल्यानें दिशाभूल होण्याचा संभव असतो.

एकाद्या आकड्याचें महत्त्व कमी करावयाचें असलें, म्हणजे, दुसऱ्या एकाद्या मोठ्या आकड्याशीं % च्या स्वरूपांत त्याची तुलना करावी, आणि महत्त्व फुगवून दाखविणें असेल तर एकाद्या लहान आकड्याशीं % च्या स्वरूपांत तुलना करावी, अशी चलाखी करतां येते. समजा, मुंबई राज्यांत ५,००,००० लोकांना मानसिक व्यथा जडलेली आहे. त्यांची जननक्षमता नष्ट करण्याची योजना आंखली तर ५० वर्षांत त्यांची लोकसंख्या निम्म्यावर येईल. ज्याला अशी योजना प्रतिपादन करावयाची असेल, तो म्हणेलः–" आपल्या राज्यांत ५,००,००० लोकांना मानसिक व्यथा आहे. जननक्षमता नष्ट करण्याच्या धोरणामुळें त्यांची संख्या ५० वर्षांत निम्मी होईल. " विरोधक म्हणेलः– "एकूण लोकसंख्येच्या १% पेक्षांहि कमी लोकांना ही व्यथा आहे. ५० वर्षांच्या प्रयत्नानें ती फारतर ½% होईल. एवढ्या परिश्रमाच्या मानानें हें फळ कांहींच नाहीं. " दोन्ही पक्षाचें म्हणणें ज्या मूळ आकड्यांवर आधारलेले आहेत, ते खरे आहेत. पण त्यांपासून अशीं अगदीं वेगळीं चित्रें रंगविण्यांत येऊं शकतात !

शुभचिंतन

आमच्या अनेक ग्राहकांना व हितचिंतकांना नवीन वर्ष सुखकर जावो.

महाराष्ट्र सोप फॅक्टरी

प्रो. कांतिलाल मणीलाल कं. बेळगांव.

# कोयना उत्पायन (Lift Irrigation) योजना कां बारगळली ?*

लेखक—नरसिंह

( एक ख्यातनाम इरिगेशन इंजिनिअर. दाक्षिण हिंदुस्थानांतील व मुख्यतः मुंबई प्रांत व महाराष्ट्र येथील क्षेपायनिक ( Irrigational ) प्रकल्प ( Projects ) आकल्प ( Designs ) संव्यवस्थापन ( Administration ) व आर्थिक्य ( Economics ) यांचे सूक्ष्म व साक्षेपी ( Keen ) अभ्यासू. )

एखाद्या प्रकल्पावर (Project) प्रत्यक्ष फायद्याबरोबरच अप्रत्यक्ष फायदेही असतात. त्याचप्रमाणें एखाद्या प्रकल्पाच्या मंजुरीला वा तो असंमत होण्याला प्रत्यक्ष कारणापेक्षांही अप्रत्यक्ष कारणेंच पुष्कळदां जास्ती कारणीभूत असतात. महाराष्ट्रानें हीं अप्रत्यक्ष कारणें अभ्यासून त्यावरून योग्य तो बोध घेणें इष्ट आहे.

## ( १ ) प्रास्ताविक

१९४९ सालीं हिंदुस्थान सरकारांतील मंत्री, नामदार काकासाहेब गाडगीळ, यांनीं प्रकट निवेदन केलें कीं कोयना धरणाचें जलवैद्युतिक ( Hydro Electric ) स्थापत्य ( works ) १९५१ सालाच्या आधीं तयार तर होईलच, पण उत्पायनिक ( Lift Irrigation ) भागही तयार होऊन, महाराष्ट्रांत घरोघरीं वीज व फारच मोठ्या क्षेत्राला पिकांना पाण्याचा पुरवठा होऊन सर्वत्र आबादी–आबाद होईल. पैकीं १९४९ सालीं केलेल्या घोषणेपासून दोन वर्षांच्या अवधींत वीज व कनाल निर्माण होणें अशक्य हें तर उघडच होतें व त्या घोषणा करतांना सचिवालयाकडून माहिती तरी चुकीची दिली गेलेली असावी किंवा भाषण ऐकणारे श्रोते व लघुलेखक यांच्या गैरसमजुतीमुळें योजनेचा आराखडा वा मंजुरी ऐवजीं " स्थापत्यच ( works ) " तयार होईल अशी बातमी छापली गेली असावी.

कांहीं असलें तरी एक गोष्ट खास कीं वरील हिंदुस्थान सरकारमधील मंत्रीं यांची कोयना–योजना अमलांत येण्याबद्दल तीव्र इच्छा होती व त्यांनीं त्याबाबत आपणाकडून पराकाष्ठा केली असणार. महाराष्ट्राचा सदा पाठीराखा दिल्लींत उच्चपदावर त्या खात्याचा मंत्री असतांना ही उत्पायन ( Lift ) योजना कां बारगळली* व योजनेचा अंदाजी खर्च ९० कोटी वरून ६५ व ६५ वरून ३० कोटीवर आणण्याचें कां ठरत आहे याबाबत पुष्कळांना गूढ पडलें असेल. तें उकलण्याचा या लेखाचा उद्देश आहे.

अशी अस्पृहणीय ( unenviable ) परिस्थिती होण्याला कारणें काय काय झाली याची छाननी केल्यास पूर्वानुभवावर आधारलेल्या खालील संस्कृत श्लोकांची व इंग्रजी–मराठी बोधवाक्यांची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

१ अतितृष्णा न कर्तव्या.

2 You can fool some for all time and all for some time but you cannot fool all for all times.

३ गर्जेल तो पडेल काय व बोलेल तो करील काय ?

४ जनो विद्वानेकः सकलमभिसंधाय कपटैः ।
तटस्थः स्वानर्थान् घटयतिच मौनं च भजते ॥
( मालती माधव )

## (२) उताराच्या ( Flow ) क्षेत्रपायनिक ( Irrigational ) प्रकल्पांवर ( Projects ) आजवर तोटा कां आला ? :–

हा लेख कांहीं इतिहासाचा भाग नाहीं किंवा सरकारी कागदपत्र अधिकृत वा अनधिकृत रीत्या मिळवून त्यावर आधारलेला नाहीं. नुकत्याच झालेल्या राज्यव्यवस्थेच्या घडामोडींतील फरकांमुळें म्हणा किंवा इतर कांहीं कारणानें म्हणा सध्यां सरकारी नोकरांवरील खरडेघाशीचा बोजा भयंकर वाढला आहे, हें सर्वांस विदित आहे. त्यामुळें व इतर आनुषंगिक कारणांनीं कोणतीही माहिती वा आकडे मिळणें दुरापास्त झालें आहे. अशा स्थितींत ऐकलेल्या व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या माहितिवरून हा " शब्द सोडलेला " घडा वाचण्यावांचून गत्यंतर नाहीं.

पहिली व महत्त्वाची गोष्ट उपमेनें अशी सांगतां येईल कीं जर एकादा मुलगा तीन आकड्यांची बेरीज–वजाबाकी करूं शकत नसला पण तो एकाद्या उच्चपदस्थाचा मुलगा म्हणून वशिला लावून त्यास ७ व्या इयत्तेंत बसवला तरी तो चक्रवाढ–व्याजाचीं, काळ–काम–वेगाचीं व आवर्ताचीं गणितें सोडवून परीक्षेंत कसा उत्तीर्ण होणार ? किंवा दुसरी उपमा देतां येईल व्यापार करण्यास इच्छिणाऱ्या अव्यवहारी इसमाची. एक हजार रुपये भांडवल घालून ९०० रुपयेच परत मिळवून १०० रु. ज्याला तोटा आला, व हाच क्रम ज्यानें ओळीनें १०–२० वेळां केला, अशा इसमास, ( तो कितीही काकुळती आला तरी ) कोणी लाख रुपये व्यापारांत घालण्याकरितां देईल कां ? उपमा सोडून सरळ बोलावयाचें तर साधे निपायन कालवे ( Flow Irrigation Canals ) व धरणें या सारख्या कमी खर्चाचे आकल्पच जर आपणास आंतबट्ट्यांत पडतात व आज ५०–६० वर्षें असले अनेक आकल्प आपण आंत–बट्ट्यांत चालवीत आलों आहोंत, तर ज्यांत पंपानें २०० फूट उंचीवर पाणी खेंचावें लागतें असे कालवे फायदेशीर चालतील अशी अपेक्षा बाळगणें व ३० कोट रुपये खर्च करून सरकार तसला उत्पायनिक प्रकल्प (Lift Irrigation Scheme) निमूटपणें मंजूर करील अशी अपेक्षा करणेंच चुकीचें नव्हे काय ?

यावर कोणी प्रश्न करील कीं कोल्हापूर सारख्या प्रांतांत १५० फुटांपर्यंत पाणी खेंचून खाजगी रीत्या पंप चालवून त्यावर आज कितीक वर्षें ऊंस केला जातो, मग कोयनेच्या बाबतींतच तें विफल कां ठरावें ? याचें उत्तरही उघड आहे. कोल्हापुरांतील ऊंसबागाइतास पाणी खेंचण्यास एकरीं ३०० रुपये खर्च येतो. इतकेंच नव्हें तर मुंबई प्रांतांतील लाखों विहिरीवर ऊंस करणाऱ्या शेतकऱ्यांना मोटेनें वा पंपानें पाणी खेंचण्यास एकरीं ३००–४०० रुपये खर्च येतो व तितका खर्च करून ते आज वर्षानुवर्षें ऊंस करीत आहेत. मात्र कनालखालीं उतारानें ( flow ) बिनसाया-

* बारगळली शब्दावर असा आक्षेप घेतला जाईल कीं अजूनही विचार सुरूच आहे, तेव्हां योजना बारगळली नसून फक्त दूबली गेली, व थोडी लांबणीवर पडली इतकेंच ! यास उत्तर महाराष्ट्रांतील जनतेच्या त्या योजनेसंबंधी ज्या आकांक्षा झाल्या त्या भंग पावल्या हें होय. मूळ योजनेंतून उत्पायन ( Irrigation ) भाग गळाला, तसेंच वीजनिर्मितीही निम्म्यावर आली. इतकेंही करून आज प्रत्यक्ष मंजुरी कशालाच नाहीं !

१ विद्वान्ः–चतुर, धोरणी वगैरे अर्थ उद्दिष्ट आहे.

२ कपटः–युक्ति ( येथें या शद्वाचा लबाडी, फसवणूक हा अर्थ नाहीं )

सानें पाणी मिळणारे बागाईतदार व छोटे-बडे कारखानदार विहिरीवर पाणी खेंचण्यास येणाऱ्या खर्चाच्या ⅛ तर राहोंच पण ⅟₁₆ इतकी सुद्धां पाणीपट्टी देण्यास राजी नसतात.

ओरड केली, सभा भरवल्या, शिष्ट-मंडळें ( Deputations ) नेलीं कीं सरकार नमतें असा जुना अनुभव असल्यानें तें या मार्गाचा अवलंब आज ५०-६० वर्षें करीत आहेत, व त्यांत त्यांना यशहीं मिळालें आहे. या प्रकारें सरकारी खर्चानें केल्या गेलेल्या पाट-बंधाऱ्यांवर सरकारला (म्हणजेच मुंबई राज्यांतील इतर जनतेला) आलेल्या तोट्याची नोंद सरकारी चित्रगुप्त ( Accountant General ) च्या दप्तरीं मात्र नमूद असून ती वार्षिक अहवालांत प्रसिद्ध होते. त्यावरून पहाता मूळ ११ कोटी भांडवलावरील आजवरची तूट सुमारें १० कोटी भरते. मात्र वस्तुस्थितीकडे जाणून बुजून डोळेझांक करणाराला, इतरांची फसवणूक करण्याला एक स्थळ आहे व तें म्हणजे अलकिडे कांहीं वर्षें मिळणाऱ्या आकड्यांचें मागील ३-४ वर्षांत राहिलेल्या निवळ उत्पन्नावरून बघतां अशा प्रकल्पांवरील मूळ भांडवलावर ५-६ टक्के उत्पन्न आलेलें दिसतें. अर्थात् मूळ रकमेवरील ४ टक्के व्याजाचा दर सोडला तर १-२ टक्के निवळ उत्पन्न दिसतें. पण हा हिशेब उघडच स्वीकारतां येणार नाहीं. कारण, आजपर्यंतचा तोटा १० कोटी रुपये; त्यामधून मागील २-३ वर्षें मिळालेला जादा ( १-२ टक्के ) फायदा यापुढें मिळत राहील असें समजून वजा केला तरी १० कोटींचा तोटा भरून येण्यास ५० ते १०० वर्षें लागतील. शिवाय वरील आकड्यांत मूळ बांधकामावरील घसारा ( Depreciation ) आकारलेला नाही. तो आकारला तर व कनाल-धरणें सुस्थितींत राहण्यावर लागणारा योग्य खर्च केला तर फायदा तर राहोच पण व्याज सुद्धां भरून निघणार नाहीं. या फसव्या आकड्यांचा विफलपणा उपमेनें दाखवावयाचा म्हटला तर १२ वर्षांच्या मुलानें पांगुळगाडा हातीं धरून चार पावलें टाकल्याचा देतां येतील. तशांत बागाईतदारांना अधिक पाणीपट्टी भरण्यास सामर्थ्य नव्हतें म्हणावें तर तेंहि बरोबर नाहीं. कारण खाजगी विहिरीवर ऊंस करणारे तसेंच कोल्हापुरांत १००-१५० फूट उंचीवर पाणी पंप करणारे बागाईतदार ज्यां त्या काळीं ऊंस करीतच होते; त्यांना भांडवलावरील व्याज सोडून वर फायदा होत असें म्हणूनच ते ऊंस करीत होते. ब्रिटिश अमदानीच्या पहल्या काळांत त्या सरकारच्या कोणत्याहि कृत्यावर खुशालटीका करावी अशी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें, बागाईतदारांनीं पाण्याच्या दराबाबत ओरड चालू ठेवावी अशी प्रथा पडली. अर्थात् त्याचा परिणाम तोट्याचा आकडा फुगण्यांत होऊन ११ कोटी भांडवला-वरील तोट्याचा आकडा १० कोटीपर्यंत गेला.

**( ३ ) क्षेत्र-पायनिक ( Irrigational ) प्रकल्पावरील (Projects) ११ कोटी भांडवलापैकीं १०॥ कोटी महाराष्ट्रांतच खर्च झाले व पाणी-पट्टीबाबत ओरड करण्याची दुष्ट प्रथाही तेथेंच सुरू झाली.**

बोका दूध पितांना डोळे मिटून पितो व त्यास असें वाटत असतें ( म्हणतात ) कीं आपण जसे डोळे मिटून घेतले होते त्याप्रमाणेंच इतरांनीही घेतले असावे, हें सांगण्याचा उद्देश असा कीं महाराष्ट्रानें जरी तसें बोलण्याचें टाळलें, तरी गुजरात व कर्नाटक कांहीं झोपेले नव्हते. त्यांतील डोळस लोकांना सरकारी अहवालावरून माहित होतें कीं आजवर कनालवर खर्च झालेल्या ११ कोटी रुपयांपैकीं बहुतेक सर्व महाराष्ट्रांतच खर्ची पडले होते. त्याची फोड खालीं दिल्याप्रमाणें. आकडे कोटी रुपयांचे, अंदाजी आहेत.

| इलाख्यांतील प्रमुख भाग → | | महाराष्ट्र | गुजरात | कर्नाटक |
|---|---|---|---|---|
| प्रथम श्रेणींतील क्षेत्र पायनिक प्रकल्प First-class Irrigation Schemes | प्रधान तथा मोठे (Major) | ९·२५ | — | — |
| | उपप्रधान तथा छोटे | १·२५ | ०·२५ | ०·२५ |
| | बेरीज | १०·५० | ०·२५ | ०·२५ |

टीपः—अलीकडे बरेच वर्षांत अहवाल प्रसिद्ध होत नसल्यानें अंदाजी आकडे देण्याशिवाय इलाज नाहीं.

वर निर्दिष्ट केलेल्या वार्षिक तोट्याचा ( १० कोटी ) आकडा हिस्सेरशीनें वाटला तर परिस्थिति खालील प्रमाणें आहे.

| | महाराष्ट्र | गुजरात | कर्नाटक | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च + तोटा | २० | ०·५ | ०·५ | २१ | कोटी रुपये. |

उघड आहे कीं, आजपर्यंत कालव्यावर खर्ची पडलेल्या रकमे-पैकीं बहुतेक सर्व महाराष्ट्रावरच खर्च पडली व तोट्याचा बोजाही महाराष्ट्राच्या नांवेंच खर्ची पडला. इतकें करूनही आजवर मुख्यतः महाराष्ट्रांतच कालवे कां बांधण्यांत आले याचीं कारणें आपणांस सोईस्कर रीतीनें आपण दाखवूं शकतों. त्यांतील प्रमुख म्हणजे "अशीं धरणें-कालवे केल्यामुळें महाराष्ट्रांतील दुष्काळी भागास पाणी मिळतें" हें होय. यास कर्नाटक असें उत्तर देईल कीं, कर्नाटकांत काय दुष्काळी भाग नाहीं? सर्व विजापूर, तसेंच धारवाड व बेळगांवचा पूर्व भाग यांत महाराष्ट्रांतील पूर्व भागाप्रमाणेंच दुष्काळ पडतो. मग २१ कोटी रुपयांपैकीं २० कोटी रुपये महाराष्ट्रांत खर्च करण्याचा पंक्तिप्रपंच कां केला गेला?

**( ४ ) व्यवहारी माणसें तोंडाची वाफ दवडीत नाहींत; योग्य तें करूनच दाखवितात:—**

यावर कोणी असें उत्तर देईल कीं, पूर्वींच्या ब्रिटिश सरकारनें तसें केलें त्यास कोण काय करणार? त्यावर बिनतोड उत्तर कर्नाटक व गुजरात देणार कीं ब्रिटिश अमलांत झालेल्या अन्यायाचें परिमार्जन आतां कर्नाटक व गुजरात येथें "प्रथमश्रेणी" ( First Class ) तील प्रधान ( Major ) प्रकल्प ( Projects ) बांधूनच होईल व सरकारनें तसें करावें हें न्यायाचेंच आहे. या बिनतोड उत्तरास महाराष्ट्र प्रत्युत्तर काय देणार?

वरील वस्तुस्थिति गुजरात व कर्नाटक येथील जनतेच्या व त्यांच्या प्रतिनिधींच्या व पुढाऱ्यांच्या नजरेंतून सुटली असेल असें समजणें वेडेपणाचें आहे; व त्या त्या प्रांतांतील मंत्र्यांनीं नवीन योजना आंखतांना क्षेत्रपायनिक आकल्पांचा यापुढील खर्च प्रामुख्यानें गुजरात-कर्नाटक या भागांत करण्याचें मनाशीं ठरविलें असल्यास व बिनबोलतां हातांतील सत्तेचा (न्याय्य) उपयोग त्या उद्देशास साजेशा रीतीनें केला असल्यास त्यास नांवें ठेवण्यास काय जागा आहे?

कोठलीही जनता जेव्हां एखादा प्रतिनिधि निवडून देते तेव्हां तो प्रतिनिधि आपणास होत असलेला अन्याय वा पंक्तिप्रपंच दूर करील अशी तिची अपेक्षा असते. गुजरात-कर्नाटकाच्या प्रतिनिधींनीं या बाबतींत आपलें कर्तव्य युक्तीनें व चोख बजावलें, याबद्दल त्यांचें कौतुक तेथल्या जन-तेनें जितकें करावें तितकें थोडेंच ठरेल. महाराष्ट्रानें भलत्या भ्रमांत न राहतां त्यापासून योग्य तो धडा घेणेंच योग्य होईल.

गुजरातमध्यें तापी व नर्मदा या मोठ्या व माही, वत्रक वगैरे मध्यम नद्यांवर धरणें ( Reservoirs ) वीरकें ( weirs ) व कालवे बांधून त्यांचें पाणी गुजरातच्या पुलिनमय व सपाट (Alluvial and flat) प्रदेशांत आणून त्यावर पिकें भिजूं शकतील अशा योजना होण्यासारख्या होत्या; पण आजवर त्या हातीं घेतल्या गेल्या नव्हत्या. कालापव्यय न करतां वरील योजनांची मोजणी ( survey ) व आकल्प ( designs ) बिनबोभाट करून घेऊन त्यांना मंजुरी मिळवून कामें सुरू करण्यास मुत्सद्देगिरीचीच मुख्यतः जरूरी होती. ह्या योजनांपैकीं सर्वांत मोठी योजना म्हणजे तापीवरील कालव्यांची. तिला मंजुरी मिळवितांना कोयना योजनेप्रमाणें डांगोरा पिटविण्यांत तेथील कार्यकर्त्यांनीं शक्ति खर्च केली नाहीं, तर प्रत्यक्ष क्रियाच घडण्याबद्दल पूर्ण खबरदारी घेण्यांत आली. तापी योजना फारशी मोठी नसतांना ( इतकेंच नव्हे तर कोयनेच्या मानानें तीं फारच लहान असून सुद्धां ) मोजणी वगैरे करितां ती योजना मध्यवर्ती सरकारच्या वीज–खाणी–बांधकामें ( Works, Mines and Power ) या नामदार काकासाहेब गाडगीळ यांच्या खात्यांतील क्विंक ( CWINC — Central Water Power Irrigation Navigation Commission ) च्या स्वाधीन करण्यांत आली. त्याकरितां लागणारा जरूर तो अधिकारीवर्ग मुंबईराज्यांतून देण्यांत आला व त्या अधिकारिवर्गाकडून शक्य त्या कसोशीनें कामें करून घेऊन निमानपत्रकें (Estimates) मंजूर करण्यांत आलीं. तसें करतांना उगीच "साखरेची साल" किंवा मोठाले जाडी अहवाल तयार करण्यांत स्थापत्यिकांची बुद्धि व श्रम वायां घालवले गेले नाहींत. तसेंच वरील प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर काम सुरू करण्यांत वेळेचा अपव्यय केला गेला नाहीं. मध्यवर्ती सरकारमार्फत काम बिनबोभाट सुरू केलें गेलें. प्रस्तुत लेखकाला तर असें आढळून आलें आहे कीं सदर प्रकल्पाची व त्याच्या विस्ताराची पूर्ण कल्पनासुद्धां महाराष्ट्रांतील लोकांना फारशी नाहीं; या मोठ्या प्रकल्पाचा अप्रत्यक्ष परिणाम खानदेशांतील इतर क्षेत्रपायनिक (Irrigation) प्रकल्पावर काय होणार आहे याची कल्पना तर चांगल्या–चांगल्या लोकांनाही नाहीं !

## ( ५ ) तापी नदीवरील काकडापाडा धरण व मोठाले कालवे—

तापी नदीवर काकडापाडा येथें पाणी सांठविण्याकरितां "धरण" ( Reservoir ) बांधावें अशी मूळ कल्पना नव्हती. नुसतें मध्यम उंचीचें जलोच्चक ( Pick-up-weir ) बांधावें अशी मूळ योजना. पण पाया खोदाईच्या काळीं मध्यवर्ती सरकारचें नदीघाटी–योजना ( River Valley Projects ) चे मुख्य वार्तक, राय–बहादुर अयोध्यानाथ खोसला यांनीं "काकडापाडा" येथील पाहणी केल्यावर त्यांस असें आढळून आलें कीं, तेथें फक्त जलोच्चक ( Pick-up-weir ) बांधण्याऐवजीं मोठें धरणच बांधण्यास योग्य असें तें स्थळ आहे.

ह्या तापी–योजने ( scheme ) ची १९४४ सालच्या अहवालांत नमूद केलेली किंमत फक्त ८८ लक्ष रुपये होती व हा आकडा वाढत्या किंमतीचा समावेश करूनच ठरविला होता. वाढत्या किंमतीची केलेली वाढ अपुरी धरली गेली असें मानलें, तरी या योजनेची किंमत १॥ कोटी रुपये, फार तर २ कोटी रुपये व्हावी. पण हा आकडा आतां ६–६॥ कोटींवर गेला आहे. काकडापाडा येथें वीरका ऐवजीं ( weir ) मोठें धरण ( Dam ) व जलाशय ( Reservoir ) बांधल्यास प्रकल्पावर होणाऱ्या खर्चाचा अंदाजी आकडा नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या भारतीय पंचवार्षिक अहवालांत १२ कोटी ( पेक्षां थोडा जास्ती ) रुपयें दिला आहे. धरण ( Dam ) बांधल्यावर कनालची किंमतहि वाढणार; ती वरील आकड्यांत लक्षांत घेतली असेलच; परंतु त्यांत चूक असण्याचा संभव राहतो असा आजवरचा अनुभव आहे. सारांश, या योजनेचा एकूण खर्च २० ते २५ कोटी रुपये होईल अशी मनाशी खूणगांठ बांधल्यास फारसें चुकीचें ठरणार नाहीं.

## ( ६ ) गुजरात–कर्नाटकांत सुरू असलेल्या इतर क्षेत्रपायनिक ( Irrigation ) योजना:—

तिकडे काकडापाडा योजना मध्यवर्ती सरकारनें हातीं घेतली होती तर इकडे माही, मेशवा वगैरे गुजरातमधील इतर क्षेत्रपायनिक ( Irrigation ) योजना (Schemes) मुंबई राज्यामार्फत सुरूच होत्या; त्यांचें काम चालू असून कांहीं तर संपत आल्या आहेत.

तिकडे कर्नाटकांतही घटप्रभा योजना सुरू झाली पण काकडापाड्याचें मानानें ती लहानच. परंतु तेथेंही दडूी धरण झालेंच पाहिजे म्हणून हट्ट धरून तसें न झाल्यानें, रुसून कोपऱ्यांत बसण्याचा, वेडेपणा केला गेला असता तर तेथेंही कोयनेसारखीच स्थिति झाली असती. परंतु धरण होईल तेव्हां होवो, धुपधाळ वीरक ( Pick-up-weir ) बांधून तयारच होतें. तेथून १५०० विघटांचा ( cusecs ) नीरा कनाल एवढा कालवा काढण्याची मंजुरी घेण्यांत आली व कनालचें कामही सुरू झालें.*

## ( ७ ) महाराष्ट्राचे कोयना–योजनेचे मनोरे:—

महाराष्ट्र मात्र कोयना–योजनेचे मनोरे बांधण्यांत गुंग होता व मडक्यांचा दुकानदार जो 'शेख महंमद' त्याच्याप्रमाणें १०० रुपयांचे लाख रुपये व लाखाचे कोटी होतील अशा मनोरथांत तो दिल्लीकडे डोळे लावून व एकमेकांस धीराच्या बातम्या सांगत बसला होता. उदाहरणार्थ, आज अमक्या व उद्यां तमक्या अमेरिकन वा फ्रेंच जलवैजिक ( Hydro Electric ) वार्तकतज्ञानें ( Expert Engineer ) स्पष्टच सांगितलें कीं असल्या प्रकल्पास योग्य व इतकी सोईस्कर भूरचना जगांत क्वचितच सांपडते. तज्ञांनीं दिलेल्या अशा मतांवरून त्यांनीं मनाशीं खात्री बाळगली कीं कांहीं झालें तरी कोयना–योजना प्रत्यक्षांत येऊन घरोघर वीज, जिकडे तिकडे कारखाने, व स्वस्त विजेवर चालणाऱ्या पंपावर ४ लाख एकर शेती (त्यांत ५०,००० एकर ऊंस) पाण्याखालीं येणारच येणार. मग काय महाराष्ट्र म्हणजे पृथ्वीवरील नंदनवनच !! त्या दिशेनें त्यांनीं प्रयत्नहि खूप केले, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

पण "गर्जेल तो पडेल काय व बोलेल तो करील काय ?" कापडाच्या मानानें कोट शिवण्याऐवजीं, पूर्णवाढीचा कोट पाहिजे,

---

*कर्नाटकांत घटप्रभा, गुजरातेंत काकडापाडा, माही वगैरे प्रकल्पांचें बांधकाम सुरू असतां महाराष्ट्रांत त्याच दिशेनें कांहींच केलें नाहीं, असें समजूं नये. महाराष्ट्रांत गोदावरीवरील गंगापूर धरणानें होणारा ५,०००–६,००० प्रघटां ( m. c. ft. ) चा जलाशय सुविस्त्यात असून त्याच्या कामाची प्रगतीही बरी आहे. त्या धरणापासून दोन कालवे काढण्याचेंहि घाटत आहे.

मात्र गंगापूर–जलाशयाचा उपयोग महाराष्ट्राला किती व कोणत्या दिशेनें होणार हें प्रत्यक्षांत दिसेपर्यंत त्यावर न लिहिणें बरें. त्याबाबत सर्व विश्वासार्ह माहिती मिळेपर्यंत "आयत्या पिठावर नागोबा" ही मराठींतील म्हण अवश्य लक्षांत धरावी !!!

उत्तम मसमलीचें कापड पाहिजे, त्यावर जरतारी वेलबुट्टी पाहिजे, अशा प्रकारचा हट्ट धरण्यांत आला. कोयना–योजना एवढी महत्त्वाची तर त्यावर जो अहवाल व्हावयाचा तो त्या योजनेच्या इतमामास साजेसा असा मोठा पाहिजे असें ठरून, ९० कोटींची योजना व प्रकल्प ( Project ) तयार करण्यांत आले. पण अहवाल महाभारतायेवढा मोठा झाला म्हणजे तो मान्य होतो व योजना मंजूर होते असें थोडेंच आहे !

"वरणींतील बोरें घेण्यास मावशीनें सांगितलें खरें. पण बाहेर निघूं शकतील इतकींच घेण्याऐवजीं मूठ भरून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या जुन्या गोष्टींतील हावऱ्या मुलासारखीच" महाराष्ट्राची व तेथील जनतेची स्थिति झाली. ३०० फूट उत्पायन ( Lift Irrigation ) योजना अमलांत आणावयाची तर सध्यांच्या कनालवरील प्रचलित पीक–पाणी–वाटप पद्धति ( Pattern of Irrigation and crops ) एकदम टाकणें अवश्य, हें कोणीही क्षेत्रपायनाचा मर्मज्ञ सांगू शकेल. पायनित (Irrigated) क्षेत्र उठावण्याचें(Isolated) व बारीक तुकड्यांच्या(Small Pieces) मंजुरीचें असल्यास त्या पद्धतीमुळें पाणीनाश व पाण्याची अफरातफर फार मोठ्या प्रमाणावर होते व म्हणून ती टाळलीच पाहिजे हें सहज सिद्ध करून दाखवितां येईल. पण त्या दिशेनें प्रयत्न करण्याऐवजीं ही पीक–पाणी–वाटप पद्धति (Pattern of Irrigation and crop Distribution ) मागील ५०–६० वर्षांत उत्क्रांत झाली ( Evolution ) व क्रमाक्रमानें निर्माण झाली व " जुनें तें सोनें " म्हणून त्या पद्धतीवरच सर्व आकल्प बसविण्यांत आला; जुन्या चुका निदान उत्पायन योजने (Lift Irrigation) पुरत्या तरी दुरुस्त करण्याऐवजीं त्या चुकांचेंच कौतुक करण्यांत आलें. या सर्वांचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. ज्या योजनेस १० कोटी रुपये पुरावेत तिचें निर्मानपत्रक ( Estimate ) ३० कोटींवर गेलें व ती उत्पायन योजना (Lift Irrigation scheme) अजीबात बारगळली.

राजकारणांत " पोपट मेला " असें सरळ म्हटलेलें चालत नाहीं. तो " पाय वर करून, चोंच वासून, आनंदांत पडला आहे " असें म्हणण्याचा परिपाठ आहे. उत्पायन योजना बारगळली नाहीं, ती जरा लांबणीवर पडली अशी समजूत असणाऱ्या लोकांनीं भारताचा पंचवार्षिक अहवाल पहावा. त्यांत कोयनेचें नांव नाहीं. क्षेत्रपायनिका ( Irrigation ) च्या सदरांत नाहीं; जलवैजिका ( Hydro–Electric ) च्याही नाहीं. हिंदुस्तान सरकारच्या यादींत नाहीं; मुंबई राज्याच्या यादींत नाहीं. कुठे–कुठे नाहीं. नजर–चुकीनें राहिलें म्हणावें तर "राणंद" "वर्दाळा" यासारख्या क्षुल्लक प्रकल्पांचेसुद्धां सालोसालच्या परिव्ययाचे (Expenditure) आंकडे त्यांत दिले आहेत. मात्र येवढ्यानेंच भागत नाहीं. तक्षकाला पाठीशीं घालणाऱ्या इंद्रावर जसा प्रसंग आला तसाच कांहींसा प्रकार कोयना उत्पायन योजना पाठीशीं घालणाऱ्या कोयना जलवैजिक ( Hydro Electric ) योजनेचा झाला. कसें तें पुढें दिसेलच.

आपणांस पाहिजे तेवढी वीज व उत्पायन (Lift Irrigation) योजना करण्याचा व्यवहारी प्रकल्प केला असता तर फारशी अडचण न येतां कोयना–योजनेंतील कांहीं भाग एव्हांना झालेहि असते. पण भलती महत्वाकांक्षा धरली गेली. अवर्षणाचे वर्षी धरणें भरत नाहींत व मग वीज कमी पडते व सर्व गोंधळ होतो, हें आपण यंदा अनुभवीतच आहोंत व विचारवंताला तें पर्वानुभवारून कळतेंही. पण त्या अडचणी दृष्टीआड करून जास्तींत जास्त किती वीज निर्माण करतां येईल तेंच उद्दिष्ट ठरविलें; पण तितक्या विजेला मागणी नाहीं म्हणून त्या विजेवर उत्पायन ( Lift Irrigation ) करावयाचें अशी योजना ठरविली. "एकादशीच्या घरीं शिवरात्र" म्हणतात तसलाच प्रकार तो ! पण अव्यवहारी मनुष्यांना तोच पटतो व पटला.

### ( ८ ) " गंडस्य उपरि पिटिका संवृत्ता ":—

अशा प्रकारें उंच मनोरे बांधण्यांत येत असतां, एक नवीनच प्रश्न उद्भवला. तो असा कीं, " कोयनेचें पाणी मुंबईनें आपल्या मालकीचें झालें म्हणून, काय वाटेल तसें वापरावें ? " असा सडा सवाल मद्रास व हैद्राबाद राज्यांनीं हिंदुस्थान सरकारमार्फत टाकला. "देशाला धान्य पाहिजे आहे, व मद्रास व हैद्राबाद कोयनेंतून कृष्णा नदींत येणाऱ्या पाण्यावर कालवे काढून धान्योत्पत्ति करूं शकतील, " असा दावा त्या दोन राज्यांनीं मांडला. ह्यामुळें जी घटना झाली त्यांत असा निर्णय घेण्यांत आला कीं मुंबईनें वीजनिर्मितीकरितां कोंकणांत फार तर ७०,००० घनफूट पाणी सोडावें. यापेक्षां जास्ती केलेला जलसंचय परत कोयनेंतच सोडला पाहिजे. या निर्णयानें कोयना जलवैजिक ( Hydro–Electric ) योजना खच्ची तर झालीच, पण लांबणीवरहि पडली.

अर्थात् ९० कोटींपैकीं उत्पायन (Lift Irrigation) सोडल्यास ६० कोटींची योजना मंजूर व्हावयाची ती वरील निर्णयानें ३५ कोटींवर आणण्याचा मनसुबा ठरला. पण तेथेंही प्रगती फक्त नकाशे व आकल्प तयार करण्यास हुकूम देण्याइतकीच ! !

थोडक्यांत, गुजराथेंतील काकडापाडा व महाराष्ट्रांतील कोयना हीं दोन चित्रें समोरासमोर ठेऊन बघण्यासारखीं आहेत. एका संस्कृत श्लोकांत दोन उपमा दिलेल्या आहेत. "एक दिवसाच्या पूर्वार्धांतील व दुसरी उत्तरार्धांतील छायेची." या दोन उपमा अनुक्रमें महाराष्ट्राच्या ९० कोटीपासून घसरत घसरत २५ कोटींवर आलेल्या कागदी कोयना–योजनेस व ८८ लक्षावर आरंभ करून २५ कोटींवर येऊन प्रत्यक्षांत काम सुरू झालेल्या तापी योजनेस चांगल्या लागू पडतील.

### (९) कोयना–योजना बारगळली वा खच्ची करण्यांत आली, त्याचीं कारणें:—

या अपयशास कारण " भलती महत्त्वाकांक्षा " व अव्यवहारीपणा असें म्हटल्यास पुष्कळांना राग येईल पण खरें बोलण्याची वेळ आली आहे. आजवरचें वर्तन व्यवहारास धरून असतें तर ९० कोटींची अशक्य योजना सुद्धां मंजूर करून घेऊं ही आकांक्षा साध्य होण्याजोगी होती. पण जुन्या काळांत ११ कोटींपैकीं १०॥ कोटींच्या क्षेत्रपायनिक ( Irrigation ) योजना ( Schemes ) एकट्या महाराष्ट्रांत करण्याचें सद्भाग्य लाभल्यावर त्यावर तोटा येणार नाहीं इतके पाण्याचे दर कबूल करण्याऐवजीं उगीच ओरड केल्यानें मूळच्या ११ कोटींवर १० कोटींचा झालेला बोजा झांकून कसा रहाणार ? सावकार ज्याप्रमाणें वेळेवर व्याजाची व मुद्दलाची परतफेड न करणाऱ्या कुळास आणखी कर्ज देत नाहीं, तद्वतच महाराष्ट्राची स्थिति नाहीं काय ? अशा बुडव्या कुळास ९० कोटी रुपये कर्ज कोण देणार ? तात्पुरतें तोंड बंद करण्यापुरतें एकादें गंगापूरचें धरण व १००–२०० छोटे बंधारे बांधले म्हणजे सध्यांपुरती तरी ओरड कमी होईल, ही कल्पना मात्र प्रत्यक्षांत बरोबर ठरली.

बाजारांत आपली पत नाहीं, मग निदान नवीन योजना तरी व्यवहार्य व वाजवी किमतीची आंखण्याऐवजीं ९० कोटींच्या

किंमती इतक्या अवाढव्य प्रमाणावर असल्यावर, निमित्ताला कांहींतरी कारण दाखवून "अशुभस्य कालहरणम्" या न्यायानें ती लांबणीवर पडली व शेवटीं "हाय् गेलं, हुय् गेलें व धुपाटणें हातीं आलें" अशी स्थिति झाल्यास नामदार काकासाहेब गाडगीळ व दिल्ली-मुंबईतील इतर मुत्सद्दी, किंवा दिल्ली वा मुंबई येथील मंत्री किंवा सरकारें यांना दोष देण्याऐवजीं फुकट मिजास व मळती महत्त्वाकांक्षा दाखविणाऱ्या आपल्या आपणास च दोष लावणें योग्य नव्हे काय?

(९) चुकांचें परिमार्जन न करतां समर्थन करण्याची खोड:—

कोयनेच्या पाण्यावर आपल्या आवाक्यांत बसतील अशा धरणाच्या विजेच्या व उत्पायनाच्या (Lift Irrigation) योजना आखणें अगदीं शक्य कोटींतील आहे. तशा योग्य योजना आखण्याऐवजीं व त्यावर तूट न येतां उलट फायद्यांत कशा चालवितां येतील याचा विचार करण्याऐवजीं आपले चुकीचे मार्गच खरे आहेत हें दाखविण्याचा अट्टहास करण्याच्याच मार्गावर आपण आहोंत. अशा योजनांवर व्याज न सुटलें तरी त्याचे अप्रत्यक्ष फायदे लक्षांत घेतां ती योजना फायदेशीर (Productive) आहे हें दर्शविणारे आकडे व कोष्टकें तयार करण्यांतच जर आपण वेळ घालविणार असलों तर आपणाप्रमाणें खुळे आपणच. पण तोच प्रकार सुरू आहे. असले अप्रत्यक्ष फायदे काय कोयना योजनेंतच आहेत? ते इतर नैपायनिक कालव्यांच्या (Flow canals) योजनांतही असतातच व आहेतही. कोयना उत्पायनिक (Lift Irrigation) योजनेस, व्याज न आकारल्यास राहाणाऱ्या १ टक्का उत्पन्ना (Return) स अप्रत्यक्ष फायदा म्हणून ३ टक्के मिळविले तर ४ टक्के उत्पन्न (Return) दिसेल हें खरें. परंतु तोच आंकडा इतर धरण-योजनांत मिळविल्यास त्या योजनेवरील ३ टक्यांचे ७ टक्के होतील. अर्थात अशा दोन योजनांची तुलना केल्यास कोयना-योजना पूर्वीप्रमाणेंच दुय्यम दर्जाची ठरणार व त्यामुळें मागें पडणार. कालव्यामुळें उसास पाणी मिळून कालव्याचे अप्रत्यक्ष फायदे ज्या कारखानदारांना किंवा ज्या गूळवाल्यांना होणार त्यांचेकडून, पाण्याचा दरच जास्ती मिळवून कालव्यांवर प्रत्यक्ष फायदाच भरपूर जर पडतो असें आपण दाखवूं शकलों तरच ही योजना अंमलांत येण्याचा संभव. नुसत्या आकड्यांच्या जंजाळानें व्यवहारी लोक व सरकारचें अर्थखातें (Finance Department) फसेल अशी अपेक्षा करणें चूक.

(१०) कोयना तर लांबणीवर पडलीच, पण हातीं आलेली गिरणाही गेली:—

"ऊंस गोड झाला म्हणून मुळासकट खाल्ल्यानें तोंड मात्र सोलतें." "बोकाणा भरल्यानें ठसका लागून तोंडांतलें तर जातेंच पण पोटांतलेंही ओकून पडतें." तद्वतच आजची महाराष्ट्राची स्थिति झाली आहे. कोयनेचा ९० कोटींचा भरलेला बोकाणा तर गेलाच; उलट काकडापाडा धरण झाल्यानें खानदेशांतील संकल्पित क्षेत्रपायनिक योजनाही बारगळणार याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं आहेत. कारण, खानदेशांतील गिरणा वगैरे नद्यांवर १९४४ सालच्या युद्धोत्तर पुनर्योजनांत अंतर्भूत केलेल्या धरणांत जें पाणी सांठवायाचें तें जर तापीच्या काकडापाड्यांत सांठविण्याचें काम हातीं घेतलें गेलें तर तें पाणी गिरणेवरील व खानदेशांतील इतर नियोजित धरणांत अडविण्यास पुढें मंजुरी मिळेल हें शक्य आहे काय? "बोकाणा तर गेलाच पण पोटांतलेंही ओकून पडणार" असें जें वर म्हटलें तें यामुळेंच. १९४४ सालच्या युद्धोत्तर योजनेंत गिरणेवरील क्षेत्रपायनिक आकल्पाचा ४ कोटींचा* संकल्प होता, तो नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या भारताच्या पंचवार्षिक योजनेंत नाहींसा झालेला आढळतो!! यावरून योग्य तो बोध घेणें योग्य.

पण पाण्याचा दर वाढविण्याची भाषा बोलल्याबरोबर सध्यांच्या कालव्यावर थोड्या दरांत पाणी मिळविणारे खवळणार व त्यांचाच वरचष्मा झाल्यास कोयना उत्पायन (Lift Irrigation) व इतर क्षेत्र-पायानिक योजनांचीहि फारशी आशा महाराष्ट्रानें बाळगूं नये. एक तर निहितस्वातार्थां (Vested Interests) ची फुकट ओरड बंद पाडावी किंवा त्यांना (Vested Interests) खूष करून महाराष्ट्राच्या इतर भागांतील क्षेत्र-पायानिक (Irrigation) योजना हातच्या जाणार याची मनोमन खात्री बाळगावी.

कोणी असा प्रश्न करतील कीं महाराष्ट्रांतील कालव्यावर पाणीपट्टीचे जे दर आहेत तेच गुजरातच्या कालव्यावर राहणार ना? मग जर तेथील आकल्पांवर पाण्याच्या कमी दरामुळें तोटा येणार तर महाराष्ट्रांतील कालव्यावर तसाच तोटा आल्यास काय हरकत? यास उत्तर एवढेंच कीं महाराष्ट्रांतील कालव्यावरील ६०-७० वर्षांत साठलेला तोट्याचा बोजा व मूळ भांडवल यांच्या बरोबरीनें गुजरात-कर्नाटक मिळून भांडवली खर्च व तोटा यांची रक्कम जाईपर्यंत पुढील कालवे गुजरात-कर्नाटकांतच सरकार करीत राहील असा संभव फार. पण त्याहीपेक्षां महत्त्वाचा मुद्दा हा कीं, महाराष्ट्र वि. गुजरात-कर्नाटकांतील हें भांडण कसेंही सुटो, कालव्यांवर लाखो वा कोडो रुपये फायदा मिळविणाऱ्या मूठमर लोकांच्या करितां सोसावा लागणारा तोटा मुंबई प्रांतांतील अखिल जनतेनें सोसावा, हा कोठला न्याय?

आपणांस महाराष्ट्रांत जास्ती कालवे होऊन महाराष्ट्राचा विकास व्हावा, अशी इच्छा असेल तर सर्व इलाख्यांतील नवे कालवे स्वावलंबी (self-supporting) होतील, अशीच पाणीपट्टी जुन्या व नव्या सर्व कालव्यांवर ठेवल्याशिवाय गत्यंतर नाहीं. असें करण्यानेंच मुंबई राज्यांत व महाराष्ट्रांत इतर भागांत धरणें-कालवे होऊन सर्व प्रांतांतील विकासयोजना हातीं घेतल्या जाण्याचा संभव राहील.

वर सुचविलेला सुविचार महाराष्ट्रांतील बागाईतदारांस, तेथील जनतेस व पुढाऱ्यांस सुचला तर सोन्याहून पिवळें होईल. अर्थात् तसें होईल तो सुदिन!! तसें झाल्यास कितीक धूळ खात पडलेले कालव्या-धरणांचे प्रकल्प हातीं घेतले जातील व कोयना उत्पायन (Lift Irrigation) योजनाही व्यवहारांत येऊं शकेल. पण वरील सुविचार जोंवर पटत नाहीं, तोंवर निहितार्थांच्या (Vested-Interests) स्वार्थाकरितां बाकी महाराष्ट्राच्या प्रगतीची होळी करणारांनीं, सरकारला नांवें ठेवण्याला जागा नाहीं.

*तापी योजनाप्रमाणें या योजनेचीही आजच्या दरानें किंमत काढली असती तर ती २॥ पट म्हणजे १० कोटी झाली असती.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कंपनी लि.

— पुणें शाखा —

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.



आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी

**प्रमुख स्वदेशी कंपनी**

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी

## दि हिंदुस्थान स्पन पाइप्स लि.

४०५ नारायण, पुणें

**रीइन्फोर्स्ड सिमेंट कॉंक्रिट पाइपचे कारखानदार**

फॅक्टरी १ कराड स्टेशनजवळ. २ अरणगांव रोड अहमदनगर स्टेशनजवळ.

अधिकृत भांडवल १५,००,००० पंधरा लक्ष रु.
विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,००० पांच लक्ष रु.
[ रु. १०० चे ४९०० ऑर्डिनरी शेअर्स व रु. १ चे १०,००० डिफर्ड शेअर्स ]
खपलेलें भांडवल २,००,००० दोन लक्ष रु.

—: शेअर्स भरावयाची रक्कम :—

रु. २५ अर्जासोबत व रु. २५ अर्जमंजुरीनंतर, बाकीचे रु. ५० दोन हप्त्यांमध्यें मागणी होईल तेव्हां भरावयाचे आहेत.

**शेअरविक्री सुरू आहे.**

फिक्स्ड् डिपॉझिटस् घेतलीं जातात.

मुदत १ वर्ष, ३ वर्षें व पुढें ६ टक्के.

## रुचकर जेवणाची आवड सर्वांनाच असते




परंतु तें मिळण्याची खात्री सर्वांनाच असते असें नाहीं. म्हणून खात्रीनें रुचकर जेवण मिळावें याकरितां आपल्या जेवणांत

**बेडेकर**

मसाले, लोणचीं, आणि पापड वापरण्याची संवय ठेवा.

: तयार करणार :

**व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. मुंबई ४**

दुकानें:—गुणगाव—ठाकुरद्वार—दादर—कोट—परळ.



डोकेदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज

## रामतीर्थ ब्राम्ही तेल

[ स्पेशल नं. १ ]
( मेडिकेटेड )

पांढरे केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.

मोठी बाटली रु. ३-८-०
लहान बाटली रु. १-०-०

टपालानें मागविणारांनीं अनुक्रमें ५ रु ५ आ. व ३ रु. ७ आ. ची मनिऑर्डर करावी. व्ही. पी. केली जाणार नाहीं.

**श्री रामतीर्थ योगाश्रम**

"उमेशधाम," २७, व्हिन्सेंट स्क्वेअर स्ट्रीट, नं. १ दादर (जी. आय. पी.) रेल्वे स्टेशनें नजीक, मुंबई १४.

# श्री. वा. पुं. वर्दे—व्यक्तिचित्र

(श्री. खं. म. खंडागळे, पनवेल.)

एकदां आम्हां मित्रांत एक प्रश्न सहज निघाला—

'वर्दे साहेबांच्या आजच्या यशाचें रहस्य कशांत आहे ?'

मी बोलून गेलों—

'त्यांच्या समयज्ञतेंत !'

चालू वर्षाच्या जानेवारींत पनवेल येथें जिल्हा सहकारी परिषदेचें द्वितीय अधिवेशन होतें. श्री. वर्दे त्यावेळीं अध्यक्ष होते. अध्यक्षांना सहकारी संस्थांनीं हार घालण्यास सुरुवात केली. कुलाबा जिल्ह्यांतील अग्रीं जुन्या—जवळ जवळ ४१ वर्षांच्या— सोसायटीचे वृद्ध चेअरमन सोसायटतिर्फे हार घालण्यास टेबलाजवळ गेले. तो हार घेण्यास श्री. वर्दे यांनीं मान पुढें न करितां, दोन्ही हात पुढें करून तो हार घेतला नी निमिषार्धांत तसाच त्या वृद्ध चेअरमनच्या गळ्यांत घातला! सभागृहांत टाळ्यांचा कडकडाट झाला! हीच समयसूचकता, समयज्ञता श्री. वर्दे यांच्या यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. बी. कॉम. ला बँकिंग हा स्पेशल विषय पुष्कळ विद्यार्थी घेतात. पण त्यांतले बरेचसे कारकीर्दीच्या ताळेबंदांत डेड स्टॉक होऊन राहिलेले असतात. बी. एजी. झालेला विद्यार्थी क्वचितच शेती करतो. तसेंच बी. कॉम. झालेल्यांपैकीं थोडेच बँका काढून त्या यशस्वी-रीत्या चालवून दाखवितात. बँकिंगची आवड त्यांना विद्यार्थी-दशेपासूनच होती. इंटर कॉम. झाल्यावर पुढें त्यांनी डबल एन्ट्री प्रत्यक्ष आचरणांतच आणली! म्हणजे कॉलेजमध्यें पुढील शिक्षण चालू असतांच एक-दोन बँकांत उमेदवारी पत्करिली. बी. कॉम. झाल्यावर १—२ जॉइंट स्टॉक बँकांत नोकरी केली. तिथें त्यांना मानाची जागा मिळाली पण ज्यावेळीं त्यांना तेथें स्वाभिमानाला धक्का पोचतो आहे असें दिसून आलें त्यावेळीं ते तेथून बाहेर पडले. शेवटीं त्यांनीं श्री. वैकुंठराय मेहता यांच्या बोलावण्यावरून मुंबई प्रांतिक सहकारी बँकेंत प्रवेश केला. या बँकेंतील त्यांची पूर्वीची कारकीर्द आणि सध्यांची कारकीर्द यांत फार फरक आहे. १२।१३ वर्षें या बँकेंत अधिकारावर राहून १९३४ सालीं त्यांनीं हीहि बँक सोडली. पण विधिघटना वेगळी होती! १९३४ सालीं श्री. वर्दे यांनीं बँक सोडून काय केलें ? दुसऱ्या बँकेंत मोठ्या मानाची आणि भारी पगाराची नोकरी धरली ? छे! आर. आर. नाबर आणि कं. या मुंबईच्या शेअर फर्ममध्यें भागीदारी पत्करून स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. मुंबई प्रांतिक सहकारी बँकेंतून अधिकारी असतांना बाहेर पडले ते पुन्हां डायरेक्टर म्हणून आंत आले आणि आतां तर प्रांतिक सहकारी बँकेचे ते ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टरच झालेले आहेत! काळ केवढा बदल घडवून आणतो! बायबलांतील हें वाक्य पहा:— "लक्ष्मीप्रमाणें सत्ता देखील मागें लागणाऱ्याच्याऐवजी, पुढें पळणाऱ्याच्याच पाठीमागें लागते हेंच खरें!"



श्री. वा. पुं. वर्दे

आम्हीं महाराष्ट्रीय "'चर्चाळु' आहोंत. महाराष्ट्र व्यापारांत मागे आहे असें वारंवार म्हणूं; पण पुढें येण्यासाठीं कोणी निघालाच तर त्याला आशिर्वाद देण्याऐवजीं, हा 'अव्यापारेषु व्यापार' तुला कोणी सांगितला आहे, असें म्हणून त्याला नाउमेद करूं. १९३४ सालीं श्री. वर्दे यांनीं स्पष्टच सांगितलें होतें कीं, नुसते 'औद्योगिक अंक' काढून औद्योगिक प्रगति होत नसते. त्यासाठी महाराष्ट्रानें एखादी स्वतःची बँक काढली पाहिजे. या कल्पनेस पुढें योग्यवेळीं मूर्तस्वरूप आलें. मुंबई-महाराष्ट्रांतील अनेक सहकारी व जॉइंट स्टॉक बँकांच्या स्थापनेंत व उत्कर्षांत श्री. वर्दे यांचा बराच मोठा वाटा आहे. मुंबईच्या, किंबहुना महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक व्यवहारांत महाराष्ट्रीयांचे ते एक मोठे आधारस्तंभ आहेत.

कामाच्या वेळीं ते जितके गंभीर होतात तितकेच खेळकर ते काम संपतांच बनतात. कामांत असतांना जर तुम्हीं त्यांना पहाल तर त्यांचा चेहरा सागराप्रमाणें शांत आणि गूढ वाटेल पण तेच तुम्हीं त्यांच्याबरोबर काम संपल्यावर गोष्टी करायला लागाल तर त्याच सागराचा अवखळ झरा झालेला दिसेल! हाताखालच्या नोकरांना वळवाच्या पावसाप्रमाणें ताडताड बोलणार नाहींत पण त्याच पावसांत एखादे वेळीं मधूनच लक्कन चमकणाऱ्या विजेप्रमाणें त्याच्या चुकीबद्दल एकच शब्द अगर एखादें वाक्य सुनवून त्याच्या डोक्यांतच नव्हे तर त्यांच्या डोळ्यांतही प्रकाश पाडतील! घरीं आलेल्याचा योग्य तो मान राखून त्याला त्याच्या कामाबद्दल स्पष्ट मत देण्यास नेहमी तयार. चार लोक जमून गप्पा सुरू झाल्या म्हणजे वर्देसाहेबांनीं त्यांत भाग घेतला नाहीं असें क्वचितच होतें. मागे बँकेंत अधिकारी होते तेव्हां त्यांच्या कामाचा उरक उल्लेखनीय असायचा. जणूं लिफ्टमधून जाऊन एकामागून एक जिने मागें टाकावेत. चुकीवर हमखास नजर जायचीच. नोकराची कानउघाडणी स्वतःची मान खालीं घालून करायची! धूमकेतप्रमाणें नव्हे, तर शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें ते एकेक कलेनें उदित होत जात आहेत! सहकारी चळवळींतील एक तज्ज्ञ या नात्यानें ते परदेशगमन करून आले आहेत.

शिक्षणोत्तर आयुष्याची सुरवात बँकेंतील नोकरीनें केली. जणूं एका घोड्याची व्हिक्टोरिया. पण आज? आज तीच चार चाकांची १९५२ मॉडेलची मोटार गाडी झाली आहे. सहकारी बँका, जॉइंट स्टॉक बँका, औद्योगिक संस्था आणि शेअर बाजार हीं त्यांच्या कर्तृत्व गाडीचीं चार चाकें होत. गाडींत एक उणीव होती...स्टेपनी नव्हती. पण तीहि रिझर्व्ह बँकेच्या लोकल डायरेक्टर बोर्डावरील सभासदत्वाच्या रूपानें प्राप्त झाली आहे! वर्दे साहेबांची ही सुसज्ज गाडी अशीच अखंड धावावी, या शिवाय दुसरी कोणती इच्छा आमच्या मनांत असणार?

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६१, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

# दि उगार शुगर वर्क्स लि.

## सांगली

अधिकृत भांडवल ५० लाख रु.

वसूल भांडवल ११॥ लाखांचें असून सरकारचे परवानगीनें नवीन ऑर्डिनरी शेअर भांडवल रुपये साडेसात लाखांचें विक्रीस काढलें आहे.

गेल्या दोन वर्षांत कंपनीनें नवीन ठेवी न घेतां

## पांच लाखांच्या ठेवी परत केल्या.

आतां साखरेचें उत्पादन दुप्पट करणेचें ध्येय ठेवून उंसाची लागवड विस्तृत प्रमाणांत करणें करितां

## नवीन ठेवी घेणेच्या आहेत

मुदत ३ वर्षें, व्याज द. सा. द. शे. ४ प्रमाणें.

मुदत ५ वर्षें, व्याज द. सा. द. शे. ५ प्रमाणें.

शंभराच्या पूर्ण भागांतील पण एक हजारपेक्षां कमी नाहीं अशा रकमेच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

ठेवीच्या अटींसह फॉर्म मागवा.

रजिस्टर्ड ऑफिस सांगली — शिरगांवकर ब्रदर्स मॅनेजिंग एजंटस्

# श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि. फलटण

स्थापना : १-२-१९२६

| | |
|---|---|
| ★ भागांचें भांडवल | रु. १,२०,००० |
| ★ स्वतःचे फंड | रु. १,१०,००० |
| ★ ठेवी | रु. ११,००,००० |

ठेवी—करंट, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारण्यांत येतात.

व्यवहार—सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार करण्यांत येतो.

विमाहप्ते—वेस्टर्न इंडिया, कॉमनवेल्थ, एशियन, यांचे हप्ते स्वीकारले जातात.

कर्जें—(१) तालुक्यांतील सर्व सहकारी पेढ्यांना कर्जें देण्यांत येतात.

(२) व्यक्तिशः कर्जदारांचीहि नियमानुसार सोय करण्यांत येते.

नफा—पहिलीं ४ वर्षें ७% व पुढें सतत ६¼% नफा वाटला आहे.

अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें—

श्री. ह. तळवलकर, A. C. B. A. व्यवस्थापक — वि. शं. झिरपे, B. A., LL. B. अध्यक्ष संचालक मंडळ

स्थापना—१९३५ रे. नं. १४५१८

# धी मराठा मार्केट पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

[ १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें नोंदली गेलेली ]

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ९३,९७० |
| गंगाजळी फंड | रु. २९,९७४ |
| इतर फंडस् | रु. ३९,५०५ |
| खेळतें भांडवल | रु. ९,४६,००० |

महाराष्ट्रांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात व बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. खं. सा. दौंडकर, एम. ए., एलएल. बी., अध्यक्ष. — श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., जे. पी., ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना सन १९०७

# सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

मुख्य कचेरीः—पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखाः—कराड, ओगलेवाडी व मसूर (जि. उत्तर सातारा)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,३७,७७५ |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. १,२०,००० |
| ठेवी | रु. ४३,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल सुमारें | रु. ५०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर, दरसाल दर शेंकडा

| १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें | ५ वर्षें | १० वर्षें |
|---|---|---|---|---|
| रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| २-८-० | २-१२-० | ३ | ३-८-० | ४ |

सेव्हिंग्ज बँक दरसाल दर शेंकडा हल्लीं रु. १-८-० जानेवारी १९५२ पासून रु. २. चालू सालें दरसाल दर शेंकडा रु. १

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

व. य. कुलकर्णी, एम्. ए., बी. कॉम. मॅनेजर (ऑफिशिएटिंग) — शि. वा. लिमये, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

# आतां ह्या संस्था "सहकारी" कां "सरकारी"?

( श्री. दत्तात्रय दिवाकर चितळे, सेवानिवृत्त मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. )

आपल्या देशांत सहकारी चळवळ सुरू होऊन सुमारें अर्धे शतक झालें. आपल्याकडील सहकारी चळवळीचा उगम, तिची वेळोवेळीं झालेली वाढ, तिच्यांत झालेलीं आंदोलनें, तिच्या चवकशा, वेगवेगळ्या राज्यांत स्थानिक परिस्थितीप्रमाणें करण्यांत आलेले कायदे व त्यांत जरूरीप्रमाणें वेळोवेळीं करण्यांत आलेल्या दुरुस्त्या, ह्या आपल्या बहुसंख्य वाचकांच्या परिचयाच्या असल्यानें त्यांचा येथें उल्लेख करण्याचा आमचा मानस नाहीं. तसेंच मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीवर अलिकडे ज्या रिपोर्टांची बरीच छाया पडल्याचें दिसतें त्या "गाडगीळ", "सर्य्या" अगर "नानावटी" कमिट्यांच्या शिफारशींचाही उल्लेख करण्याचा आमचा विचार नाहीं.

आपल्या राज्यांत चालू असलेल्या सहकारी संस्थांच्या गेले पन्नास वर्षांच्या कामकाजाचें सिंहावलोकन केल्यास एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येईल ती ही कीं, ब्रिटिशांनीं आपल्या राजवटींत पाश्चात्य देशांतून इकडे आणून लावलेल्या सहकारी संस्थांच्या कलमी झाडांची वाढ आपल्या देशांत योग्य प्रकारें होऊं शकली नाहीं किंवा तीं योग्य प्रकारें फोफावून त्यांचीं फळें आपणांस चाखतां आलीं नाहींत अगर त्यांचा उपभोग घेतां आला नाहीं. या झाडांस त्या सरकारनें जरूर तें खत-पाणी वेळोवेळीं दिलें आणि या चळवळीची वाढ हिंदुस्थानांत व्हावी असा प्रयत्नहि केला. परंतु बारकाईनें पहातां असें दिसून येईल कीं, ही चळवळ लोकांनीं चालविलेली स्वतंत्र व स्वावलंबी अशी इकडे कधींही नव्हती व अद्यापही ती तशी झालेली दिसत नाहीं. ती अंतःस्फूर्तीनें लोकांनीं आपणहून सुरू केली नाहीं आणि त्यामुळें स्वाभाविकच ती आजवर परावलंबी व सरकाराची अंकित अशीच राहिली व त्याच वातावरणांत ती जगली व वाढली. कोणत्याही देशांतील सहकारी चळवळ ही तेथील लोकांनीं सुरू केलेली स्वयंशासित, स्वतंत्र व स्वावलंबी अशीच असली पाहिजे. "सहकारी" संस्था या "सरकारी" संस्था होता कामा नयेत. सरकारच्या मदतरूपी कुबड्यांचे आधारावर ती उभी असता कामा नये ही विचारसरणी आपल्याकडील प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांची आजवर होती व अद्यापही आहे. सहकारी चळवळीवर सरकारची फाजिल हुकमत चालते व त्यामुळें ती लोकमतानुवर्ती होऊं शकत नाहीं, अशी ब्रिटिश राज्यवटींत सर्व कार्यकर्ते तक्रार करीत असत. हिंदुस्थानांतील "सहकार" ही लोकांची चळवळ नसून तें एक सरकारी धोरण आहे अशी टीका पाश्चात्य सहकारी पंडित करीत असत. आतां भारतास स्वातंत्र्य मिळालें असल्यानें या परिस्थितींत कांहीं फरक झाला आहे किंवा काय याचा विचार करतां असें दिसतें कीं, राज्यशकट चालविणाऱ्या व्यक्तींत केवळ फरक झाला म्हणून सहकारी चळवळीच्या प्रस्तुत विषयक परिस्थितींत कांहींही फरक झाला आहे, असें म्हणतां येणार नाहीं. खेडेगांवांतील पतपेढीच्या सामान्य सभासदाबरोबर चर्चा केल्यास त्यास आपली सोसायटी कोण चालवितो, तिचें भांडवल कोठून येतें, ती संस्था स्वतःच्या पायावर चालावी यासाठी काय केलें पाहिजे, याची कांहींही जाणीव असल्याचें दिसत नाहीं. मेलीं पन्नास वर्षे अनेक खेड्यांतून सहकारी संस्था काम करीत असतांहि खेडुतांची ही उदासीनता दिसून यावी, हें काय दर्शवितें? हिंदुस्थानांतील चळवळ मुख्यतः ज्याच्या फायद्यासाठी व कल्याणासाठी सरकारनें सुरू केली तो इसम अगर घटक इतका उदासीन म्हणजेच चळवळींपासून दूर राहिला आहे, हें पाहिल्यानंतर आमची सहकारी चळवळ ही लोकांची व लोकांनीं चालविलेली चळवळ आहे, हें आम्हीं कसें म्हणूं शकूं? आतां स्पष्टच बोलावयाचें, म्हणजे शहरी वातावरणांत राहणाऱ्या मूठभर लोकांपेक्षां अधिक लोक या चळवळींत खऱ्या अर्थानें सामील झाले आहेत अशी आम्ही आमची समजूत करून घेणें हें स्वतःची फसवणूक करून घेण्यासारखें नाहीं काय? सामान्य खेडुतास खाजगी स्थानिक सावकार व त्याची पतपेढी यांत कांहींही फरक वाटत नाहीं. कारण, सदर पतपेढी त्यानें स्वयंस्फूर्तीनें कधींच काढलेली नसून ती त्याचेवर लादण्यांत आलेली आहे, हें स्पष्टच आहे.

कोणत्याही सहकारी संस्थेनें तिला आपल्या स्वतःच्या आर्थिक व मनुष्यबळावर करतां येतील तेवढींच कामें केलीं तर तिला आपलें स्वातंत्र्य टिकवतां येतें. तिनें त्यापेक्षां जास्त जबाबदारी पत्करल्यास तिला परावलंबी व्हावें लागेल व त्यामुळें आपल्या स्वातंत्र्यास मुकावें लागेल. सरकारनें आपल्यावर असलेल्या कांहीं जबाबदाऱ्या सहकारी संस्थांवर सोपवून त्या सदर संस्थांकरवीं पूर्ण करून घेण्याचें ठरविलें तरीही त्या जबाबदाऱ्या आपणास पेलण्यासारख्या नसतील तर त्या स्वीकारण्याचें सहकारी संस्थांनीं स्पष्टपणें नाकारलें पाहिजे.

आपल्या राज्यांत सहकारी संस्थांनीं सर्व पतवान शेतकऱ्यांस शेतीसाठी लागणारें भांडवल पुरविण्याची सरकारची जबाबदारी आपणावर घेतली आहे. परंतु ही जबाबदारी त्यांना पार पाडतां येणार नाहीं, एवढी ती मोठी आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना फार मोठ्या प्रमाणांत सरकारी मदत घ्यावी लागेल व मग त्यांचें स्वातंत्र्य धोक्यांत येईल. सहकाराचा आत्मा म्हणजे सहकारी संस्थांचें स्वातंत्र्य व स्वावलंबन. हें त्यांनीं गमवावें, किंवा सरकारनें पार पाडावयाचीं कामें सहकारी संस्थांनीं आपली शक्ति नसतांही दुबळेपणानें पत्करावी असा जेव्हां प्रश्न निर्माण होतो तेव्हा सहकारी संस्थांनीं आपल्या स्वातंत्र्यास प्राधान्य दिलें पाहिजे असें आमचें मत आहे. सरकार परकीयांचें नसून स्वकीयांचें असलें तरीही 'सरकार' व 'सहकार' यांची गल्लत होऊं देतां कामा नये.

आम्हांस असें वाटतें कीं वरील परिस्थितींत मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनीं अत्यंत नम्रपणें सरकारास वेळींच, अद्याप फार उशीर झाला नाहीं तोंवरच, असें कळवावें कीं आम्हीं आमच्या कुवतीप्रमाणें आमच्या सभासदांना आर्थिक मदत करूं. परंतु आमच्या शक्तीबाहेरची जबाबदारी व कामें आम्ही पत्करणार नाहीं. देशांतील सर्व पतवान शेतकऱ्यांस शेतीसाठी लागणारें भांडवल पुरविण्याची जबाबदारी सरकारची असून ती सरकारनें योग्य वाटेल त्या पद्धतीनें पार पाडावी, व त्यासाठी जरूर तर स्वतंत्र संस्थाही काढाव्यात. परंतु ही सरकारची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन ती पार पाडण्याचे त्यांनीं ठरविल्यास त्यांना सरकारी मदतीवर अवलंबून राहावें लागेल व त्या मानानें त्यांचें स्वातंत्र्य कमी होईल. परंतु इतका कालावधी झाल्यावर

तसेंच सरकारच्या बंधनें संस्थांनीं मान्य करून त्याप्रमाणें आपल्या घटना बदलून घेतल्यावर असें आतां सरकारास कळविणें अव्यवहार्य ठरेल व शिवाय तें आतां शक्यही नाहीं, याची आम्हांस जाणीव आहे. या सर्वांचा अर्थ एवढाच कीं मुंबई राज्यांतील सहकारी संस्था या वरकांती जरी "सहकारी" असल्या तरी तत्त्वतः त्या आतां "सरकारी"च झाल्या आहेत हें सरकारनें व आपल्या राज्यांतील प्रमुख व जबाबदार कार्यकर्त्यांनीं एकदां स्पष्टपणें जाहीर करावें म्हणजे मग त्या बाबतचा लोकभ्रम वेळींच दूर होईल. अशा रीतीनें "सहकारी" उर्फ "सरकारी" संस्थांचा कारभार सरकारच्या धोरणाप्रमाणें को होईना, पुढें चालून त्यांना सुयश लाभो, असें आम्ही इच्छितों.


स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व वाशीं.

ता. ३०-६-५१ असेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. १-८-० | रु. १-११-० | २ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दर साल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवींची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

### पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी. १७२, गिरगांव रोड, मुंबई ४.

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay.



सरकारनें रु. दोन लाख दर्शनी किंमतीचे शेअर्स घेऊन पुरस्कारिलेली

## सांगली इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, सांगली.

मेनरोड, सांगली.

— बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात —

सेक्रेटरी अँड अकौंटंट

महादेव अण्णाजी कुलकर्णी

कुसनाळकर, B. A., LL. B.






तार:—माधवाश्रम, मुंबई फोन ४२४८४

## माधवाश्रम

(रजिस्टर्ड)

भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय

गिरगांव, मुंबई ४



आमच्या हितचिंतकांस, दिपवाळींत आरोग्य नांदो हीच प्रार्थना !

## संतोष दुग्धालय पुणें

(रजिस्टर्ड)

हमखास १०० टक्के कोरें

दूध

घरपोंचची चोख व्यवस्था

स्थानिक विक्री सकाळीं ५-१० ते ७

म. गो. कुलकर्णी,

फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें.

# मुंबई राज्यांतील लँड मॉर्गेज बँकांची वाढ कशी होईल?

( म. सि. पुदाणी, मॅनेजर, सातारा जि. को. लँड मॉर्गेज बँक लि., कराड—सांगली )

मुंबई राज्यांत लँड मॉर्गेज बँकांचे [ जमीन गहाण बँका ] कामास सुरुवात होऊन सुमारें सोळा वर्षें होऊन गेलीं तरी त्यांचें यशस्वी कार्य झाल्याचें जनतेच्या नजरेस आलेलें नाहीं. सहकारी चळवळींतील अर्थात् हें एक नवीन दालन आहे. ह्या दालनाची इमारत अद्याप अपुरी आहे. एवढें बरीक खरें कीं थोडेबहुत प्रयत्न करूनहि या बाबतींत म्हणावें तसें यश आलेलें नाहीं. तें कां, हें खालील विवेचनावरून वाचकांचे लक्षांत येईल.

हिंदुस्थान कृषिप्रधान देश असल्यानें तेथील सुमारें ९० टक्के जनतेचें जीवन मुख्यतः शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी पूर्वापार व पिढ्यान्‌पिढ्या कर्जांत रुतलेला असून सावकारी व्याज, स्वतःचा प्रपंच, सरकारी सारा, इत्यादींची तोंडमिळवणी करतांना त्यास नाकी नऊ येतात, दारिद्र्यांत जीवन कंठावें लागतें. अशा विपन्नावस्थेंत शेती सुधारणांकडे लक्ष देऊन उत्पादन—शक्ति वाढविणें हें त्याच्या कुवतीबाहेरचें होत असते. २०—२५ वर्षांपूर्वी मंदीची लाट उसळल्यामुळें शेतींतील मालास भाव येईना, पैसा महाग झाला. दिवसेंदिवस कर्जाचा भार वाढूं लागला. याचा दीर्घ विचार करून १९२८ सालीं या परिस्थितींतून शेतकऱ्यास अंशतः तरी साहाय्य करावें, विसकटलेली आर्थिक घडी बसविण्यास मदत व्हावी म्हणून सरकारनें लँड मॉर्गेज बँका काढण्याचें ठरविलें. प्रयोगादाखल म्हणून धारवाड, भडोच व पाचोरा येथें लँड मॉर्गेज बँका काढणेस सरकारकडून प्रोत्साहन देण्यांत आलें. लांब मुदतीनें कर्ज देणाऱ्या ह्या संस्था शेतकऱ्यांच्या उन्नतीस आर्थिक मदत करून थोड्याच कालांत त्यांची परिस्थिती पालटणाऱ्या अशा उपयुक्त संस्था असल्याचें मोठमोठ्या तज्ज्ञांना पटलेलें आहे. प्रांतिक सरकारनीं अगर मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या कमेटीचे मत पहातां या चळवळीस पोषकच असें मत असल्याचें दिसून आलेलें आहे. या बँकांची मूळ कल्पना जर्मनींत निघाली असून आज दोनशें वर्षें अनेक युरोपिअन राष्ट्रांत या बँका भरभराटींत आहेत. जर्मन राष्ट्र लँड मॉर्गेज बँकेचें माहेरघरच बनलेलें आहे. तेव्हां आपल्याहि देशांत अशा बँकांचा शेतकऱ्यास आपली उन्नति करून घेण्यास जास्त उपयोग होईल यांत तिळमात्र शंका नाहीं. वर म्हटल्याप्रमाणें १९२८—२९ सालीं या बँकांचे खरे प्रयोग करून पहाण्याचे मद्रास, म्हैसूर, मुंबई इत्यादी सर्वच प्रांतांत ठरून सहकारी कार्यकर्ते या दिशेनें प्रयत्न करूं लागले. ज्या प्रांतांत सरकारनीं या चळवळीस उत्साहानें मदत केली व सहकारी कार्यकर्त्यांनीं अत्यंत कळकळीनें व आस्थापूर्वक कार्य केलें तेथें म्हणजेच मद्रास व म्हैसूर मध्यें या चळवळीस यश आलें आहे. याच लेखांत पुढें तुलनात्मक आंकडे देऊन त्याचें स्पष्टीकरण केलें आहे.

आपल्या मुंबई राज्यांत तीन लँड मार्गेज बँका १९२८ सालीं सुरू झाल्याचें वर जें म्हटलें आहे तें पाहूं. प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह बँकेचें कार्य ग्रामीण भागांतील सोसायट्यांना आपल्या सभासदांस लाग-लागवडीस व हंगामी कर्ज देण्यास भांडवल पुरविणेचें असतें. परतफेडीची मुदतही थोडी असलेनें त्यांना जमीनीवरील मालकी, त्यांची किंमत, परतफेडीची पात्रता अगर दिलेले कर्ज ज्या त्या कारणीं उपयोगिलें जाते किंवा कसें याची जी सूक्ष्म दृष्ट्या लँड मॉर्गेज बँकांना छाननी करावी लागते ती प्रॉव्हिन्शिअल बँकेकडून अगर सेंट्रल बँकेकडून होऊं शकली नाहीं म्हणा अगर अन्य कांहीं कारणें झालीं म्हणून म्हणा, या तीन बँकांचें काम यशस्वी होऊं शकलें नाहीं. सरकार मात्र यामुळें नाउमेद झालें नाहीं. त्यांना आपली महत्त्वाकांक्षा पुरी करणेची होती. लँड मॉर्गेज बँकांचे प्रयोग यशस्वी करून दाखविणेची तळमळ तीव्रतेनें भासूं लागली. मद्रास, म्हैसूर इत्यादि सरकारांनीं सुरू केलेल्या लँड मॉर्गेज बँकांचें चित्र त्यांच्यासमोर होतें आणि म्हणूनच १९३५ सालीं भांडवल पुरविणारी एक मध्यवर्ती स्वतंत्र म्हणजेच प्रॉव्हिन्शिअल को. लँड मॉर्गेज बँकेची स्थापना करून सुरत, धुळें, जळगांव, पुणें, सातारा, बेळगांव, इत्यादि जिल्ह्यांत पंधरा जिल्हा—निहाय लँड मॉर्गेज बँका सुरू करण्यांत आल्या. लँड मॉर्गेज बँकांची योजना ही जगांत केव्हांहि व कोठेंहि भरमसाट फायदा मिळविणारी योजना ठरलेली नाहीं. ती मुळांतच सरकारवर अवलंबून असते. शेतकऱ्यास परवडेल अशा अत्यंत कमी व्याजांत व्यवहार करावा लागतो. भांडवल पुरविण्याची जबाबदारी सरकारास घ्यावी लागते. तेव्हां लँड मॉर्गेज बँकांचे व्यवहार वाढून ती स्वावलंबी होईतोंपर्यंत स्वतः सरकारलाच नाना तऱ्हेनें व हरएक बाबतींत मदत करावी लागते. मद्रास व म्हैसूर येथील लँड मॉर्गेज बँकांचे व्यवहार १०-१२ कोटीवर गेले असतांना व २१ वर्षें होऊन

अर्थ-व्यवहार

किंमत रुपये ७॥ ] ★ [ पृष्ठसंख्या ३३५

[ विशेष सवलत : २५ नोव्हेंबरपर्यंत घेणाऱ्यांस ५ रुपयांस मिळेल. ]

प्रा. बा. स. भीर, एम्. कॉम्.
व
श्री. म. अ. दळवी, बी. कॉम्., बी. टी.

शालान्त परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार आणि वाणिज्य प्रथम वर्षांतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें सुबोध भाषेंत लिहिलेलें हें एकमेव पुस्तक आहे. या शास्त्रीय विषयावरील हा ग्रंथ सर्वसामान्य वाचकांसहि या विषयाची आवड हमखास उत्पन्न करील. या ग्रंथानें मराठींतील अर्थशास्त्रीय वाङ्मयांत उत्कृष्ट भर पडली आहे.

श्रीसमर्थ बुक डेपो, मुंबई नं. ४.

देसील आजहि तथील सरकार आपुलकीनें, उत्साहानें मदत करते.

आपल्या प्रांतांतील बँकांचें कार्य सुरू करण्यास मुंबई सरकारनेंहि अत्यंत आस्थापूर्वक मदत केलेली आहे. प्रथम शेतकऱ्यांचें कर्ज पूर्णपणें फेडून त्यांना ऋणमुक्त करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. पहिल्या पांच वर्षांत या बँकांचें प्रचारकार्य होऊन कामाची घडी व्यवस्थित बसून योग्य कारणीं लागतात न लागतात तों कर्जनिवारण कायदा पास झाला. कायदा लागू होणार आणि या कायद्यामुळें शेतकरी पूर्ण ऋणमुक्त होऊन त्याचा बराच फायदाहि होणार म्हणून लोकांमध्यें भावना प्रसृत होऊन जवळ जवळ या बँकांचें काम बंदच पडलें. पुढें पुढें लढाईच्या काळांत शेतीमालाच्या किंमती भरमसाठ वाढल्यानें बरीचशीं कर्जेंही फेडण्यांत आलीं. उरलीं सुरलीं कर्जें फेडण्यास या कायद्याचा सदुपयोग झाला ही गोष्ट निराळी. मात्र या कायद्यामुळें, सुरू केलेल्या लँड मॉर्गेज बँकांचें काम मात्र स्थगित झालें. कायद्याप्रमाणें कोर्टांकडील अर्जदार ऋणको नसल्याबद्दलचें सर्टिफिकीट मिळणेस बराच काल गेला. या बँकांना व्यवहार मिळावे म्हणून मूळ या कायद्यांत तरतूद असतांना त्यांची अंमलबजावणी व्हावी तशी झाली नाहीं. १९४७ सालीं देश स्वतंत्र झाल्यानंतर अन्नधान्यांच्या टंचाईतून पार पडावें म्हणून "अधिक धान्य पिकवा" सारखी देशव्यापि योजना हातीं घेऊन आपल्या शेतकरी बांधवांची उत्पादनशक्ति वाढवावी म्हणून सरकारनीं तगाई स्वरूपांत लोकांना कर्जें देणेंस सुरवात केली. याच वेळीं कूळ कायदा, तुकडे बंदी व एकत्रीकरण कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, इत्यादि पास होऊन त्यांतील कांहीं कायदे लागूहि करण्यांत आले. अशा विलक्षण परिस्थितींत लँडमॉर्गेज बँकांची योजना कितीहि चांगली असली अगर परराष्ट्रांत नव्हे तर मद्रास–म्हैसूरसारख्या आपल्याच देशांतील राज्यांत यशस्वी झाली, तरी आपल्या राज्यांत ती कशी होणार ! याचा परिणाम मात्र १९३५ सालीं सुरू झालेल्या बऱ्याचशा लँडमॉर्गेज बँका नुकसानींत जाऊन बंद पडल्या. सुरत लँडमॉर्गेज बँक सेंट्रल बँकेंत सामील झाली. धारवाड जिल्ह्यांतील चार लँड मॉर्गेज बँकांची एक बँक करावी लागली. पुणें बँकेनें आपले व्यवहार बंद करण्याची इच्छाहि प्रदर्शित केली. सर नानावटी कमिटीनीं नुकसानींत असणाऱ्या लँडमॉर्गेज बँकांनीं स्थानिक सेंट्रल बँकेंत सामील व्हावें, स्वतंत्र नवीन लँडमॉर्गेज बँका काढूं नये, अशी आपल्या सरकारला शिफारसाहि केली. १९४८ पासून परिस्थिति पालटली. सावकार-नियंत्रण कायदा लागू झाल्यानें ग्रामीण व नागरी सावकारी बंद पडून तावडतोब विनापरिश्रम आणि वाटेल तितकें कर्ज मिळण्याचीं साधनें नष्ट झालीं. कूळ कायद्यामुळेंहि या व्यवहारावर बराच परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. लँडमॉर्गेज बँकांचे व्यवहार वाढण्यास नवीन संधि निर्माण झाली. पूर्वीसारखे कर्ज भागविण्याकरतांच या बँकांचे परिश्रम होणार नसून शेती सुधारणा, शेती उपयोगी यंत्रसामुग्री खरेदी करण्यास भांडवल लागणार असून तिचा अर्थात् शेतकरी–जीवन सुधारण्याकडे व उत्पादनशक्ति वाढविण्याकडे उपयोग होत आहे व होणार आहे.

खालील, मद्रास को. लँड मॉर्गेज बँक व मद्रास प्रॉव्हिन्शिअल को. बँक यांच्या २०-६-५० च्या आकड्यावरून कार्याची कल्पना घेऊन ते आपल्या राज्यांतील अशाच बँकांच्या आकड्यांबरोबर तुलनात्मक दृष्टया पहातां आपल्या राज्यांतील लँड मॉर्गेज बँकांचे स्थानाची कल्पना येईल.





आमच्या सर्व ग्राहकांस व हितचिंतकांस ही दिवाळी सुखसमृद्धीची जावो.

ए. आर. सावंत ॲण्ड ब्रदर्स

दुकान नं. ३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २

फर्निसिंग फेब्रिक्स् व इतर सर्व तऱ्हेचें कापड मिळण्याचें ठिकाण

तसेंच

अरूण साडी मार्ट यांचे "जेमिनी" मार्कच्या (मदुरा) साड्यांचे होलसेल व्यापारी.

टे. नं. २२८३४

| मद्रास प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक | | मुंबई प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक |
|---|---|---|
| खेळतें भांडवल | ५,२१,००,००० रु. | ८८,८३,००० रु. |
| झालेला नफा | ३,४९,००० रु. | २७,००० रु. |
| **मद्रास प्रॉ. को. बँक** | | **मुंबई प्रॉ. को. बँक** |
| खेळतें भांडवल | ६,८२,००,००० रु. | ११,३०,००,००० रु. |
| झालेला नफा | ३,४६,००० रु. | ५,४७,००० रु. |

मुंबई राज्यांतील प्रॉव्हिन्शिअल को. बँक सहकारी चळवळींत आघाडीवर असून हें त्यांत कार्य करणाऱ्या बुद्धिमान माणसांस भूषणावह आहे. अशीच प्रगति लँड मॉर्गेज बँकांच्या बाबतींत कां होऊं नये ही एक विचार करण्यासारखी बाब आहे. दोन्हीं राज्यांतील शेती सारखी आहे. शेतकरी कष्टाळू आहेत. निसर्गामध्येंहि दोघांत साम्य असल्याचें आढळून येतें. तेव्हां लांब मुदतीच्या कर्जाची वाढ होण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

आपल्या राज्यांत सहकारी चळवळ, विशेषतः अंगीकारलेल्या लांब मुदतीच्या कर्जाची योजना यशस्वी करण्याचें झाल्यास खालील गोष्टींचा तावडतोब विचार व्हावयास पाहिजे:—

[१] पूर्वी मॉर्गेज बँकांकरतां एक स्वतंत्र असिस्टंट रजिस्ट्रार होते. त्यामुळें बँकेचें कामकाज वाढण्यास मदत होत होती. दैनंदिन कारभारांत मार्गदर्शन होऊन त्यास चालना मिळत होती. महत्त्वाचे प्रश्न तांतडीनें सोडविले जात होते. कोणताहि कायदा पास होण्यापूर्वी त्याचा परिणाम लँड मॉर्गेज बँकांचे व्यवहारावर काय होईल याचा विचार होऊन जरूर ती तरतूद कायद्यांत होणेंबाबत वेळींच सुचविलें जात होतें, मध्यवर्ती संस्था व जिल्हानिहाय संस्था यामधील उपस्थित होणाऱ्या नाजूक प्रश्नांचा विचार होऊन उभयतांचे ऋणानुबंध वाढविण्यास मदत होत होती. याचकरतां १९५० सालीं भरलेल्या मुंबई राज्यांतील दुसऱ्या लँड मॉर्गेज बँकांच्या कॉन्फरन्सनीं स्वतंत्र डेप्युटी रजिस्ट्रारची नेमणूक व्हावी म्हणून ठराव पास केला. सरकारकडे तशी विनंति करण्यांत आली, तरी त्याचा विचार व्हावा.

[२] "लँड मॉर्गेज बँका सुरू होऊन आतां बरींच वर्षें झालीं. व्यवहार वाढलेला आहे. इतःपर त्यांनीं सरकारच्या मदतीची अपेक्षा करू नये" असें उत्तर देण्याऐवजीं लँड मॉर्गेज बँकापुढें येणाऱ्या अडचणींचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्यांत यावा. इतरत्र दिलेल्या कारणावरून या बँकांचे व्यवहार वाढूं शकले नाहींत म्हणून या बँकांना हरएक प्रकारची मदत मागावी लागते. तेव्हां मद्रास—म्हैसूर सरकारप्रमाणें आपल्याहि सरकारकडून जरूर तें साहाय्य देणेंत यावें.

[३] "एकाच संस्थेंत दीर्घ व अल्प मुदतीच्या कर्जाचे व्यवहार एकत्रित करण्याचे विरुद्ध कमिटीचें मत आहे. दीर्घ मुदतीच्या कर्जासाठीं लँड मॉर्गेज बँकाच सर्वांत योग्य होत." १९४९ मध्यें हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या कमेटीच्या ह्या रिपोर्टावरून लांब मुदतीच्या कर्जाचे व्यवहार व अल्प मुदतीच्या कर्जाचे व्यवहार एकाच संस्थेकडे सोपविण्याच्या विरुद्ध ती असल्याचें दिसून येतें. असें असतांना कांहीं जिल्हा सेंट्रल को. बँकांकडे आमच्या सरकारनीं हा व्यवहार सोपविला आहे. यामुळें कामकाजांत वाढ न होता घोटाळे मात्र होणेंची साधार भीति वाटते. सालअखेरीस अल्पमुदतीच्या कर्जावर नव्हे इतर अनेक व्यवहारावर हजारों रुपये फायदा मिळणाऱ्या संस्थांना लांब मुदतीच्या कर्जाची किचकट जबाबदारी पेलता येणार नाहीं. या व्यवहारावर नजरेस येण्याइतका फायदा त्यांच्या दृष्टीस पडणार नाहीं. या नाहीं त्या स्वरूपांत सालोसाल सभासदांना कर्ज देणाऱ्या संस्थेकडे, ऋणमुक्त करणाऱ्या व मोठ्या योजनेस आर्थिक मदत करणाऱ्या संस्थेचें हें काम देणें हितावह होणार नाहीं असें वाटतें.

[४] भांडवल पुरवणाऱ्या मध्यवर्ती संस्थेवर फार मोठी जबाबदारी आहे. सरकारपेक्षां या बँकेवर आपल्या जिल्हानिहाय बँकांचे व्यवहार, त्यांची व्यवस्था, वसूल, इत्यादी अनेक बाबींवर लक्ष असावयास पाहिजे. यांच्या विकासावर वरिष्ठ बँकेची प्रगति अवलंबून आहे. तेव्हां त्यांचा व्यवहार कसा वाढेल, कामकाजांत एकसूत्रीपणा आणून त्यांत सुसूत्रपणा व सुसंबद्धता कशी निर्माण होईल यांचा विचार व्हावयास पाहिजे. तसेंच सरकारपुढें कामकाजाचा डोंगर आहे. कोणत्या कायद्यामुळें कोणावर काय परिणाम होतील हें ज्या त्या संबंधित संस्थेनें अगर खात्यानें पहावयास पाहिजे. नाहींपेक्षां मागाहून दुरुस्त्या सुचवाव्या लागतात, कामाचा खोळंबा होतो, असा अनुभव आहे. नुसतें कर्ज मंजूर करणें आणि दरसालचा हप्ता वसूल करणें एवढेंच कार्य त्यांचें नाहीं.

[५] इतर राज्यांत दरसाल सहकारी कार्यकर्त्यांचे विशेषतः लँड मॉर्गेज बँकांचे कॉन्फरन्सेस भरविल्या जातात. कामकाजांचा विचारविनिमय होऊन अडीअडचणी सरकारपुढें मांडून त्यांचें योग्य निरसन करून घेण्यांत येतें. गेले सालीं मद्रास, म्हैसूरमध्यें अशी २१ वी कॉन्फरन्स भरविणेंत आली, हेंच आपल्या राज्यांत दुसऱ्यांदा बोलावण्यांत आली. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष काम करणाऱ्या अंमलदारांच्या देखील सालोसाल सभा होऊन अनेक विषय चर्चिले जातात. कामाची दिशा आखण्यांत येते. त्यांचेंही अनुकरण आपल्याही राज्यांत व्हावयास नको काय ?


## पाहिजेत.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेंत खालील जागा भरणेंच्या आहेत.

(१) अकौंटंट जागा १
(२) इन्स्पेक्टर्स " ३
(३) क्लार्क्स " २

पगाराची अपेक्षा नमूद करून ता. ५।११।५१ पर्यंत खालील पत्त्यावर अर्ज पाठवावेत. ता. १६।१०।५१

ना. तु. सरनाईक,
मॅ. डायरेक्टर
कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक लि.
कोल्हापूर.

## माथेरान को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

### माथेरान, जि. कुलाबा.

**( स्थापना १९२९ )**

अधिकृत शेअर भांडवल रु. १,००,०००
वसूल झालेलें शेअर भांडवल रु. ४७,१८०
ठेवी ... ... ... रु. ५८,०००

गो. म. शिंदे
मॅनेजिंग डायरेक्टर.

[६] दुसऱ्या कॉन्फरन्समध्यें पास झालेले बरेच ठराव कागदावरच विरून गेल्याचें दिसून येतें. झालेल्या ठरावांचा विचार होऊन त्यांची अंमलबजावणी जरूर व्हावयास पाहिजे.

[७] गेलीं २–३ वर्षे लँड मॉर्गेज बँकांकडे कर्जाची अमाप मागणी होत आहे. कांहीं बँकांनीं मात्र आपला व्यवहार लाखों रुपयांनीं वाढवावा, शेतकऱ्यांची गरज भागवावी, पण कांहीं बँकांचे व्यवहार इतक्या विपन्न अवस्थेंत कां ? याचा विचार झाला पाहिजे. इतकेंच नव्हे तर प्रत्येक बँकेनें दरसाल कमींत कमी किती व्यवहार केला पाहिजे याबाबतींत दंडक तरी घातले गेले पाहिजेत.

[८] लँड मॉर्गेज बँकांचा कायदा होणार असल्याचें ऐकीवांत आहे. यामुळें लँड मॉर्गेज बँकेच्या व्यवहारास पोषक कलमें घातलीं जातीलच. त्यामुळें कामकाजांत येणाऱ्या अडचणी, वसुलीची तावडतोब तरतूद, वगैरे प्रश्नांचा विचार होईल.

[९] प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँकेकडून डिबेंचर्सवर यावें लागणारें व्याज वगळून जिल्हा बँकांकडून १३ टके व्याज जादा घेणेंत येतें व जिल्हा बँकांना फक्त १३ टक्क्याचेंच शेतकऱ्यांना कर्ज देतांना मार्जिन ठेवावें लागतें. प्रत्यक्ष काम करणाऱ्या त्या संस्था असल्याकारणानें आणि हल्लींच्या महागाईचा विचार करतात त्यांचे खर्चही भागत नाहींत. तेव्हां वरिष्ठ बँकांनीं ३ टक्क्यानें आपले व्याजाचे दर कमी करावेत.

[१०] लँड मॉर्गेज बँकांचें प्रचारकार्य अद्याप व्हावें तितकें झालेलें नाहीं. विशेषतः सामील झालेल्या संस्थांनी मुलुखांत बऱ्याच शेतकऱ्यांना आपल्यास तारणारी, आपल्याच जिल्ह्यांत लांब मुदतीचें कर्ज देणारी एक संस्था आहे, हें माहीतहि नसतें. तेव्हां प्रचारकार्यास सरकारनें व प्रॉव्हिन्शिअल को. लँड मॉर्गेज बँकेनें वेळींच मदत करून या चळवळीस साहाय्य करावें.

## पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

वरील सप्ताह दि. ३ ते दि. ९ नोव्हेंबर अखेर साजरा होणार आहे. सहकारी दिनाच्या ( ३ नोव्हेंबर ) सभेचें अध्यक्षस्थान श्री. व्ही. एस. भिडे, आय. सी. एस. ( रि. ), माजी सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, हे स्वीकारणार आहेत. सप्ताहांत प्रो. प. म. लिमये, वाय. बी. गायतोंडे, बा. ग. जगताप, व्ही. टी. चितळे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, य. यो. ओगले, ह्या वक्त्यांचीं भाषणें होणार आहेत. नेहमीप्रमाणें जिल्ह्यांतहि ठिकठिकाणीं व पुणें शहरांतील इंग्रजी शाळांतून सहकारी दिन पाळला जाणार आहे.


# दि पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें.

२५७ बुधवार पुणें २.
स्थापना सन १९२४.

आमचेकडे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

| | | |
|---|---|---|
| मुदत ठेव | द. द. शेंकडा | ३, ३½, ४ |
| रिकरिंग डिपॉझिट | „ | ३½, ४, ४½ |
| सेव्हिंग्ज | „ | २ |
| चालू | „ | १ |
| सोनें तारण कर्जावर व्याज दर „ | | ६ |

नरहर भाऊराव कुलकर्णी
चेअरमन.



(१) मो. ना. पाटसकरकृत शिवणकर्तनकलेवरील उत्कृष्ट ३ पुस्तकें

(२) उषा शिवण यंत्राचे व उषा इलेक्ट्रिक पंख्याचे पुणें, दक्षिण व उत्तर सातारा जिल्ह्याचे सोल एजंट, कोल्हापूर जिल्हा डीलर्स.

(३) शिवण व्यवसायास लागणाऱ्या हरएक प्रकारचे साहित्याचे विक्रेते.

(४) स्त्री-पुरुषांकरितां सरकारमान्य शिवणकर्तन शिक्षणसंस्था. सरकारी परीक्षेस बसण्याची सोय.

माहितिपत्रक मागवा.

मो. ना. पाटसकर,
डेक्कन जिमखाना पुणें ४.


## ह्या अंकातील जाहिराती


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ सरदार गृह, मुंबई, | ३४१ | २६ वेस्टर्न इंडिया विमा क. लि. | | ५१ भिडे अँड सन्स | |
| २ नगर अ. डि. सें. को. बँक लि. | ३४२ | २७ श्री महावीर को. बँक लि. | | ५२ महाराष्ट्र सोप फॅक्टरी | ३७८ |
| ३ साउथ सातारा जि. को. बँक लि. | | २८ न्यू ओरिएंटल बँक लि. | | ५३ व्हल्कन इं. कं. लि. | ३८४ |
| ४ भारत इं. बँक लि. | | २९ मध्य प्रदेश को. बँक लि. | ३६० | ५४ हिंदुस्थान स्पन पाइप्स लि. | |
| ५ कराड अ. को. बँक लि. | ३४३ | ३० अर्बन को. बँक लि. सांगली | | ५५ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. | |
| ६ बँक ऑफ सिटिझन्स लि. | | ३१ किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. | ३६१ | ५६ श्री रामतीर्थ योगाश्रम | |
| ७ बाँबे प्रॉ. को. बँक लि. | | ३२ कोल्हापूर डि. सें. को. बँक | ३६२ | ५७ खादी मंदिर | ३८५ |
| ८ सांगली बँक लि. | | ३३ कमर्शिअल बँक लि. | | ५८ श्री लक्ष्मी सें. को. बँक लि. | ३८६ |
| ९ शहाडे आठवले लि. | ३४४ | ३४ बुधगांव बँक लि. | | ५९ सातारा स्व. क. बँक लि. | |
| १० कॉसमॉस अ. को. बँक लि. | ३४५ | ३५ शेतकरी सहकारी संघ लि. | | ६० मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि. | |
| ११ कोल्हापूर मराठा अ. को. बँक लि. | | ३६ रेखा फर्निशर्स | ३६४ | ६१ उगार शुगर वर्क्स लि. | |
| १२ प्रेसिडेन्सी इं. बँक लि. | | ३७ मराठा को. क्रे. बँक लि. | | ६२ युनायटेड वेस्टर्न बँक लि. | ३८८ |
| १३ जमखंडी अर्बन को. बँक लि. | | ३८ मुजुमदार टॉय वर्क्स | ३६६ | ६३ शाहू आर्यौषधि कारखाना | |
| १४ सातारा जि. को. लँड मॉ. बँक लि. | ३४६ | ३९ बँक ऑफ कोल्हापूर लि. | | ६४ पेंडणेकर आणि कं. लि. | |
| १५ बँक ऑफ कराड लि. | | ४० वेस्टर्न प्रेइंग कार्डस कं. | ३६७ | ६५ सांगली इं. बँक लि. | |
| १६ सह्याद्रि विमा कं. लि. | | ४१ मॉ. इंड. को. असोसिएशन लि. | ३६८ | ६६ माधवाश्रम | |
| १७ बेळगांव बँक लि. | | ४२ बँक ऑफ पूना लि. | | ६७ संतोष दुग्धालय | |
| १८ किर्लोस्कर बंधु लि. | ३५० | ४३ रत्नाकर बँक लि. | | ६८ श्री समर्थ बुकडेपो | ३८९ |
| १९ गरगट्टी अँड सन्स | | ४४ मोर स्टेट बँक लि. | | ६९ ओगले ग्लास वर्क्स लि. | ३९० |
| २० गोरेगांव को. अर्बन बँक लि. | ३५२ | ४५ डेक्कन मर्चंटस को. बँक लि. | ३७० | ७० ए. आर. सावंत अँड ब्रदर्स | |
| २१ पेण ता. स. खरेदीविक्री संघ लि. | | ४६ द. रु. सांडू ब्रदर्स, चेंबूर लि. | | ७१ कोल्हापूर डि. सें. को. बँक लि. | ३९१ |
| २२ पनवेल ता. स. ख. वि. संघ लि. | ३५४ | ४७ सारस्वत को. बँक लि. | ३७२ | ७२ माथेरान को. बँक लि. | |
| २३ सराफ बँक ऑफ कोल्हापूर लि. | | ४८ महाड ता. स. ख. वि. संघ लि. | | ७३ पूना अ. को. बँक लि. | ३९२ |
| २४ दि पूना इनव्हेस्टर्स बँक लि. | ३५७ | ४९ बँक ऑफ औंध लि. | | ७४ मो. ना. पाटसकर | |
| २५ लोकमान्य इंडस्ट्रीज लि. | ३५८ | ५० बँक ऑफ महाराष्ट्र लि. | ३७६ | | |

## मुलाखतीसाठी अर्जदारानें कसें जावें ?

**साध्या, पण महत्त्वाच्या ह्या सूचनांकडे लक्ष द्या !**

नौकरीसाठी अर्ज केल्यावर उमेद्वारांना पुष्कळदां मुलाखतीला जावें लागतें. उमेद्वारीच्या आयुष्यक्रमांत ही बाब नेहमींची असली तरी वाटते तितकी सोपी नाहीं. कांहीं उमेद्वारांची पात्रता चांगली असते. त्यांनीं लिहिलेले अर्जहि छाप पाडण्यासारखे असतात; पण असें असून सुद्धां त्यांची निवड होत नाहीं. असें कां होतें ? मुलाखतीच्यावेळीं वागणुकीचें असें कांहीं विशिष्ट तंत्र आहे किंवा काय ? अमुक एका पद्धतीनें वागलें म्हणजे मुलाखतींत यश मिळेलच असें नाहीं. परंतु कांहीं बाबींकडे उमेद्वारानें लक्ष पुरविलें तर त्याला फायदा होतो ह्यांत शंका नाहीं.

उमेद्वारानें, म्हणजे ज्याला मुलाखतीचें बोलावणें आलें असेल त्यानें, एक गोष्ट लक्षांत ठेवावी. ती अशी कीं ज्या अर्थी त्याला बोलावणें आलें आहे, त्या अर्थी त्या विवक्षित जागेसाठी तो सामान्यपणें योग्य असलाच पाहिजे. एरवी, अयोग्य उमेद्वारांची मुलाखत घेऊन वेळ घालविण्यास कोण तयार होईल ? तेव्हां मुलाखतीच्या आमंत्रणानें उमेद्वारांत आत्मविश्वास उत्पन्न झाला पाहिजे. आतां मुलाखत घेण्याचा उद्देश काय असतो, हें पाहूं. मुलाखत मुख्यतः तीन गोष्टींसाठी घेण्यांत येत. ( १ ) अर्जांत लिहिलेली माहिती खरी कीं खोटी, तें पडताळून पहाणें. ( २ ) अधिक माहिती मिळविणें आणि ( ३ ) उमेद्वार कशा प्रकारचा आहे तें पहाणें. पहिल्या मुद्याबाबत फारशी अडचण नाहीं. अर्जाबरोबर उमेद्वारानें पात्रतेबद्दल अगर इतर गोष्टींबद्दल ज्या कागद्पत्रांच्या नकला पाठविल्या असतील, त्यांचे मूळ कागद्पत्र बरोबर घेऊन जावे. त्याचप्रमाणें मुलाखत घेणारा आपणास आणखी काय माहिती विचारण्याची शक्यता आहे, त्यासंबंधीं विचार करून तीहि माहिती तयार ठेवावी, म्हणजे ऐन वेळीं घांदल होत नाहीं. पुष्कळदां मुलाखत घेणारा गृहस्थ उमेद्वारांना अनपेक्षित असे प्रश्न विचारतो. मुलाखत संपल्यावर तो उमेद्वारालाच विचारतो "तुम्हाला कांहीं विचारावयाचें आहे काय ?". अशा वेळीं बरेच उमेद्वार गांगरून जातात. म्हणून वेळच आली तर आपण काय विचारावयाचें त्यासंबंधीं एक–दोन प्रश्न तयार ठेवावे, म्हणजे गोंधळण्याची भीति राहत नाहीं. पण प्रश्न विचारतांना एक महत्त्वाची बाब लक्षांत ठेवावी. सुट्टया, पगार, पेन्शन, कामाचे तास इत्यादींबद्दल एकदम विचारूं नये. कारण, मुलाखत घेणारा माणूस नोकराचा त्याला कितपत उपयोग होईल इकडे अधिक लक्ष देत असतो. नौकरीवर घेतल्यास आणखी अभ्यास करण्यास वेळ मिळेल कीं नाहीं, अधिक जबाबदारीचें काम करण्यास संधि मिळेल किंवा कसें, अशा तऱ्हेचे प्रश्न विचारणें चांगलें. ज्या ठिकाणीं मुलाखतीला जावयाचें त्या ठिकाणचा रस्ता, तेथें जाण्यासाठी असणारी वाहनाची सोय, इत्यादी बाबींकडे नीट लक्ष द्यावें. घाईगर्दीनें मुलाखतीला जाणें इष्ट नाहीं. कारण, मुलाखतींत उमेदवाराच्या मनःस्थितीला सुद्धा महत्त्वाचें स्थान आहे. वाहन मिळण्यास एकादे वेळीं उशीर लागतो. तेव्हां थोडाबहुत वेळ हाताशीं ठेवावा. मुलाखतीच्या जागीं फार लवकर पोंचलात तर एखादें पुस्तक अगर वृत्तपत्र वाचीत बसा आणि आपली वेळ झाल्याबरोबर मुलाखतीला जा. तुमचें आवडीचें वृत्तपत्र मुलाखत घेणाऱ्याला आवडणारें नसेल, तर तें बाहेर ठेवून आंत जा. आंत जातांना आपण ठाकठाक दिसतो ह्याची खात्री करा. आपल्या पात्रतेविषयीं आपली स्वतःची खात्री आहे असा ग्रह उमेद्वाराला निर्माण करावयाचा असतो. मुलाखत घेणारा उमेद्वारापेक्षा अधिक माहितगार आहे, असें दर्शविण्यांत उमेद्वारांचें कांहीं खर्च होत नाहीं. उलट, आपण त्याच्यापासून शिकण्यास उत्सुक आहों असेंच उमेद्वारानें दाखवावें. मुलाखत घेणाऱ्या गृहस्थाला तुम्हींच प्रथम अभिवादन करा, आणि त्यानें बसा म्हणून सांगितल्यावर खुर्चीवर बसा. नीट सरळ बसा व सावधपणा राखा. प्रश्न विचारल्यावर: त्यांचीं उत्तरें धीटपणानें पण सौजन्यानें द्या. न विचारलेली माहिती देऊं नका. वाजवीपेक्षां फाजील बोलण्यानें नौकरी मिळण्यापेक्षां जाण्याचाच संभव अधिक असतो मनुष्यस्वभाव लक्षांत घेऊन, स्वतः बोलण्यापेक्षां मुलाखत घेणाऱ्या मालकालाच अधिक बोलूं द्या. मुलाखतीला आपल्याला पाहिजे तसें वळण देण्याचा प्रयत्न करूं नका. इतकें सगळें करून तुम्हाला यश आलें नाहीं, तर त्रागा करूं नका. मुलाखतीचा अनुभव मनांत घोळवा आणि त्या अनुभवापासून काय शिकतां येण्यासारखें आहे तें पहा. पुढच्या मुलाखतीच्या वेळीं हा अनुभव तुम्हांला उपयोगी पडेल, आणि ती अधिक चांगली वठेल.

---

### ब्रिटिश नागरिक आणि चष्मे

ब्रिटनमध्यें 'लान्सेट' नांवाचें एक प्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिक निघत असतें, ह्या नियतकालिकाच्या आक्टोबरच्या अंकांत ब्रिटनमध्यें चष्मे किती प्रमाणांत वापरले जातात ह्यासंबंधींचा आकडेवार आढावा घेण्यांत आला आहे. ब्रिटनमधील माहिती कचेरीतर्फें निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांची माहिती गोळा करण्यांत येत असते. त्या माहितीवरूनच 'लान्सेट' मधील आढावा तयार करण्यांत आला आहे. १९५० अखेर इग्लंड आणि वेल्स मिळून एकूण लोकसंख्या सुमारें ४·३ कोटी होती, आणि त्यापैकीं १·९ कोटी लोक चष्मे वापरीत होते असें आढळून आलें. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ४४ टक्के लोक चष्मे वापरत होते. त्यांतहि बायकांची टक्केवारी ५१ टक्के आणि पुरुषांची ३७ टक्के आहे. सदासर्वकाळ चष्मे वापरणाऱ्यांची संख्या सुमारे ७० लाख भरली. एकूण लोकसंख्येशीं हें प्रमाण १६ टक्के पडतें. त्यांत २० टक्के स्त्रिया आणि १२ टक्के पुरूष आहेत. ब्रिटनच्या सरकारनें आपल्या नागरिकांना वैद्यकीय सोयी राष्ट्रातर्फे उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ह्या सोयी–सवलतींच्या योजनेंत जरूर त्यांना चष्मे पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. १९४८ सालीं सरकारतर्फें २० लाख चष्मे पुरविण्यांत आले. १९४९ मध्यें ७० लाखांवर आणि १९५० मध्यें ८० लाखांवर चष्मे पुरविले गेले. साधारणपणें दर तीन वर्षांनीं चष्मे बदलण्यांत येतात असें दिसून आलें. मॅनेजर्स, वरिष्ठ नौकरवर्ग, तंत्रज्ञ आणि धंदेवाले ह्या लोकांत चष्मे वापरणाऱ्यांचें प्रमाण ज्यास्त दिसून आलें.

---

### अपघातासंबंधीं सूचना देणारे रस्ते

मोटारी पुष्कळदां आपली बाजू सोडून चुकीच्या बाजूला जातात आणि त्यामुळें अपघात घडून येतात. बाजू सोडून गाडी जाऊं लागल्यास सोसाट्याचा वारा सुटल्यासारखा आवाज करण्याची व्यवस्था अमेरिकेंतील कांहीं रस्त्यांवर करण्यांत आली आहे. रस्त्याची योग्य मर्यादा संपली कीं, २४ इंच रुंदीचा कॉंक्रीटचा एक विशिष्ट प्रकारचा पट्टा बांधण्यांत आला आहे त्याला मोटारीच्या चाकांचा स्पर्श झाला कीं वरील आवाज होऊन चालविणाऱ्याला धोक्याची सूचना मिळते.



# टाटा अॅग्रिको
अ व जा रें

**अधिक धान्य पिकविण्यास त्यास साह्य करतात**

मजबूत, टिकाऊ व वापरण्यास सुलभ अशीं अॅग्रिको अवजारें देशांत सर्वत्र शेतकरी प्रथम पसंत करतात—सफल शेतीसाठीं तीं अत्यावश्यक प्राथमिक साधनें होत.

शेतीच्या हरएक कामासाठी उपयुक्त असें अॅग्रिको अवजार मिळूं शकतें.



**पावडीं :**
निरनिराळ्या परिस्थितींत काम करण्यासाठीं सुयोग्य असे पांच नमुने. इतर सर्व अॅग्रिको अवजारांप्रमाणेंच उंची कार्बन पोलादी पत्र्यांपासून बनविलेलीं व पाणी दिलेलीं असतात व त्यांना पक्के लाकडी दांडे बसविलेले असतात.



**मम्मटी :**
सुविख्यात स्वान-नेक सह तीन निरनिराळे नमुने. त्यांना तीक्ष्ण धार असल्यानें तीं खात्रीनें कामाची कार्यक्षमता वाढवितात. समतोल रचनेमुळें तीं वापरणें सुद्धां अत्यंत सुकर असतें.



**पिकाव व बीटर्स :**
निरनिराळ्या प्रकारचीं कामें करण्यासाठीं चार प्रमुख नमुने. धार बरेच दिवस टिकावी म्हणून त्यांचीं टोकें मुद्दाम विशेष मजबूत बनविलेलीं असतात. अत्यंत दणगट व दिर्घकाल टिकतात.

## टाटा अॅग्रिको अ व जा रें

दि टाटा आयर्न अॅण्ड स्टील कुंपनी लि.
सेल्स ऑफिस : २३-बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता
शाखा : मुंबई, मद्रास, नागपूर, अहमदाबाद, कानपूर, सिकंदराबाद, विजयनगरम कॅंटनमेंट व जलंदर कॅंटनमेंट.

( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली
भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

## —मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. श्री. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं: ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था ).

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या नियमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळांचे, पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील, शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } १२५।१२६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## — पुणें शहर —

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] लक्ष्मी रोड [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

### चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

### अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष १॥ टक्का, २ वर्षें २ टक्के, ३ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के.

याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ तें ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.


दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व अितर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.



मियां जैसजैसिया आशा । केला तुमचा भरंवसा ।
ते पुरवूनि जी बहुवसा । आणिलों सुखा ॥ ज्ञानेश्वरी ॥

---

आमचे भागीदार व ठेवीदार यांना यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.

---

## दिपवाळीनंतर

नवीन माशिनरीनें साखर करण्यास सुरुवात होईल.

---

शेअर विक्री सुरू आहे.

---

## शेअर व ठेवीचे फॉर्म

सिंडिकेटचे पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

---

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८०, सदाशिव पेठ,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ९-१०-१९५१

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस.


हें पत्र पुणें, पेठ मांजुर्डी घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.